अनमोल खजिना

लेखक : ज्ञा. पारडे

सूचना : या पुस्तकातील सर्व मते लेखकाची आहेत. यातील कोणत्याही त्रुटीस विनिमय प्रकाशन जबाबदार असणार नाही.

लेखकाचे दोन शब्द

सस्नेह जयभिम, वाचक मायबाप, बंधु-भगिनींनो, बाल-बालिका आणि मित्रांनो अनमोल खजिना आपल्या हाती देत असताना मला अत्यानंद होत आहे. १०० पुस्तकांच्या संदर्भाची मदत घेऊन अनमोल खजिन्याची निर्मीती मी माझ्या अल्प मतीने केलेली आहे. हे पुस्तक ३ विभागात विभागले असून जवळजवळ २०० मुद्यांचा यामध्ये समावेश केलेला आहे. पहिल्या विभागात डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या जन्मापासून निर्वाणापर्यंत मुद्याद्वारे माहिती सांगितलेली आहे. दुसऱ्या विभागात दिनांक महिना वर्षासह बाबासाहेबांच्या जीवनपटाची माहिती थोडक्यात सांगितलेली आहे आणि तिसऱ्या विभागात महात्मा बुद्धाचे दर्शन, धम्म आणि संघाबद्दल थोडक्यात माहिती सांगितलेली आहे.

हे पुस्तक लहानसे जरी असले तरी माझ्या मते त्यामध्ये महत्वाची अशी धम्म, भीम, गौतमाच्या जीवनावर व त्यांच्या शिकवणुकीस अनुसरूण महत्वाचे मुद्दे कथन केलेले असल्यामुळे हे पुस्तक विद्यार्थी, पालक, स्त्री-पुरुषांसाठी अत्यंत मार्गदर्शक ठरेल. इतकेच नव्हे तर कवी, गायक, समाजसेवक, पुढारी इ. मंडळीस अत्यंत मोलाचे मार्गदर्शक ठरेल असे मला वाटते.

जगात सुबता, शांतता नांदण्यासाठी जगाला धम्म, भीम, गौतमाच्या शिकवणुकीची अत्यंत गरज आहे. म्हणूनच त्यांच्याच बहुमोल विचारांची मालिका ग्रंथीत करून खजिन्याची निर्मीती करुन आपल्या हातात देत असताना धन्यता वाटते. हा अनमोल खजिना प्रत्येकाच्या घरी संग्रही असणे अत्यंत गरजेचे आहे. हे माझे पहिलेच पुस्तक असल्यामुळे माझ्या अल्पमतीने आपल्या समोर मांडण्याचा मी प्रयत्न केलेला आहे. त्यामध्ये काही त्रुटी व चुका असतीलही. आपण सुज्ञ आहात त्याबद्दल मला क्षमा करुन असणाऱ्या त्रुटी किंवा चुका कृपया माझ्या निदर्शनास आणून द्याव्यात. आपल्या सल्ल्याचा जरुर विचार करुन दुरुस्ती केली जाईल.

हा अनमोल खजिना प्रत्येकाने आपल्या संग्रही ठेवावा. परंतु हा खजिना कपाटात न ठेवता आपल्या डोक्यात ठेवावा. हीच आपल्या विनम्र प्रार्थना!

ज्ञा. तु. पारडे

अनमोल खजिना

विभाग - १ ला

१) आंबेडकर घराण्याचे मूळ गाव आंबावडे. हे गाव रत्नागिरी जिल्ह्यात मंडणगडपासून ५ मैलाच्या अंतरावर आहे.

२) आंबेडकर घराण्याचे कूळनाव सपकाळ.

३) डॉ. आंबेडकरांच्या आजोबांचे नाव मालोजीराव सकपाळ.

४) मालोजीराव सकपाळ लष्करात (ईस्ट इंडिया कंपनी) शिपाई होते.

५) मालोजीरावांच्या पाच अपत्यांपैकी दोनच अपत्यांची माहिती उपलब्ध आहे.

६) पुत्र - रामजी, कन्या- मिराबाई

७) ईस्ट इंडिया कंपनीने लष्करातील शिपांयांच्या मुलांसाठी शिक्षणसंस्था काढल्यामुळे रामजीचे लष्करी शाळेत शिक्षण झाले.

८) रामजी सकपाळ सैन्यात शिपाई म्हणून भरती झाले.

९) रामजी सपकाळ ज्या पथकात शिपाई म्हणून होते, त्याच पथकात मेजर धर्माजी मुरवाडकर होते.

१०) धर्माजी मुरबाडकरांसह त्यांचे सात बंधू सैन्यात सुभेदार म्हणुन काम करीत होते.

११) धर्माजी मुरबाडकर ठाणे जिल्ह्यातील मुरबाड गावचे रहिवाशी होते.

१२) धर्माजी मुरबाडकरांचे कुळनाव पंडीत.

१३) सुभेदार मेजर धर्माजी मुरबाडकरांची कन्या भिमाबाई यांच्याशी रामजींचा विवाह झाला.

१४) रामजी-भिमाबाईंचा विवाह १८६५ दरम्यान झाला.

१५) विवाहासमयी रामजींचे वय २० वर्षे व भिमाबाईचे वय १३ वर्षे होते.

१६) धर्माजी मुरबाडकरांचे घराणे श्रीमंत होते. रामजीचे घराणे श्रीमंत नसल्यामुळे धर्माजीच्या संपूर्ण कुटुंबाची या विवाहास मान्यता नव्हती. परंतु धर्माजींच्या थोरल्या चिरंजीवाच्या बोलण्यामुळे (माझ्या बहिणीस रामजीच योग्य पती आहेत.) लग्न झाले. परंतु लग्नानंतर भिमाईच्या आईशिवाय विचारपूस करण्यास कोणीही येत नसत. गरीब घराणे असल्यामुळे त्यांचा रूसवा होता.

१७) भिमाईने प्रतिज्ञापूर्वक आपल्या माहेरच्या मंडळीस सांगितले की दागिने सुकत घालण्याएवढी श्रीमंती जेव्हा येईल, तेव्हाच माहेरी येईन.

१८) भिमाईने सांताक्रुज (मुंबई) येथे रस्त्यात खडी टाकण्याचे सुद्धा काम केले.

१९) रामजी लष्करीशाळेत मुख्य शिक्षक म्हणून कामाला लागले.

२०) मुख्याध्यापक म्हणून रामजीने १४ वर्षे काम केले.

२१) शेवटी रामजीस सुभेदार मेजर पर्यंत बढती मिळाली.

२२) भिमाईची प्रतिज्ञा पुर्ण झाल्यामुळे भिमाईचे सन्मानाने माहेरी जाणे-येणे चालू होते.

२३) १८९० पर्यंत रामजी – भिमाबाईस १३ अपत्य झाली होती.

२४) १३ अपत्यांपैकी बाळाराम, गंगाधर, रमाबाई, आनंदराव, मंजुळा, तुळसा ही सात अपत्ये हयात होती. बाकीची लहानपणीच दगावली होती.

२५) बाळाराम सर्वात थोरले होते. ते लष्करात बँडमास्तर म्हणुन काम करीत होते. त्यानंतर साताऱ्याला पोलीसदलात नौकरीस होते. त्यांनी स्वतंत्रसंसार थाटला होता.

२६) मध्य भारतात महू येथील लष्करी छावणीत रामजी नोकरीवर असताना रामजीचे भाऊ, सर्व संगे परित्याग केलेले साधू भिमाबाई व रामजीस आशिर्वाद देतात की, स्वयंस्फुर्तीने, आपल्या कतृत्वाने इतिहासावर चिरंतर ठसा उमठवून, आपल्या घराण्याचे नाव अजरामर करील असा पुत्र तुमच्या पोटी येईल.

२७) १४ एप्रिल १८९१ रोजी महू येथे भिमाबाईस चौदावेपुत्ररत्न झाले. त्यांचे नाव रामजींनी भीम असे ठेवले.

२८) भिमास भिवा म्हणत असत.

२९) भिमराव अडीच-तीन वर्षाचे असतानाच रामजी सेवानिवृत्त झाले होते.

३०) कँम्प दापोलीच्या मराठी शाळेत भिमरावाचा शिक्षणास प्रारंभ झाला.

३१) रामजी सुभेदाराचे घराणे कबीरपंथी होते.

३२) रामजी गौरवर्णीय, तेजस्वी मुद्रा, पुरी उंची, करारी स्वभाव, स्वतंत्र बाणा, धिप्पाड बांधा, अध्ययनशील व वादकुशल वृत्तीचे होते.

३३) रामजीस सेवानिवृत्तीचे मासिक ५० रूपये वेतन मिळत असे.

३४) सेवानिवृत्तीनंतर रामजीस साताऱ्याच्या सरकारी सार्वजनिक कामाच्या विभागात कोठावळा म्हणून काम मिळाले. आनंदराव भिमरावाचे शिक्षण साताऱ्याच्या लष्करी छावणीच्या शाळेत चालू झाले.

३५) साताऱ्याला असताना भिमाबाईचे देहवसान झाले.

३६) भिमाबाई निधन पावल्या त्या वेळी भिमराव अवघे सहा वर्षाचे होते.

३७) मृत्यूसमयी भिमाबाईस घशाचा विकार झाला होता.

३८) भिमाबाईची समाधी साताऱ्यात आहे.

३९) भिमाबाईनंतर आनंदराव भिमरावाचा सांभाळ रामजीची बहिण मिराबाईंनी केला.

४०) रामजी सुभेदार महात्मा फुलेंचे मित्र होते.

४१) मुलांची आबाळ होऊ नये म्हणून जिजाबाई नावाच्या बाईशी रामजींनी पुनर्विवाह केला.

४२) जिजाबाई शिरकावळे नावाच्या जमिनदाराची बहिण होती.

४३) जिजाबाईने भिमाबाईचे कपडे, दागिने घातलेले भिमरावास खपत नसत.

४४) भिमराव स्वतंत्र, निर्भीड, धाडसी, जिद्दखोर स्वभावाचा असल्यामुळे हट्टास पेटल्यास मागे हटत नसत.

४५) पेंडसे नावाच्या शिक्षकाचे भिमरावावर अतिशय प्रेम असे. पावसात भिजल्यामुळे त्यांनी भिमरावास आंघोळीस गरमपाणी व नेसण्यास लंगोटी दिली. त्यावेळी भिमराव दुसरीत शिकत होते.

४६) साताऱ्याच्या लष्करी छावणीच्या शाळेत आंबेडकर नावाचे दुसरे शिक्षक होते. त्यांचेही भिमरावावर अलोट प्रेम होते. भिमरावाच्या बुद्धीचे तेज ओळखून त्यांनी भिमरावाचे आंबावडेकर आडनाव बदलून आंबेडकर असे शाळेच्या रजीस्टरवर नोंद केली.

४७) आंबावडे गावचे रहिवासी असल्यामुळे रामजीस आंबावडेकर असेच आडनावाने लोक बोलत असत.

४८) मिरा आत्याच्या कमरेची पिशवी झोपेत असताना भिमाने काढून घेतली. त्यात फक्त अर्धा आणा होता.

४९) संस्कृत शिकण्यास शिक्षकाने भिमरावास मनाई केली होती.

५०) "प्रामाण्य बुद्धिर्वेदेषु" वेदास प्रमाण माणणारा तोच हिंदू. अशी टिळकाने हिंदूची व्याख्या केली होती.

५१) वेदाध्ययन करणाऱ्या अस्पृश्याच्या कानात तप्त शिशाचा रस ओतावा आणि त्याची जिभ कापावी. वेदध्ययन करणे घोर अपराध आहे असा ब्राह्मणांचा नियम होता.

५२) भिमरावाने नाईलाजाने पार्शियन भाषा घेतली होती.

५३) संस्कृत भाषा भिमराव स्वकष्टाने शिकले.

५४) साताऱ्याच्या नोकरीचा कार्यकाल संपल्यानंतर रामजीबाबा परळ (मुंबई) येथे डबक चाळीत राहत होते.

५५) परळच्या मराठा माध्यमिक शाळेत भिमरावाचे शिक्षण चालू झाले.

५६) भिमरावास अवांतर पुस्तके वाचण्याचा छंद असल्यामुळे ते मागितले ते पुस्तक आणुन देण्यासाठी रामजीबाबास अत्यंत कष्ट सोसावे लागले.

५७) हावर्डची इंग्रजी पुस्तके व तरर्वडकरांच्या भाषांतर पाठमालांच्या सहाय्याने रामजीबाबाने भिमरावांचे इंग्रजी पक्के करून घेतले होते.

५८) बाबासाहेब म्हणत असत की इंग्रजीतल्या वकृत्वाचे आणि ग्रंथ कर्तृत्वाचे सारे श्रेय वडीलांकडेच जाते. इंग्रजीत प्रतिशब्द कसा योजावा याचेज्ञान मला वडिलांनीच दिले.

५९) जन्माने कनिष्टातील कनिष्ट जातीत जन्म घेतलेल्या भिमरावास त्या काळी शिक्षण घेण्यात भयंकत पातक करण्यासारखे होते.

६०) भिमरावाचे शिक्षण मुंबई एल्फिस्टन शाळेत सुरू झाले. त्याच शाळेत गणीताचे उदाहरण सोडविण्यासाठी फळ्याकडे जात असताना जेवणाचे डब्बे विटाळतील म्हणून इतर विद्यार्थ्यांनी ओरड केली होती.

६१) एक शिक्षक भिमरावास म्हणाले की, तू महाराचा आहेस शाळा शिकून तू काय करणार ? तेव्हा भिमराव कडाडले व म्हणाले महाशय तुम्ही आपले काम करा. नसती उठाठेव करायला तुम्हाला सांगितले कोणी ?

६२) भिमरावास क्रिकेट खेळण्याची आवड होती.

६३) भिमराव १९०७ साली मॅट्रीकची परिक्षा पास झाले.

६४) भिमरावास ७५० गुणांपैकी २८२ गुण मिळाले होते.

६५) १९०७ साली महाराच्या पोराने मॅट्रिक पास होणे अघटित समजले जात असे म्हणून त्या प्रित्यर्थ एक समारंभ आयोजीत केला होता. त्याचे अध्यक्ष नामवंत समाजसुधारक सिताराम केशव बोले होते.

६६) निष्ठावंत समाजसुधारक ग्रंथकार गुरूवर्य कृष्णाजी अर्जून केळुसकर हे सुद्धा कार्यक्रमास उपस्थित होते.

६७) केळुसकर गुरूजींनी भिमरावांबद्दल गौरोद्‌गार काढून स्वतः लिहिलेले बुद्धाचे (मराठीतील) चरित्र भिमरावाला भेट म्हणून दिले.

६८) मॅट्रिक पास झाल्यानंतर भिमरावाचे लग्न झाले. त्यावेळी भिमरावाचे वय १७ वर्षे व रमाबाईचे वय ९ वर्षे होते.

६९) दाभोळजवळील वणंद गावचे भिकू धोत्रे यांची कन्या रमाबाई रामजींनी सून म्हणून पसंत केली.

७०) भिकू धोत्रे दाभोळ बंदरावर हमाली करत असत.

७१) रमाबाईचे आई-वडिल लहानपणीच निर्वतले होते. म्हणून भावंडाचे व त्यांचे पालन-पोषण चुलत्याने व मामाने केले.

७२) रमाबाईचे बंधू शंकर एका मुद्रणालयात कामास होते.

७३) वणंद गावचे रहिवाशी असल्यामुळे धोत्र्यांना वणंदकर म्हणत असत.

७४) भारतातील पहिली अस्पृश्य परिषद त्यावेळचे जनजागृतीचे काम करणारे शिवराम जनाबा कांबळे यांनी भरविली.

७५) दुसरे अस्पृश्य उद्धारक नेते कर्मवीर विठ्ठल रामजी शिंदे यांनी सर नारायण चंदावरकर यांच्या सहाय्याने डिस्प्रेड क्लॉस मिशन ऑफ इंडिया ही संस्था स्थापन करून अस्पृश्य उद्धाराचा पहिला संघटित प्रयत्न केला होता.

७६) गुरूवर्य केळुसकर गुरूजी नारायण चंदावरकर यांच्या मदतीने मुंबई येथे बडोदे नरेशांच्या निवासस्थानी भिमरावास पुढील शिक्षणासाठी नरेश यांच्या समोर उभे केले तेव्हा नरेश यांनी विचारलेल्या प्रश्नांची उत्तरे भिमरावांनी समाधानकारक दिली.

७७) बडोदे नरेश यांनी आपल्या सरकारकडून मासिक २५ रूपये शिष्यवृत्ती देण्याचे मान्य केले.

७८) भिमराव शिकत असलेल्या महाविद्यालयात प्राचार्य कॉव्हर्नटन प्राध्यापक मुल्लर ॲण्डर्सन असे नामावंकीत अध्यापक असत. परंतु त्यांच्या शिकवण्याची पद्धत भिमरावाच्या मनाची पक्कड घेऊ शकली नाही.

७९) भिमरावाचे महाविद्यालयीन शिक्षण चालू असताना पोयबावाडीतील इम्प्रुव्हमेंट चाळ नं. १ मध्ये रूम नं. ५०-५१ मध्ये रामजीबाबांनी आपले बिऱ्हाड हालवले होते.

८०) १९१२ साली भिमराव बी.ए. परिक्षा पास झाले.

८१) अ.बा. गजेंद्रगडकर हे सुद्धा भिमरावाबरोबरच बी.ए. परिक्षेत पहिले आले होते.

८२) पुढे चालून भिमराव आंबेडकरांनी स्थापन केलेल्या सिद्धार्थ महाविद्यालयाचे पहिले प्राचार्यपद अ.बा. गजेंद्रगडकर यांनी भूषविले.

८३) भारतात राजकीय असंतोषाने उग्र रूप धारण केले असताना, मत स्वातंत्र व सभा स्वातंत्र्याची गळचेपी अधिकाधिक होत होती. प्रार्थना, निषेध, निवेदने करणे देशद्रोहाची लक्षणे आहेत असे ब्रिटीश सरकारला वाटत होते, म्हणून टिळकांची मंडालेच्या तुरूंगात, सावरकर बंधूची अंदमानवर रवानगी करण्यात आलेली होती. महाराष्ट्रातील संपादकाला तुरूंगात डांबण्यात आले होते. काही क्रांतीकारकाला फाशी दिली होती. ज्वालाग्राही भारतातील संघटनांचे प्रतिध्वनी भिमरावाच्या देशाभिमाने मनावर खोलवर उमटले त्यावेळेस त्यांनी प्रांतीककोष व्यवस्थेचा विकास (दि इन्व्हुलेशन ऑफ प्राव्हिन्सल फायनान्स इन ब्रिटीश इंडिया) हा अतिशय जहाल असा अमोल ग्रंथ लिहिला.

८४) भिमरावाने प्रांतीककोष व्यवस्थेचा विकास या ग्रंथात नमूद केले की, सत्ता आपणाहून क्वचितच आत्महत्या करते.

८५) कार्यकारणीने पृथ्वीच्या पाठीवर कुठल्याही देशात झाले नसतील असे काळे निर्बंध करून संहितेस काळीमा लावला आहे. नौकरशाही सनातनी दडपणशाही वृत्तीची आहे असे वरील ग्रंथात नमूद आहे.

८६) १९१० सालच्या मुद्रणासंबंधीचा निर्बंध विचार व स्वातंत्र्याची गळपेची करणार होता असे खऱ्या देशभक्तास शोभतील अशी मते वरील ग्रंथात आहेत.

८७) मोर्ले मिंटो सुधारणा विषयी त्यांची मते मनमनिय होती. प्रांतीक सरकारची विधीमंडळे स्वातंत्रतर दाखवायची परंतु त्यांच्यावर नियंत्रण ठेवायचे आणि मंत्रीमंडळाचे अस्तित्व लोकप्रतिनिधीच्या मतावर अवलंबून ठेवायचे नाही यात खरी गोम आहे. त्यांची धोरणे देश सुधारण्याची नाहीत असा भिमरावाचा सडेतोड अभिप्राय होता.

८८) पदवीधर झाल्यावर भिमरावाने वडिलांच्या इच्छेविरूद्ध बडोदे नरेशाची नोकरी धरली.

८९) बडोदे सरकारच्या सैन्यात भिमरावाची नेमणूक लेफ्टनंन्ट म्हणून झाली.

९०) लेफ्टनंन्ट या पदावर नेमणूक झाल्यावर १५ दिवसांतच वडिल आजारी असल्याची तार भिमरावांस मिळाली. भिमराव मुंबईस परत आले. वडिलांनी भिमरावास डोळे भरून पाहिले आणि डोळे मिटले.

९१) बडोदे नरेश यांनी चार विद्यार्थी उच्च शिक्षणासाठी अमेरिकेस पाठविण्याचा निर्णय घेतला होता त्यात भिमरावाचे नाव होते.

९२) ४ जून १९१३ रोजी बडोदे येथे उपशिक्षण मंत्र्याच्या समोर भिमरावाने करारपत्रावर सही केली.

९३) संकल्पित विषयांचा अभ्यास करून नंतर दहा वर्षे बडोदे सरकारची नोकरी करावी असा करार होता.

९४) १९१३ सालच्या जुलै महिन्याच्या तिसऱ्या आठवड्यात भिमराव न्युयार्कला पोहचले.

९५) नवल भाथेना नावाच्या विद्यार्थ्याबरोबर लिव्हिंगस्टनहॉल शयनमंदिरात भिमराव राहत असत.

९६) आई-वडिल मुलांना जन्म देतात परंतु कर्म देत नाहीत हे भिमरावास खोटे वाटले.

९७) शिक्षणाच्या पदव्याशिवाय अर्थशास्त्र, समाजशास्त्र,राज्यशास्त्र, नितीशास्त्र, मानस व मानवंशशास्त्र इ. अनेक विषयांत पारंगत होण्याची भिमरावांची इच्छा असे.

९८) भिमरावाचे अमेरिकेत आवडते प्राध्यापक एडविन आर.ए. सेलिग्मन होते.

९९) प्राचीन भारतातील व्यापार (एजंड इंडियन कॉमर्स) या विषयावर प्रबंध लिहून एम.ए. पदवी १९१५ साली संपादन केली.

१००) १९१६ च्या मे महिन्यात डॉ. गोल्डन मेजर यांच्या वादकथासभेत (सेमिनार) भारतातील जातीसंस्था, तिची यंत्रणा, उत्पत्ती आणि विकास (कास्ट इन इंडिया, देयर मॅकानिझम, जेनीसिस ॲण्ड डेव्हलपमेंट) या विषयावर भिमरावाने प्रबंध वाचला.

१०१) भिमरावाच्या मते मनू हा उद्धट व साहसी माणूस होता.

१०२) जून १९१६ मध्ये भारताच्या राष्ट्रीय नफ्याचा वाटा एक ऐतिहासिक प्रथकरणात्मक परिशिलन (नॅशनल डिव्हिडंट ऑफ इंडिया ए हिस्टोरिक ॲण्ड ॲनॅलिक्टिकल स्टडी) हा प्रबंध कोलंबिया या विश्वविद्यापिठाने स्विकारला. त्यावेळी तेथील विद्यार्थ्यांनी मेजवानी देऊन भिमरावाचे अभिनंदन केले.

१०३) इंग्लंडमधील पी.एस.किंग ॲन्ड सन्स या संस्थेने १९२४ मध्ये वरील प्रबंध दि इव्हुलेशन ऑफ प्रिव्हिश्नल फायनान्स इन ब्रिटीश इंडिया या नावाने प्रसिद्ध केला. भिमरावास कोलंबिया या विश्वविद्यापिठाने डॉ. ऑफ फिलासॉपी ही अतिउच्च बहुमानाची पदवी दिली.

१०४) हाच वरील प्रबंध डॉ. आंबेडकरांनी श्रीमंत सयाजीराव गायकवाड महाराजांना त्यांच्या विषयी आपले कृतज्ञतेचे द्योतक म्हणून अर्पण केला.

१०५) गुरूवर्य सेलिग्मन यांनी त्या प्रबंधाला प्रास्तावना दिली आहे.

१०६) गुरूवर्य सेलिग्मन भिमरावाच्या दि इव्हुलेशन ऑफ प्रिव्हिशनल दी फायनान्स इन ब्रिटीश इंडिया या प्रबंधास प्रस्तावना देऊन म्हणतात, या विषयाचा इतका सखोल आणि संगोपांग अभ्यास कोणी केल्याचे अद्याप आपणास माहित नाही. यावरूनच या ग्रंथाचे महत्व व मौलिकता लक्षात येते.

१०७) भारतातील चलन विषय मंडळासमोर डॉ. आंबेडकरांना बोलविण्यात आले होते त्यावेळी कमिशनच्या प्रत्येक सदश्यांच्या हाती आपला ग्रंथ पाहून आंबेडकरांना मोठी धन्यता वाटली.

१०८) सदर वरील ग्रंथात देशभक्तआत्मा ग्रंथकार आंबेडकरांशी समरस झालेला आहे.

१०९) ब्रिटीश नोकरशाही, साम्राज्यशाही, भारतातील सामाजिक प्रतिगामी शक्ती यावर उपरोक्त ग्रंथात चांगलेच कोरडे ओढलेले आहेत.

११०) भारतात ब्रिटीशांनी शांतता स्थापित केली. तरीही शांतता आणि सुव्यवस्था यावर लोकांनी समाधान मानावे असे समजणे अयोग्य आहे असे ग्रंथात म्हटले आहे.

१११) डॉ. आंबेडकरांनी लंडनहून २००० ग्रंथ विकत घेऊन मित्राच्या मदतीने भारतात आणले. त्यातील बरेच ग्रंथ गहाळ झाले होते.

११२) अमेरिकेत असताना विद्यार्थीआंबेडकरांना लाला लजपतराय यांनी राजकारणात ओढण्याचा बराच प्रयत्न केला. परंतु आंबेडकरांनी तो मोह टाळला.

११३) लाला लजपतराय यांना आंबेडकरांनी निश्चयपुर्वक परंतु नम्रपणे सांगितले की, बडोदे नरेश यांनी मला अपरमित सहाय्य केले आहे. त्यांना दिलेले वचन न मोडता आपला अभ्यास पूर्ण करणे माझे कर्तव्य आहे.

११४) अमेरिकेत असताना दोन घटनांचा आंबेडकरांच्या मनावर परिणाम झाला. पहिली घटना अमेरिकन राज्यघटनेतील गुलामगिरी नष्ट करणारी चौदावी दुरूस्ती. दुसरी घटना अमेरिकेतील निग्रो लोकांचा उद्धारकर्ता बुकर टी वॉशिंग्टन यांचा मृत्यू.

११५) जुलै १९१६ साली अभ्यास पुर्ण होताच डॉ. आंबेडकरांनी अमेरिका सोडली.

११६) कायद्याचा आणि अर्थशास्त्राचा अभ्यास करण्यास बडोदे नरेशांची परवानगी घेऊन कायद्याच्या अभ्यासासाठी ग्रेज इन मध्ये ऑक्टोंबर १९१६ ला नाव नोंद केले. त्याचवेळी लंडन स्कूल ऑफ इकॉनॉमिक्स आणि पॉलिटिकल सायन्स या संस्थेत अर्थशास्त्राच्या अभ्यासाकरीता प्रवेश मिळविला.

११७) लंडनच्या प्राध्यापकांनी आंबेडकरांची अर्थशास्त्राची प्रगती पाहून एकाच परिक्षेत न बसता त्याचवेळी डी.एस. सी. च्या परिक्षेची सिद्धता करण्याची अनुमती दिली.

११८) बडोद्याच्या दिवाणाचे पत्र आले की शिष्यवृत्तीचा कालावधी संपलेला आहे. तरी भारतात परत यावे.

११९) बडोद्याच्या दिवाणाचे नाव मुन्नाभाई मेहता होते. ते १० फेब्रुवारी १९२७ पर्यंत त्या पदावर होते.

१२०) १९१७ च्या ऑक्टोंबरपासून चार वर्षाच्या आत पुन्हा अभ्यास सुरू करण्याची अनुमती लंडन विश्वविद्यालयाकडून डॉ. आंबेडकरांनी मिळवली व परत भारतात येण्यासाठी निघाले.

१२१) बाबासाहेब आगबोटीने लंडनहून भारताकडे निघाले. आपले ग्रंथ भांडार आगबोटी भरले. बोट भूमध्य समुद्रात पाणसुरूंगाने बुडविण्यात आली. हे वृत्त भारतात कळले तेव्हा भारतात आंबेडकर अनुयायाची फारच तारांबळ उडाली.

१२२) डॉ. बाबासाहेब आंबेडकर त्या बोटीत न बसता दुसऱ्या बोटीने भारताकडे प्रयाण करीत होते.

१२३) २१ ऑगस्ट १९१७ रोजी डॉ. आंबेडकरांचे लंडनहून भारतात आगमन झाले.

१२४) २० ऑगस्ट १९१७ ला त्यावेळचे भारतमंत्री लॉर्ड मॉटेंगो यांनी ब्रिटीश साम्राज्यातील एक प्रमुख घटक म्हणून भारतात जबाबदार राज्यपद्धती क्रमशः स्थापून त्या देशातील स्वायत्ता शासन संस्थांना हळूहळू विकसित करण्याचा आणि राजकारभाराच्या प्रत्येक शाखेत हिंदी लोकांना अधिकाधिक अधिकार द्यावयाचा अशी महत्वाची घोषणा केली.

१२५) डॉ. आंबेडकरांचे स्वागत करण्यासाठी इलाखा शहर दंडाधिकारी रावबहादूर चिमणलाल सेठलवाड यांच्या अध्यक्षतेखाली संभाजी वाघमारे व इतर कार्यकर्त्यांनी योजना आखली परंतु डॉ. आंबेडकरांनी त्यांना अनुमती दिली नाही.

१२६) माझ्या स्वागत कार्यक्रमास होणारा खर्च गरीब विद्यार्थ्यांच्या शिक्षणासाठी खर्च करा असे डॉ. आंबेडकरांनी कार्यकर्त्यास सांगितले.

१२७) बडोद्याला जाण्यासाठी डॉ. आंबेडकरांकडे पैसे नव्हते. आगबोट बुडून सामानाची नुकसान भरपाई म्हणून थॉपस कुक कंपनीने पैसे दिले होते. त्यातील काही पैसे घरी देऊन बाबासाहेब बडोद्यास निघाले होते.

१२८) १९१७ च्या सप्टेंबरच्या दुसऱ्या आठवड्यात बाबासाहेब बडोद्याला पोहचले.

१२९) स्थानकावर जाऊन डॉ. आंबेडकरांचे स्वागत करावे असा आदेश सयाजीराव गायकवाड यांनी दिला होता. परंतु अस्पृश्याच्या स्वागतास कोण जाणार ?

१३०) एक महार तरूण बडोद्याच्या सचिवालयात नौकरीस राहणार अशी अगोदरच बडोद्यात वार्ता पसरली होती. खानावळीत किंवा वसतीगृहात डॉ. आंबेडकरांना कोणीही जागा दिली नाही.

१३१) एका पारशी वसतीगृहात नाव बदलून छुपेपणाने बाबा राहू लागले.

१३२) ऑफिसमधील शिपाईसुद्धा दुरूनच फाईली फेकून देत असत. पाणी पिण्यासाठी तेथे त्यांना परवानगी नसे.

१३३) पारश्याच्या वसतीगृहातून बाबांना अपमानितच होऊन निघावे लागले.

१३४) एका झाडाखाली बसून बाबासाहेब ढसाढसा रडले. वर आकाश खाली धरती हाच त्यांचा आसरा होता.

१३५) ज्ञानाने आणि विचाराने शिक्षणाने आणि गुणाने कितीतरी पटीने त्या सचिवालयातील सुशिक्षितापेक्षा डॉ. आंबेडकर श्रेष्ठ होते. अस्पृश्य कितीही विद्वान झाला आणि योग्यतेला पोहचला तरीही अस्पृश्य अस्पृश्यच राहतो असे या पंडितांचे मत होते.

१३६) डॉ. आंबेडकर उदीग्न अवस्थेत मुंबईस परत आले. केळुसकरांनी महाराजांना पत्राद्वारे कळवून खटपट केली परंतु काहीही उपयोग झाला नाही.

१३७) एका प्राध्यापकाने आंबेडकरांना आपल्या घरी राहण्यासाठी तयारी दर्शविली परंतु त्याच्या पत्नीपुढे त्याचे काहीच चालले नाही.

१३८) बडोद्याच्या नोकरीस कायमचा रामराम ठोकून डॉ. आंबेडकर मुंबईस परतले. त्याचवेळी त्यांची सावत्र आई निर्वतली. ते अंत्यसंस्कार बाबांनी यथाविधी पार पाडले. सावत्र आई व आंबेडकर कुटूंबियांचे कधीही जमले नाही.

१३९) नोव्हेबर १९१७ ला मुंबईमध्ये काँग्रेस लीग कराराचा विचार करण्यासाठी सर नारायण चंदावरकर यांच्या अध्यक्षेतेखाली अस्पृश्यांची परिषद भरली होती.

१४०) त्याच वेळी मुंबईत अस्पृश्यांची दुसरी परिषद भरली होती.

१४१) दोन्ही परिषदांचे ठराव आंबेडकरांना मान्य नव्हते.

१४२) काँग्रेस पुरस्कृत येजनेत भाग घेणे आंबेडकरांची मनिषा नव्हती.

१४३) काँग्रेस लिग योजना सदोष होती असे बाबासाहेब म्हणाले.

१४४) १९ मार्च १९१८ ला मुंबईत ३ री अस्पृश्यता निवारण परिषद भरली. त्या परिषदेचे अध्यक्ष बडोदा नरेश सयाजीराव गायकवाड महाराज होते.

१४५) तिसऱ्या अस्पृश्यता निवारण परिषदेस मुंबईत वल्लभभाई पटेल बॅ. मुकुंदराव जयकर, बाबू बिपिन चंद्रपाल उपस्थित होते.

१४६) कोल्हापुरचे डॉ. कुर्तकोटी, द्वारकेचे संकराचार्य, रविंद्रनाथ टागोर आणि गांधीचे संदेश परिषदेत आले होते.

१४७) स्वागत समितीचे अध्यक्ष नारायण चंदावरकर म्हणाले की परिषद आम्ही अस्पृश्य बांधवांच्या सदसद्विवेक बुद्धीला आव्हान करण्यासाठी, त्यांची विचारशक्ती जागी करण्यासाठी बोलविली आहे. सर्व भारतियांनी अस्पृश्यता नष्ट करावी म्हणुन परिषदेचे आयोजन केले आहे.

१४८) परिषदेचे अध्यक्ष सयाजीराव महाराज म्हणाले की अस्पृश्यता देवनिर्मीत नसुन, मानवनिर्मीत आहे, तिचा नायनाट व्हायलाच पाहिजे.

१४९) लोकमान्य टिळक, दादासाहेब खापरडे, ठक्कर बाप्पा परिषदेच्या दुसऱ्या दिवशी हजर झाले.

१५०) ठरावावर भाषण करताना टिळक म्हणाले अस्पृश्य वर्गाचा प्रश्न राजकीय किंवा सामाजिक दृष्ट्या लवकरच निकालात काढला पाहिजे.

१५१) ब्राम्हण, क्षत्रिय वर्गाला जे अधिकार आहेत तेच शूद्र वर्गाला आहेत. परंतु शूद्रांनी वैदिक मंत्र म्हणू नयेत. प्रत्यक्ष देव जर अस्पृश्यता पाळू लागला. तर, त्याला मी देव म्हणून ओळखणार नाही. पहिली ही रूढी ब्राह्मण लोकांनी निर्माण केलेली आहे हे मी जाणतो असे टिळक भाषणात म्हणाले.

१५२) परिषदेच्या शेवटी एक जाहीरनामा काढन्यात आला. त्या जाहिरनाम्यावर सही करण्याऱ्या पुढाऱ्याने वैयक्तीक दैनंदिनी जीवनात अस्पृश्यता पाळणार नाही अशी प्रतिज्ञा करायची होती. त्या जाहीरनाम्यावर टिळकाने स्वाक्षरी केली नाही.

१५३) ह्या परिषदेचे मुख्य सूत्रधार कर्मवीर शिंदे होते.

१५४) ह्या परिषदेत डॉ. आंबेडकरांनी भाग घेतला नव्हता. कारण सवर्ण हिंदूंने चालविलेल्या अस्पृश्यांच्या चळवळी विषयी ते उदासीन व साशंक होते.

१५५) डॉ. आंबेडकरांने टॉक्स ॲण्ड शेअर्स धंद्यातील लोकांना सल्ला देणारी कंपनी काढली. कंपनी चांगली चालू लागली परंतु ती कंपनी एका महाराची आहे असे समजल्यामुळे सल्ला घेणारे गिऱ्हाईक कमी झाले.

१५६) बाबासाहेबांनी तत्वज्ञ बर्ट्रान्ड रसियल यांच्या सामाजिक पुनर्रचनेची तत्वे या ग्रंथावर जनरल ऑफ दी इंडियन इकोनॉमिक्स सोसायटीच्या अंकात परिक्षात्मक एक लेख लिहिला. त्या ग्रंथाचे वर्णन बाबासाहेब लढाऊ इंग्रज असे करतात.

१५७) त्या ग्रंथात बाबासाहेब म्हणतात की, युद्धाचा नायनाट केवळ बौद्धिक पातळीवर आव्हान करून होणार नाही तर युद्ध पातळीला विरोध करणारे मनोविकाराने जीवनाकडे पाहणाऱ्या विधात्मक प्रवृत्ती यांच्या संवर्धनामुळे होईल.

१५८) क्रियाशिलतेमुळे वाढ होते. निश्चिंततेमुळे नाश होते.

१५९) समाजातील घटकांच्या एकमेकांच्या योग्य अशा समजूतदारपणावर सामाजिक पुनर्रचना अवलंबून असते.

१६०) डॉ. आंबेडकरांनी भारतातील जाती हा प्रबंध पुस्तक रूपाने प्रसिद्ध केला.

१६१) भारतातील लहान जमिनी आणि तदविषयक उपाय योजना या विषयावर प्रक्षोभक असा प्रबंध डॉ. साहेबांनी लिहिला.

१६२) मुंबईचे माजी राज्यपाल लॉर्ड सिडनहॅम यांच्या मदतीने बाबासाहेबांनी सिडनहॅम या कॉलेजात प्राध्यापकाची नोकरी धरली.

१६३) डॉ. आंबेडकरांची शिकविण्याची पद्धत पाहून इतर कॉलेजचे विद्यार्थी त्यांची परवानगी घेऊन वर्गात येऊन बसत असत.

१६४) चर्मकार समाजाने बाळू बाबाजी पालवणकर (पी.बाळू) यांना बाबासाहेबांनीच महानगर पालिकेतील (मुंबई) रिक्त असलेल्या जागेवर नेमणूक करण्यास भाग पाडले.

१६५) कोल्हापूर संस्थांचे शाहू महाराज अस्पृश्योद्धाराचे कार्य करीत होते. त्यांच्या हत्तीचा माहूत महार होता.

१६६) कनिष्ठ वर्गातील थोडेफार शिकलेल्या लोकांना छत्रपती शाहूंनी वकिलाच्या सनदा दिल्या. तसेच अस्पृश्य वर्गातील विद्यार्थाला राहण्याची, जेवणाची, शिक्षणाची योग्य मोफत सोय केली.

१६७) अस्पृश्याबरोबर शाहू महाराज उघडपणे भोजन करीत असत.

१६८) मॉटेंग्यु चम्सफर्ड सुधारकांच्या अनुसंधाने भारतात निरनिराळ्या जातींची मताधिकाराविषयी चौकशी करीत फिरत होती. अस्पृश्य वर्गाच्या वतीने कर्मवीर शिंदे व डॉ. आंबेडकरांची त्या समितीपुढे साक्ष झाली.

१६९) मॉटेंग्यु चाम्सफर्ड समितीपुढे साक्ष देताना डॉ. आंबेडकर म्हणाले ''स्वराज्य जसा ब्राह्मणांचा हक्क आहे, तसा तो महारांचाही हक्क आहे.

१७०) पुढारलेल्या वर्गाने दलितांना शिक्षण देऊन त्यांच्या मनाची आणि सामाजिक दर्जाची उंची वाढविणे त्यांचे आद्यकर्तव्य आहे. हे जोपर्यंत होणार नाही तोपर्यंत भारताच्या स्वराज्याचा दिन फारच दूर असणार हे निश्चीत.

१७१) दत्तोबा पोवार यांच्या मार्फत राजर्षी शाहू महाराजांशी प्रत्यक्ष परिचय होण्याचा योग जुळून आला.

१७२) शाहू महाराजांनी मुकनायक पाक्षिक काढण्यासाठी आर्थिक सहाय्य केले.

१७३) मुकनायक हे पाक्षिक बाबांनी ३१ जानेवारी १९२० रोजी चालू केले.

१७४) पांडुरंग नंदराम भटकर यांना बाबासाहेबांनी मुकनायकाचे संपादक म्हणून नेमले.

१७५) पांडुरंग भटकर महार समजाचे होते.

१७६) पांडुरंग भटकरांचे शिक्षण पुण्यात डी.सी. मिशनमधून मॅट्रिक पर्यंत झालेले होते.

१७७) पांडुरंग भटकर यांची पत्नी ब्राह्मण समाजाची होती.

१७८) मुकनायकाची जाहिरातसुद्धा केसरीमध्ये छापत नसत. त्यावेळी टिळक जीवंत होता.

१७९) मुकनायकच्या पहिल्याच अंकात लेखामध्ये डॉ. बाबासाहेब म्हटले की, हिंदुस्थान हा देश केवळ विषमतेचे माहेरघर आहे.

१८०) दुसऱ्या मुकनायकच्या अंकात बाबा म्हणाले, केवळ भारत स्वतंत्र झाल्यानेच सर्व कार्यभाग साधेल असे नाही. तर भारत हे असे राष्ट्र बनले पाहिजे की, ज्यात प्रत्येक नागरिकाला धार्मिक सामाजिक आर्थिक हक्काला वाव मिळाला पाहिजे.

१८१) इंग्रजी राज्यात ज्यांची बात सहन होत नाही त्यांची लाथ सोसावी लागणार म्हणून, असे स्वातंत्र घ्या की, त्यात आमचेही थोडेबहुत राज्य असावे.

१८२) कोल्हापुर संस्थानातील माणगांव येथे अस्पृश्यांच्या परिषदेस शाहू महाराज आपल्या लवाजम्यासह आले. परिषदेत अस्पृश्य वर्गास उद्देशून म्हणाले, तुम्ही तुमचा खरा पुढारी शोधून काढला. आंबेडकर तुमचा उद्धार केल्याशिवाय राहणार नाही. एकवेळ अशी येईल की, आंबेडकर संपुर्ण हिंदुस्थानचे पुढारी होतील अशी माझी मनोदेवता मला साक्ष देत आहे.

१८३) १९२० च्या शेवटी नागपुरला अस्पृश्यांची परिषद भरली. तिचे अध्यक्ष शाहू महाराज होते. त्या परिषदेस डॉ. आंबेडकरांची उपस्थिती होती.

१८४) डी.सी. मिशनच्या कर्मवीर शिंदेंनी अस्पृश्यांचे प्रतिनिधी नेमावेत राज्यपालांनी किंवा अस्पृश्यांच्या संस्थांनी निवडू नयेत असे सरकारण निवेदन दिले होते.

१८५) डॉ. आंबेडकरांनी डि.सी. मिशनच्या धोरणाला विरोध केला आणि शिंद्यांच्या मताप्रमाणे सरकारने निर्णय घेऊ नये असा परिषदेत ठराव पास करून घेतला. हा आंबेडकरांच्या सार्वजनिक आयुष्यातील पहिला विजय आहे.

१८६) परिषद संपल्यानंतर आंबेडकरांनी महारातील अठरा उपजातीतील पुढाऱ्यांचे सहभोजन घडवून आणले.

१८७) आंबेडकरांनी अभ्यास पुर्तीसाठी नवल भाथेनाकडून पाच हजार रूपये वचन चिठ्ठीवर घेतले होते. स्वत:च्या वेतनातून काही पैसे शिल्लक ठेवले होते. तसेच कोल्हापुरच्या महाराजाकडून काही आर्थिक मदत मिळवून घेतली. सिडनहॅम विद्यालयाच्या प्राध्यापक पदाचा राजीमाना देऊन लंडनला पुढील शिक्षणासाठी गेले.

१८८) आंबेडकर लंडनमध्ये ज्या खोलीत राहत होते त्या खोलीत मुंबईचे एक आस्नोडकर नावाचे गृहस्थ राहत असत. ते कळकळीने आंबेडकरांना म्हणत असत, काय हो आंबेडकर! आता उत्तररात्र झालेली आहे जरा विश्रांती घ्या. यावर आंबेडकर म्हणत असत, माझ्याकडे विश्रांतीसाठी वेळ नाही व अन्नासाठी पैसा नाही. वेळ अपुरा. विद्या जास्त असल्यामुळे मला विश्रांती घेऊन कसे चालेल.

१८९) लंडनला असताना आंबेडकर ज्या बाईकडे खानावळीत राहिले होते, ती बाई त्यांना सकाळी एक कप चहा, एक पाव व चिंचोक्य एवढे लोणी देत असे.

१९०) दुपारी सॅण्डविचचे दोन तुकडे म्युझियमध्येच ते खात असत.

१९१) संध्याकाळी त्यांच्या गुजराती मित्राने दिलेल्या पापडाच्या करंडीतील दोन पापड पत्र्यावर भाजून खात असत. भुकेने जास्त अस्वस्थ वाटल्यास संध्याकाळी एक पेला ब्रॉव्हरी बरोबर दोन बिस्किटे खात असत.

१९२) आंबेडकर लंडनमध्ये असताना फारच काटकसरीने खर्च करीत असत. त्यांचा मासिक खर्च आठ पौंडांपेक्षा जास्त नसे.

१९३) अमिरेकेचे अध्यक्ष बेंझमिन फ्रँकलिन म्हणत असत की, आयुष्यात यश दोन गोष्टीवर अवलंबून असते. एक अखंड उद्योग, दुसरी काटकसरीची राहणी.

१९४) एका संस्कृत शास्त्र्याची पत्नी (लंडनच्या उपनगरात राहत असतेवेळी) आंबेडकरांना बंधू मानत असते. ती आठ-पंधरा दिवसातून एकदातरी आंबेडकरांना जेऊ घालत असे. परंतु आंबेडकरांनी तिला जात समजू दिली नव्हती.

१९५) मुलाच्या व पुतण्याच्या शिक्षणासाठी आंबेडकर शिताराम शिवतरकर यांना पत्राद्वारे विनंती करीत असत.

१९६) मॅककुलॉकृत व्हिकार्डो ग्रंथ त्यांना पाहिजे होता. तो ग्रंथ मुंबईमध्ये जुन्या पुस्तकाच्या दुकानात होता. तो कसा मिळवायचा हे बाबांनी सिवतकरांना पत्राने कळविले होते.

१९७) डॉ. आंबेडकर लंडनला असताना टिळक मृत्यू पावला.

१९८) टिळकानंतर गांधीयुग सुरू झाले. गांधीयुगाला आंबेडकर तमोयुग म्हणत असत.

१९९) राष्ट्रीय सभेने टिळक निधी जमविला होता. तो निधी अस्पृश्यता निवारण्यासाठी वापरावा असे म्हणूनच उभारला होता. परंतु अस्पृश्यता निवारणे हे हिंदु महासभेचे काम आहे असा निवाडा राष्ट्रीय कार्यकारीणी सभेने दिल्यामुळे तो निधी अस्पृश्यता निवारण्यासाठी देण्यात आला नाही.

२००) भारतमंत्री लॉर्ड मॉंटेग्यु यांची भेट घेऊन आंबेडकरांनी अस्पृश्यांची गाऱ्हाणी त्यांच्या कानावर घातली.

२०१) लॉर्ड मॉंटेग्यु बरोबर झालेल्या चर्चेबद्दल आंबेडकरांनी छत्रपती शाहू महाराजांस दि. ३/२/१९२१ ला कळविले होते.

२०२) संधी मिळेल त्या वेळेस वजनदार इंग्रज व्यक्तीस मी हिंदुस्थानातील सामाजिक व राजकिय परिस्थितीबद्दल योग्य ती कल्पना देईनच असे पत्रात नमूद केले होते.

२०३) माँटेग्यु ने आंबेडकरांना पुन्हा भेटण्यासाठी बोलविले व विधीमंडळात सभासद म्हणून मी भारतात परत जावे असा सल्ला त्यांनी दिला व आग्रह धरला.

२०४) हिंदुस्थानचे महाराज्यपाल व मुंबईचे राज्यपाल यांना माँटेग्युने तारेने कळविले की, आंबेडकरांची विधीमंडळात सभासद म्हणून नियुक्ती करावी. परंतु आंबेडकर म्हणाले की मी वैयक्तीक गाऱ्हाणे मांडण्यासाठी येथे आलो नाही. मी अस्पृश्यांचा प्रतिनिधी म्हणून येथे आलो आहे.

२०५) १९१९ साली कायद्याने अस्पृश्यांना विधीमंडळात प्रतिनिधीत्व मिळाले.

२०६) केंद्रीय विधीमंडळात सरकार नियुक्त १४ सदस्यापैकी, एक मध्य प्रदेशातला प्रतिनिधी, मध्यप्रांतातल्या विधीमंडळात चार, मुंबई प्रांत विधीमंडळात दोन, बंगालमध्ये एक, उत्तरप्रदेशात एक असे नऊ अस्पृश्यांना प्रतिनिधीत्व मिळाले.

२०७) प्रॉव्हिशनल डिसेंट्रालायझेशन ऑफ इंप्रेरिअल फायनान्स इन ब्रिटीश इंडिया हा विषय लिहून आंबेडकर जून १९२१ मध्ये एम. एस.सी झाले.

२०८) ४ सप्टेंबर १९२१ रोजी चालू चलनाचा भाव घसरल्यामुळे लंडनहून छत्रपती शाहू महाराजांना २०० पौंड पाठविण्याची पत्राद्वारे विनंती केली होती. त्या पत्रात भारतात आल्यावर व्याजासह रक्कम परत करीन असे आश्वासन दिले होते.

२०९) दि प्रॉब्लेम ऑफ रूपी हा प्रबंध आंबेडकरांनी १९२२ साली लंडन विद्यापिठाला सादर केला. त्याच वेळी ते बॅरिस्टरची परिक्षा उत्तीर्ण झाले होते.

२१०) छत्रपती शाहू महाराज मुंबईला ६/०५/१९२२ रोजी निधन पावले.

२११) १०/०५/१९२२ रोजी मी माझ्या एका विश्वासूमित्रास मुकलो असे राजाराम महाराजांस पत्राद्वारे कळवून शोक व्यक्त केला.

२१२) इंग्रज प्राध्यापकांनी प्रॉब्लेम ऑफ द रूपी या प्रबंधाचा तिखटपणा कमी करण्यासाठी डॉ. आंबेडकरांना सूचना केली होती. कारण इंग्रज प्राध्यापकांच्या राष्ट्रीय बाण्याला झोंबेल असाच तो प्रबंध होता.

२१३) लंडन विश्वविद्यालयाच्या विद्याभ्यासापुढे आंबेडकरांनी जबाबदार सरकारचे दायित्व या विषयावर निबंध वाचला. त्यातील कडक बोचक विधाने व विचारसरणी पाहून लंडन विश्वविद्यालयातील वातावरण तापले होते.

२१४) लंडन स्कुल ऑफ इकॉनॉमिक्स मध्ये असताना प्रा. हेरॉल्ड लॉस्की यांना निबंधातील विचार जहाल वाटल्यामुळे आंबेडकर भारतातील क्रांतीकारी गटाचे व मताचे आहेत असा इंग्रज गुप्तआरक्षकांचा संशय होता.

२१५) लालाजीचा व डॉ. आंबेडकरांचा संबंध अमेरिकेत आला होता म्हणून आंबेडकरांच्या नावाची नोंद क्रांतीकारकांच्या यादीत झाली होती.

२१६) १४/०४/१९२३ ला डॉ. आंबेडकरांचे लंडनहून भारतात आगमन झाले.

२१७) डिसेंबर १९२६ ला लंडन विद्यापिठाने आंबेडकरांना डॉ. ऑफ सायन्स ही पदवी दिली.

२१८) डॉ. आंबेडकरांनी दि प्रॉब्लेम ऑफ दि रूपी हा प्रबंध कृतज्ञापुर्वक आपल्या आई-वडिलांस अर्पण केला.

२१९) दि प्रॉब्लेम ऑफ दि रूपी हा प्रबंध अत्यंत खुबीने लिहिल्याबद्दल इंग्लंडमध्ये त्याचे प्रा. एडविन कॅनन यांनी आंबेडकरांची पाठ थोपटली.

२२०) डॉ. आंबेडकरांनी अर्थशास्त्र, समाजशास्त्र, मानववंशशास्त्र, धर्मशास्त्र, निर्बंधशास्त्र इतिहासात पारंगत होऊन ३ विश्वविद्यालयातील ज्ञान संपादन केले. ते बुद्धीमान व सामर्थशाली पुरूष बनले होते.

२२१) राज्यकारणी धुरंधराला व अर्थशास्त्राच्या पंडिताला आव्हान देणारे पांडित्य डॉ. आंबेडकरांजवळ होते.

२२२) जुलै १९२३ साली सनद घेऊन आंबेडकरांनी वकिली व्यवसायास सुरूवात केली.

२२३) परकीय सरकारचे जातभाईच जास्त वकिल असल्यामुळे लोक युरोपियन वकिलांना आपले वकीलपत्र देत असत.

२२४) डॉ. आंबेडकर कधीकधी म्हणत की वरिष्ट न्यायालयातील न्यायाधिशाचे पद मी मिळवणार आहे.

२२५) एखादा समाज जेव्हा स्वत:च्या मतस्वातंत्र्यासाठी हक्काच्या प्राप्तीसाठी आग्रह धरतो तेव्हाच त्याची खरी सुधारणा होती.

२२६) विधीमंडळातील अस्पृश्यांचे पहिले प्रतिनिधी ज्ञानदेव ध्रूवनाथ घोलप हे होते.

२२७) भंडारी जातीच्या आनंदराव सुर्वे यांनी ठाणे जिल्ह्यात अस्पृश्यांना सार्वजनिक वाहनात घेत नाहीत हे सत्य आहे की नाही याविषयी प्रश्न विचारले होते.

२२८) ३ ऑगस्ट १९२३ रोजी सर्वात मोठा क्रांतीकारक ठराव रावबहादूर सिताराम केशव बोले यांनी विधीमंडळात मांडला होता.

२२९) अस्पृश्यांना सार्वजनिक पाणवठे धर्मशाळा, विद्यालये, न्यायालये अशा सार्वजनिक ठिकाणी मुक्तद्वार असावे असा तो ठराव होता.

२३०) रावबहादूर सी.के. बोले म्हणत असत की, अस्पृश्यता हा आपल्या मातृभूमीच्या नावाला लागलेला मोठा कलंक आहे.

२३१) सी.के.बोले यांना मुंबईतील कार्यकर्त्याने सुवर्ण पदक देऊन सत्कार केला होता.

२३२) ४ ऑगस्ट १९२३ हा क्रांतीकारी ठराव सरकारने मंजूर करून सर्व जिल्हाधिपती नगर संस्था जिल्हामंडळे मुंबईतील नगरपालिकेचे प्रमुख अधिकारी इम्प्रमेंट ट्रस्टचे अध्यक्ष यांनी त्या ठरावाची अंमलबजावणी करावे असे परिपत्रक काढले.

२३३) गांधीच्या मदतीने महंमद अली जीनाने अस्पृश्यांची वाटणी हिंदु-मुसलमानात समान असावी अशी मागणी मांडली.

२३४) मद्रासमध्ये गांधीच्या सत्कार प्रसंगी एक मुसलमान पुढाऱ्याने तर गांधीच्या समोर अस्पृश्यांना मुसलमान करून घेणे हे आमचे पुण्य कर्तव्य आहे अशी असुरी महत्वकांक्षा उच्चारली तेव्हा गांधीच्या चेहऱ्यावर नापसंतीची छटासुद्धा उमटली नाही.

२३५) सावरकर ६/०१/१९२४ ला येरवड्याच्या तुरूंगातून सुटले.

२३६) गांधीची प्रकृती बिघडली म्हणून त्यांची ११/०२/१९२४ रोजी तुरूंगातून सुटका झाली.

२३७) ०९/०३/१९२४ रोजी सायंकाळी ४ वाजता दामोदर ठाकरसी सभागृह परळ (मुंबई) येथे आंबेडकरांनी अस्पृश्यांच्या सामाजिक व राजकीय अडचणी सरकारसमोर मांडण्याचा ठराव करण्यासाठी सभा घेतली.

२३८) २० जुलै १९२४ रोजी बहिष्कृत हितकारणी सभेची स्थापना झाली.

२३९) बहिष्कृत हितकारणी सभेचे अध्यक्ष सर चिमणलाल हिरालाल शेठलवाल होते. कार्यकारी मंडळाचे अध्यक्ष डॉ. आंबेडकर होते. कार्यवाहक सिताराम नामदेव शिवतरकर कोषाध्यक्ष निवृत्ती तुळशीदास जाधव होते.

२४०) गांधीपूर्वी काँग्रेसची ४०पेक्षा जास्त अधिवेशने झाली होती.

२४१) अस्पृश्यांबद्दल स्पर्श पुढाऱ्यांची तळमळ वरकरणी होती. कचरा डोळ्यात आणि फुंकर कानात अशी त्यांची करणी होती.

२४२) श्रीमंत सयाजीराव गायकवाड व छत्रपती शाहू महाराज यांच्या प्रयत्नाने अस्पृश्यता निवारण्यास बरीच गती मिळाली होती.

२४३) म. फुले नंतर अस्पृश्यांच्या हृदयात आत्मोन्नतीचा प्रकाश पाडणारे डॉ. आंबेडकरच आहेत.

२४४) अस्पृश्यता निवारण्याच्या आघाड्यावरील सर्व पुढारी सनातनी वृत्तीचे होते.

२४५) श्रद्धानंद, परमानंद, सावरकर सर्व हिंदू महासभेत होते. परंतु हिदू महासभा अस्पृश्यांसाठी काहीही करू शकली नाही. कारण हिंदु महासभावाल्यांना हिंदूंचे संघटन करणे अधीकच गरजेचे वाटत होते.

२४६) हिंदू महासभेला समाजाची समतेवर अधिष्ठीत अशी पुर्नघटना करायची नव्हती.

२४७) अस्पृश्यता निवारण्यासाठी भूमिका सावरकर गांधी पेक्षा आंबेडकरांची भूमिका वेगळी होती कारण ते स्वत: अस्पृश्य वर्गात जन्मले होते. अस्पृश्यता जन्म यमयातनांच्या अग्निदिव्यातून ते होरपळून निघाले होते.

२४८) अस्पृश्यांचे दु:ख दुर्दैव आणि दैन्यावस्था पाहून डॉ. आंबेडकरांचे डोके भणाणून जात असे. त्यांना भयंकर यातना होत असत. त्यांची आतडी पिळपटून निघत असत. डोळ्यातून ठिणग्या उडत. हृदयातले कड अनावर होत असत.

२४९) अनुभवासारखा गुरू नाही हे सत्य आहे.

२५०) खऱ्या शौर्यशाली व झुंजार विराला दुसऱ्याच्या ओंजळीने पाणी पिणे अपमानास्पद वाटते.

२५१) स्पृश हिंदूंच्या भूतदयेचा डॉ. आंबेडकरांना तिरस्कार वाटत असे. ते म्हणत असे आम्हाला दयेचे दान नको हक्क हवे आहेत.

२५२) आत्मोद्धार ज्याचा त्यानेच करावयाचा असतो. हा महामंत्र डॉ. आंबेडकरांनी समाजाला दिला.

२५३) गुलामाला गुलामीची जाणीव करून दिल्याशिवाय तो बंड करून उठत नाही.

२५४) स्वाभिमान स्वावलंबन आत्मोद्धार हीच बाबांची त्रयसूत्रे होती.

२५५) आई च्या आणि दाईच्या हृदयात (वात्सल्यात) जे अंतर असते तेच अंतर डॉ. आंबेडकर गांधी व सावरकर यांच्यात होते.

२५६) आम्हाला सामाजिक व धार्मिक गुलामगिरीतून मुक्त करा. मगच आम्ही राजवस्य स्वातंत्र्यासाठी तुमच्या खांद्याला खांदा लावून प्राणपणाने लढू असे डॉ. आंबेडकर म्हणत.

२५७) बहिष्कृत हितकारणी सभेचे जानेवारी १९२५ ला सोलापूर येथे पहिले वसतिगृह चालू केले.

२५८) त्या वसतीगृहाचे पहिले पर्यवेशक जिवाप्पा सुभान्ना कांबळे होते.

२५९) विद्यार्थ्यांच्या ज्ञानात भर पडावी म्हणून बहिष्कृत हितकारणी सभेकडून सरस्वती विलास नावाचे मासिक सुरू केले होते.

२६०) तरूण व प्रौढ अस्पृश्यांसाठी रात्रीच्या शाळा आणि ५ वाचनालयाची प्रथा ब.हि.सभेने सुरू केली.

२६१) डॉ. आंबेडकर समाजाला उद्देशून म्हणत असत तुमची ही दीन वदने पाहून व करूणाजनक वाणी ऐकून माझे हृदय फाटते. युगानुयुगे तुम्ही गुलामगिरीच्या गर्तेत गंजत कुडत सडत पडलात तरीही तुमची भावना आहे की हे सर्व इश्वर निर्मी आहे. तुम्ही गर्भात असतानाच का मेला नाहीत. जर तुमच्या जिवनाचे पुनरूज्जीवन होत नसेल तर तुम्ही या जगातून नाहीशे होऊन जगाच्या दु:खाचे ओझे नाहीशे करा.

२६२) अन्न, वस्त्र, निवारा मिळणे इतर भारतीयांप्रमाणे तुमचाही जन्मसिद्ध हक्क आहे.

२६३) १५/१२/१९२५ रोजी भारतीय चलनासंबंधी रॉयल कमीशनपुढे डॉ. आंबेडकरांची साक्ष झाली.

२६४) मद्रासमध्ये मुरगेसन नावाच्या अस्पृश्यांना बंदी हुकूम मोडून मंदिरात प्रवेश केला त्याला न्यायालयाने शिक्षा ठोठावली. देवदर्शनाने त्याला जे फळ मिळाले त्यावरून दगडाच्या मुर्तीत देव नसतो हे त्याला समजले.

२६५) १९२५ मध्ये राजरत्न जन्मले. जुलै १९२६ ला कालवश झाले.

२६६) राजरत्नाचा अंत बाबासाहेबांच्या मांडीवर झाला.

२६७) १६ ऑगस्ट १९२६ ला दत्तोपंत पोवाराला लिहिलेल्या पत्रात उल्लेख केला की आतापर्यंत ३ मुले व एका मुलीला माती देण्याचा प्रसंग माझ्यावर ओढावला. राजरत्नाच्या मृत्यूने तर जीवनाला चव आणणारे मिठच नष्ठ झाले.

२६८) ऑक्टोंबर १९२६ ला बागडे, जेधे, जवळकर या पुण्यातील ब्राम्हणेतर पुढाऱ्याविरूद्ध ब्राह्मणांनी ब्राह्मणांची मानहानी केल्याबद्दल दावा दाखल होता.

२६९) जेधे, बागडे, जवळकर यांनी देशाचे दुश्मन नावाचे पुस्तक प्रकाशित करून त्यात ब्राह्मणांनी देशाचा नाश केला असा उल्लेख केला आहे.

२७०) ब्राम्हणाचे वकिलपत्र पुण्यातील प्रख्यात वकील पंडीत ल.ब. भोपटकर यांनी घेतले होते. जेधे बागडे यांचे वकील डॉ. आंबेडकर होते. केसमध्ये डॉ. आंबेडकर विजयी झाले.

२७१) बोले ठरावाची अंमलबजावणी होत नव्हती म्हणून ५/०८/१९२६ रोजी बोलेंनी विधीमंडळात ठराव मांडला. ज्या नगरसंस्था जिल्हामंडळे बोले ठराव अमलात आणणार नाही त्यांचे वर्षासन त्यांना मिळणार नाही.

२७२) बोले ठरावाबद्दल बरेच वादळ उठले. त्यावेळी सिंधमध्ये एक नूर महंमद नावाचा मुसलमान विधीमंडळात म्हणाला की वरिष्ट वर्गाकडून चिडलेला कनिष्ट वर्गातील लोक जेव्हा परधर्मियांच्या आश्रयास जातील तेव्हा हिंदूंने मुसलमानाने किंवा ख्रिश्चनाने त्यांना धर्मांतर करण्यास प्रवृत्त केले अशी विनाकारण ओरड करू नये.

२७३) डॉ. आंबेडकरांचे वकीलीचे कार्यालय शोषल सर्वीस लीगच्या इमारतीत छोट्याशा खोलीत होते.

२७४) कोल्हापुचे शाहू महाराज आंबेडकरांना त्यांच्या वकीलीच्या कार्यालयात भेटले होते.

२७५) मुसलमानाचे पुढारी शौकत आली. डॉ. आंबेडकरांना त्याच्या वकीलीच्या कार्यालयातच भेटले होते.

२७६) जून १९२५ ते मार्च १९२८ पर्यंत दिवसातून काहीवेळेसाठी बाटलीबॉय अकाऊंटन्शी ट्रेनिंग निस्ट्युट्युट या संस्थेत डॉ. आंबेडकरांनी शिक्षक म्हणुन काम केले.

२७७) डॉ. आंबेडकर पददलित लोकांची वकीली पैसे न घेता करीत असत.

२७८) महार जातीला सैन्यात प्रवेशबंदी आणली होती ती प्रवेश बंदी उठवण्यासाठी डॉ. आंबेडकरांनी पुण्याच्या कोरेगाव युद्धस्मारकासमोर सभा घेऊन, ब्रिटीशांचा तीव्र जळजळीत शब्दात समाचार घेऊन निषेध व्यक्त केला. बंदी उठवली नाही तर सरकारच्या विरूद्ध चळवळ उभी करीन. अस्पृश्यांचे बळ इंग्रजांच्या पाठी नसते तर, हा देश कधीही इंग्रजांना काबीज करता आला नसता.

२७९) सरकारने डॉ. आंबेडकरांच्या भाषणाची, इशाऱ्याची दखल घेऊन त्यांची विधीमंडळास सदस्य म्हणून नेमणूक केली.

२८०) १९२७ साली अस्पृश्य समाजातील शिक्षकांनी डॉ. आंबेडकरांचा सत्कार केला व थैली अर्पण केली. परंतु ती थैली त्यांनी तशीच बहिष्कृत हितकारणी सभेस अर्पण केली.

२८१) महाडला कुलाबा जिल्हा बहिष्कृत परिषद दि. २० मार्च १९२७ रोजी झाली.

२८२) महाडच्या पहिल्या परिषदेश सुरबा टिपणीस सुभेदार विश्राम गंगाराम सावदेकर, संभाजी तुकाराम गायकवाड, शिवराम गोपाळ जाधव, अनंतराव चित्रे, रामचंद्र मोरे या पुढाऱ्यांनी परिषद यशस्वी करण्यासाठी अतिशय कष्ट घेतले.

२८३) महाडच्या तळभागात चवदार तळ्यापासून सुमारे २ फर्लांग अंतरापर्यंत ही परिषद भरली होती.

२८४) परिषदेसाठी स्पृश्य हिंदूंकडून विकत पाणी घेतले होते.

२८५) महाडामधील बाबूराव जोशी धारीया, तुळाराम मिठा इ. स्पृश्य पुढारी हजर होते.

२८६) सितारामपंत शिवतरकर, गंगारामपंत, सहस्त्रबुद्धे, अनंतचित्रे, भा.कृ. गायकवाड, बाळाराम आंबेडकर, पानराजभोज, शांताराम, अ.उपश्याम, रामचंद्र मोरे, रामचंद्र शिर्के या परिषदेस आले होते.

२८७) महाड परिषद स्वागताध्यक्ष संभाजी गायकवाड यांच्या भाषणाने सुरू झाली.

२८८) आचार, विचार, उच्चार जोपर्यंत सुधारत नाहीत तोपर्यंत समाजात जागृतीचे अथवा प्रगतीचे बीज रूजत नाही असे डॉ. आंबेडकर म्हणत.

२८९) मृत जनावराचे मांस खाणे प्रतिज्ञापुर्वक बंद करा.

२९०) आपल्याला आपले हित साध्य करायचे असेल तर सरकारी नौकरीत आपला प्रवेश झाला पाहिजे.

२९१) पुर्वीची वडिलोपर्जित कामे बंद करा.

२९२) महारांनी वतनाची कामे सोडावीत आणि जंगलातल्या जमिनी मिळवून शेती करावी.

२९३) गोपाळ बाबा वलंगकर यांनी १८९३ साली दापोली येथे अनार्य दोष परिहारक मंडळी नावाची संस्था करुन महाराष्ट्रात अस्पृश्यता निवारण करण्याचे कार्य चालू केले होते.

२९४) महाड परिषदेत अनंतराव चित्रे त्वेषाने म्हणाले आपण महाड नगरपालिकेचा ठराव अंमलात आणूया. त्यावेळेस जोरजोरात बोलणारी सारी मंडळी सभामंडपातून पळून जाऊ लागली. अविचार उतावळेपणा आम्हाला गावात रहायचे आहे असे म्हणून जाऊ लागली असता डॉ. आंबेडकर म्हणाले आमचे विचार तसे आचार आहेत. तुम्ही तुमचा मार्ग सुधारा.

२९५) महाड नगर पालिकेने तळे खुले करण्याचा ठराव घेतला होता. परंतु अंमलबजावणी होत नव्हती.

२९६) स्वातंत्र्याचे हक्क मागून मिळत नसतात ते स्वसामर्थ्याने हस्तगत करायचे असतात.

२९७) कृतीशुरपणा हा इतिहास घडविणाऱ्या थोर पुरूषाचा देहभाव असतो.

२९८) २० मार्च १९२७ रोजी आंबेडकरांनी तळ्याला स्पर्श करून तळे पवित्र केले.

२९९) १३ मार्च १९२७ रोजी डॉ. आंबेडकर मुंबईस रवाना झाले.

३००) पेशव्याच्या काळात गळ्यात मडके व कमरेला झाडाची फांदी बांधल्याशिवाय अस्पृश्यांना पुण्यात फिरता येत नव्हते. तसेच जेव्हा लांब सावली पडत असे तेव्हा अस्पृश्यांना रहदारीचे रस्ते बंद असत.

३०१) बाबासाहेबांचे वडील बंधू बाळाराम बाबासाहेबांस म्हणाले संकटमय प्रसंग ओढवून घेण्यापेक्षा आपला वकीलाचा धंदा करावा. म्हणे! मी दलितांचा उद्धार करणार. बाबासाहेब एकही शब्द न बोलता गप्प बसले. बाळाराम गेल्यानंतर स्वत:शीच काहीशे पुटपुटले व म्हणाले, माझे हित समाजाच्या कल्याणामध्ये आहे की कशात आहे हे मी चांगले ओळखतो.

३०२) महाडच्या तळ्यात प्रवेश केल्यामुळे तळे बाटले असे धर्मबुडवे सनातनी म्हणू लागले.

३०३) तळ्याला कसलाही बाट झालेला नाही असे सांगण्यासाठी महाडचे तरूण पुढारी बाबूराम जोशी यांनी तळ्यात उडी मारून स्नान केले.

३०४) बाबूराव जोशीवर सनातन्यांनी ग्रामण्य भरले. त्यांना वाळीत टाकले.

३०५) वंगभंगाची अनुभूतपुर्व चळवळ टिळकांचा सुरत संग्राम सावरकरांची मार्सेलिस मधील त्रिखंडात गाजलेली उडी, गांधीची दांडी यात्रा, खुदीराम बोसने फेकलेला पहिला बॉम्ब, सुभासबाबूंचा शेवटचा संग्राम या घटनांनी भारताच्या इतिहासाला जशी महत्वाची कलटणी दिली त्याहीपेक्षा जास्त महत्वाची कलाटणी त्यावेळी एकट्या महाड संग्रामाने भारताच्या सामाजिक पुनर्रचनेच्या कार्याला दिली।

३०६) युरोपामध्ये जसा जर्मनी पराक्रमी तसा भारतात महाराष्ट्र पराक्रमी आहे. आधुनिक भारतात राजकिय आणि सामाजिक क्रांतीचा प्रारंभ महाराष्ट्रातच झाला.

३०७) महाडमध्ये स्पृश्यांनी अस्पृश्यांवर केलेल्या भेकड हल्ल्याचा निषेध "ब्राम्हण व ब्राम्हणेतर पाक्षिकांचे" संपादन देवराव नाईक आणि केशव ठाकरे यांनी प्रक्षोभक भाषणाद्वारे केला.

३०८) केशवराव ठाकरे व देवराव नाईक यांना महारांनी पाणी देऊन त्यांचे सत्व पाहिले गेले. ते तत्ववीर सत्वांस जागले होते.

३०९) आपल्या धर्माच्या आणि स्वत:च्या माणसाच्या स्पर्शाने पाणी बाटते व तेच पाणी पशुंच्या मुताने शुद्ध होते ही बाब तिरस्कारणीय आहे हे सावरकरांनी कबूल केले होते.

३१०) डॉ. आंबेडकरांचे धर्मांतर सावकराला मान्य नव्हते.

३११) ३/०४/१९२७ ला बहिष्कृत भारत पाक्षिक सुरू केले.

३१२) मुकनायक १९२३ पुर्वीच बंद पडले होते.

३१३) बहिष्कृत भारत या पाक्षिकातून डॉ. आंबेडकर आपल्या अनुयायांस सल्ला देत तर टिकाकारावर हल्ला चढवीत असत.

३१४) हिंदुस्थानची शक्ती अस्पृश्यतेमुळे व जातीभेदामुळे क्षय पावली असे डॉ. आंबेडकर म्हणत.

३१५) डॉ. आंबेडकरांना भ्याड पुढारी व पत्रकार विचारत की लोकमत अनुकूल नसल्यामुळे अस्पृश्यता नष्ट होणार नाही. त्यांना डॉ. आंबेडकर उत्तर देत असत लोकमत अनुकूल नसताना तुम्ही स्वातंत्र्याची मागणी कशी करता ?

३१६) टिळक अस्पृश्य वर्गात जन्मले असते तर त्याने स्वराज्य माझा जन्मसिद्ध हक्क आहे असे म्हणण्याऐवजी अस्पृश्यता नष्ट करणे हा माझा जन्मसिद्ध हक्क आहे असे म्हटले असते.

३१७) बकऱ्याला बळी देतात सिंहाला नाही.

३१८) वैराटगड जिंकणारा नागनाक, खर्ड्याच्या लढाईत नाव गाजविणारा सिदनाक, रायगडचा किल्ला इंग्रजांच्या विरूद्ध लढविणारा रायनाक, बाजी महाराच्या शौर्यगाथांची डॉ. आंबेडकर शिकवण देत असत.

३१९) नवीन विधीमंडळाचे कामकाज १३/०२/१९२७ रोजी सुरू झाले.

३२०) अर्थसंकल्पावर डॉ. आंबेडकरांचे भाषण २४/०२/१९२७ रोजी झाले.

३२१) ब्रिटनमधील हिंदी विद्यार्थ्याला आणि आफ्रिकेतील हिंदी लोकांना अपमानकारक रीतीने वागणूक दिली जात असे. म्हणून हिंदी लोक ब्रिटन व आफ्रिकेच्या राज्यकर्त्याचा निषेध करीत असत.

३२२) हिंदी लोक भारतात अस्पृश्यांना कशी वाईट वागणूक देतात हे बाबासाहेब त्यांच्या निदर्शनस आणून देत असत.

३२३) शेतकऱ्यांना शेतसारा जास्त भरावा लागत असे. तो शेतसारा बाबासाहेबांनी कमी केला. अद्यापपर्यंत कमी केलेला शेतसारा शेतकरी भरत आहेत.

३२४) शाळा ही एक पवित्र संस्था आहे. शाळा देशाचे चांगलेनागरिक तयार करते. शिक्षकवर्ग राष्ट्राचा सारथी आहे.

३२५) ब्राह्मणाच्या हाती शिक्षण क्षेत्रे देऊ नयेत.

३२६) बदलापूरला शिवजयंती झाली त्यावेळी बाबासाहेब अध्यक्षपदी होते.

३२७) शिवाजीने स्थापन केलेले स्वराज्य समाजातील विषमतेमुळे आणि पेशवाईमुळे धुळीस मिळाले असे बाबासाहेब भाषणात म्हणाले.

३२८) पुण्याच्या मांगवाड्यात जुलै १९२७ ला सभा झाली. मांगांचे म्हणणे होते की डॉ. आंबेडकर फक्त महारांचे पुढारी आहेत इतर समाजावर दुर्लक्ष करतात. त्या सभेच्या अध्यक्षस्थानी दिनबंधू पत्रकांचे संपादक नवले होते. सभेच सुभेदार घाटगे राजभोज क.म.जाधव वऱ्हाडचे अनंत स्वामी आर्यसामाजिष्ट ओबले होते. मांगांना उत्तर देताना डॉ. आंबेडकर म्हणाले मी माझ्या घरी मांगाचा मुलगा शिक्षण घेण्यासाठी ठेवलेला आहे. पी. बाळूची नेमणूक मुंबई महापालिकेत मी स्वत: केलेली आहे. सर्व दलित बंधूंची सहभोजने घडवून आणली आहेत. आपली चळवळ सर्व दलित बांधवांसाठी उभारलेली आहे. दलित समाजातील योग्य कर्तबगार कार्यकर्ते दलितांच्या हितरक्षणासाठी विधीमंडळावर जाणे गरजेचे आहे. तो कोणत्या दलीत जातीतील आहे हे पाहणे योग्य नाही. माझ्यापेक्षा चांगला कार्यकर्ता दुसरा कोणी असल्यास मी माझी जागा सोडण्यास तयार आहे. हिंदी संघटनवाल्यांचे प्रेमबेगडी आहे. आपल्यात फूट पाडण्याचे कारस्थान ते करीत आहेत. सर्व अस्पृश्यांनी चढाईचे धोरण अवलंबावे आचार विचार कृतीने सिद्ध करून दाखवावे.

३२९) राजकारणी लोकांची स्मृती दुबळी असते.

३३०) अस्पृश्यता हिंदू धर्मावरील कलंक नसून तो आमच्या देशावरील कलंक आहे तो धुवून काढणे आमचे कर्तव्य आहे.

३३१) प्राणघातक रोगावर जालिम औषधाची गरज असून ती उपाययोजना हवी.

३३२) सत्याग्रहातून ब्राह्मण कार्यकर्त्यास काढून टाकावे असे जेधे व जवळकर डॉ.आंबेडकरांना म्हणाले त्यावर डॉ. आंबेडकर म्हणाले स्वइच्छेने तळमळीने कार्य करण्यास कोणालाही बंदी नाही. आमचे वैर ब्राह्मणाशी नसून ब्राह्मण्यगृस्त लोक आमचे वैरी आहेत. ब्राम्हण्यगृस्त ब्राह्मणेत्तरसुद्धा आमचे वैरी आहेत. हे भांडण तत्वासाठी आहेत.

३३३) धर्म माणसासाठी आहे की माणूस धर्मासाठी आहे ?

३३४) जो धर्म आमची काळजी घेईल त्यासाठी आम्ही आमचे प्राण देऊ.

३३५) अपवित्राला पवित्र करण्यासाठीही साध्यता पतितांचा उद्धार करणे अस्वच्छाला स्वच्छ करण्याची सुसंस्कृतता, त्याला बुद्धीने आपल्यासारखे करणे पददलितास उच्च पातळीवर आणणे ह्याचे नाव संस्कृती.

३३६) ४/०८/१९२७ रोजी चवदार तळे सर्वांसाठी खुले असल्याचा ठराव मागे घेतला.

३३७) १५/०८/१९२७ रोजी डॉ. आंबेडकरांनी आपल्या कार्यालयात बैठक घेतली.

३३८) २५-२६ डिसेंबर १९२७ हे दिवस महाड सत्याग्रहासाठी निश्चीत केले.

३३९) कोणत्याही कार्यात यश प्राप्ती होइल की नाही हे जितके साधनसामग्रीवर अवलंबून असते तितकेच ते कार्याच्या नैतिक स्वरूपावर अवलंबून असते. कार्याच्या मुळाशी जर सत्य असेल तर यश प्राप्ती होण्यास काळजी करण्याची गरज नसते.

३४०) ज्या कार्यासाठी लोकसंग्रह होत आहे ते सत्कार्य त्यासाठी केलेला आग्रह म्हणजे सत्याग्रह.

३४१) गांधीची अहिंसा हि शुद्ध हिंसा आहे.

३४२) व्यक्ती किंवा वर्गाच्या सहनशिलतेला मर्यादा असते.

३४३) अस्पृश्यता आणि गुलामगिरी दोन्ही एकाच ठिकाणी नांदू शकत नाहीत.

३४४) टिळकांचे चिरंजीव श्रीधरपंत डॉ. आंबेडकरांचे स्नेही होते.

३४५) टिळकांचे चिरंजीव श्रीधरपंत टिळक डॉ. आंबेडकरांना शेवटचे पत्र लिहितात की, आपल्या बहिष्कृत बांधवांची गाऱ्हाणी श्रीकृष्णचरणी मी पोहचवण्यासाठी पुढे जात आहे. परमेश्वर आपल्या कार्यास सुयश देवो हीच प्रार्थना आहे. हे पत्र आपल्या हाती पडण्यापुर्वीच मी यहलोकांची यात्रा संपविलेली असेल.

३४६) श्रीधरपंताचा असा अंत व्हावयास नको होता म्हणून डोळ्यात अश्रू आणून डॉ. आंबेडकर हळहळले. म्हणाले आपल्या चळवळीतल्या एका निष्ठावंत कार्यकर्त्यास व आधारास चळवळ मुकली.

३४७) सप्टेंबर २७ ला संस्कारपुर्वक समतेचा कार्यप्रचार करण्यासाठी समाज समता संघ नावाची संघटना बाबांनी स्थापन केली होती.

३४८) ४/११/१९२० रोजी दामोदर सभागृह मुंबई येथे बहिष्कृत हितकारणीच्या सभेत ब्रिटीश लोकसभेचे सदस्य मार्डिजोन्स साहेब म्हणाले सुदैवाने अस्पृश्य समाजात कतृत्वावन व थोर पुरुष जन्माला आलेला आहे. (डॉ. आंबेडकर) तोच त्यांचा उद्धार करील असा मला विश्वास वाटतो.

३४९) हिंदुत्वाची प्राणप्रतिष्ठा जितकी वशिष्ठासारख्या ब्राम्हणांनी केली. कृष्णासारख्या क्षत्रियांनी, हर्षासारख्या वैश्यांनी, तुकारामासारख्या शुद्राने केली. तितकीचा वाल्मिकी, चोखामेळा, रोहिदास इ. अनेक अस्पृश्यांनी केली. व्याधगितेतील अस्पृश्यदृष्यापासून ते खरड्र्याच्या लढाईतील सिदनाक महारापर्यंत अस्पृश्यांनी हिंदुत्वाच्या रक्षणासाठी आपले शीर तळहातावर घेतले आहे.

३५०) १२/११/१९२७ रोजी बाळाराम आंबेडकर मुंबईस कालवश झाले. त्यांच्या दोन पत्न्या होत्या व दोन मुले यापुर्वीच निधन पावली होती. फक्त एक मुलगी होती तिचे नाव सखुबाई तांबुसकर होते.

३५१) बाळाराम फस्ट ग्रेनेडिअर फलटणीत वादक म्हणून होते.

३५२) बाळाराम आंबेडकर इंग्रजीत सहावीपर्यंत फलटणीत असताना शिकले होते. ते शरीराने बळकट, मनाने निर्भय, कृतीने करारी, स्वभावाने प्रेमळ आणि मनमिळाऊ होते. स्वास्थशिलतेच्या जोरावर समाजात त्यांची ख्याती होती.

३५३) इंडिया ॲण्ड चायना या ग्रंथाचे लेखक क्रिप्स स्प्रॅट यांना मुंबईच्या वरिष्ट न्यायालयातून त्यांची निर्दोष मुक्तता बाबासाहेबांनीच केली होती.

३५४) महाड सत्याग्रह होऊ नये म्हणून १७/११/१९२७ ला विश्वेश्वर मंदिरात सनातन्यांनी सभेचे आयोजन केले होते. परंतु सुरभा टिपणीस व बाबू जोशीच्या नेतृत्वाखाली ती सभा उधळून लावण्यात आली.

३५५) डॉ. आंबेडकरांसह ४ लोकांवर महाड सत्याग्रहाच्या माध्यमातून ९ सनातनी सैतानाने दिवाणी न्यायालयात १२/१२/१९२७ रोजी खटला दाखल केला.

३५६) अस्पृश्यांनी चवदार तळ्यावर पाणी भरू नये. तसेच पाणी भरण्यास मनाई हुकूम काढावा असे फिर्यादीत म्हटले होते.

खटला दाखल करणाऱ्या ९ हरामखोर सैतानांची नावे :

नाव	जात	धंदा
१) पांडुरंग रघुनाथ धारब	ब्राह्मण	व्यापार
२) राम नारायण गारीवाश	मारवडी	व्यापार
३) नरहरी दामोदर वैद्य	ब्राह्मण	वैदिक ब्राम्हण
४) गणपत भिकू गांधी	गुजर	व्यापार
५) बाळकृष्ण नारायण बागडे	शिंपी	व्यापार
६) नारायण अनंतराव देशपांडे	कायस्थप्रभू	लिहिण्याचा
७) रामचंद्र धर्माजी जाधव	मराठा	व्यापार
८) मारूती सिताराम वडके	तांबट	शेती
९) रामचंद्र आत्माराम शेटे	वैश्यवाणी	व्यापार

३५७) खटला दाखल केलेल्या चार माणसांची नावे :

१) डॉ. भिमराव आंबेडकर

२) सिताराम शिवतरकर

३) कृष्णा सायनाक महार

४) गण्या मालू चांभार

३५८) पहिल्या नऊ सैतानांनी महाडच्या दुय्यम न्यायालयात १४/१२/१९२७ ला दुसरा दावा दाखल केला.

३५९) परिषदेसाठी सवर्ण हिंदू (मंडपासाठी) जागा देत नसल्याने फत्तेखान नावाच्या मुसलमानाकडून जागा मिळवली होती.

३६०) १४/१२/१९२७ ला सकाळी पद्मावती आगबोटीने मुंबईहून डॉ. आंबेडकरांसह भाऊराव गायकवाड, राजभोज, सिताराम शिवतरकर, ग.नि. सहस्त्रबुद्धे, प्रधान बंधु महाडला निघाले. तळ्याच्या आजूबाजूच्या भागास १४४ कलम लागू केले होते.

३६१) हिंदू समाजाची रचना एक वर्ण व समता या दोन तत्वाच्या पायावर उभी केली पाहिजे. हे कार्य जितके स्वहिताचे आहे. तितकेच राष्ट्रहिताचे आहे.

३६२) दि. ०५/०५/१७८९ साली फ्रेंचमध्ये व्हर्यास मुक्कामी फ्रेंच लोकांच्या क्रांतीकारी सभेत एक ठराव पास करण्यात आला होता. तो ठराव असा की, सर्व माणसे जन्मता समान दर्जाची आहेत व ती मरेपर्यंत समान दर्जाची राहतील. याची महाड मुक्कामी डॉ. आंबेडकरांनी देशाला आठवण करून दिली.

३६३) २५/१२/१९२७ रोजी महाडला सायंकाळी ९ वाजता एका अस्पृश्य बैराग्याच्या हातून बाबांनी परिषदेसमोर मनुस्मृतीचे दहन केले.

३६४) १९२४ साली मद्रास प्रांतात ब्राम्हणेतर पक्षांनी मनुस्मृतीची होळी केली होती.

३६५) मनुस्मृतीत असलेले नियम फक्त अस्पृश्य समाजालाच लावले जातात. ब्राह्मणाला असणारे नियम ब्राम्हण पाळीत नाहीत.

३६६) ब्राह्मणाला रसायनिक द्रव्य, रंगीत कपड्याची दुकाने, रासायनिक द्रव्याची दुकाने, अत्तराची दुकाने, उपहार गृहे, केसकर्तनालय इ. धंदे करण्यास मनाई आहे.

३६७) टिळकांनी तर जिनींगची गिरणी उभारली होती. त्यात त्यांच्या ब्राह्मणपणाला कमीपणा आला नाही. वेदाध्ययन करण्यास टिळकांनी शूद्राला विरोध दर्शविला. जातीयता कायम राहावी असा टिळकांचा हट्ट होता.

३६८) सुख नेहमीच दु:खाअंती प्राप्त होते.

३६९) मी सांगतो म्हणून तुरूंगात जाऊन फसी पडणारे लोक मला नको आहेत. तुरूंगात जाईनच पण माझी अस्पृश्यता मी घालवीन असे म्हणणारे लोक मला पाहिजेत असे डॉ. आंबेडकर ठामपणे म्हणत.

३७०) चवदार तळे जिंकू किंवा तुरूंगात जाऊन पेक्षा गावाला पुन्हा तोंड दाखविणार नाही अशी काही कडव्या कार्यकर्त्यांनी प्रतिज्ञा केली होती तीच भीम प्रतिज्ञा होय.

३७१) दारूबाज नवऱ्याला, मुलांना, भावाला घरात घेऊ नका. त्यांना जेवायला देऊ नका असा स्त्रियांना बाबासाहेबांचा आदेश होता.

३७२) मनुस्मृती त्रिवर्णीकाच्या हक्काचा जाहीरनामा होता. तर अस्पृश्यांच्या गुलामगिरीची गीता होती.

३७३) महाडच्या बुद्धकालीन लेणी पाहत असता भिक्षुच्या तेथील आसणावर आपण बसू नये असे सहकाऱ्यांना बाबांनी सांगितले.

३७४) रामदास दासबोधात म्हणतो -

गुरू तो सकळासी ब्राह्मण। जरी तो झाला क्रियाहीन।

तरी तयासी शरण। अनन्य भावे असावे।

ब्राह्मणवेद मुर्तीमंत। ब्राह्मण तोच भगवंत।

पुर्ण होती मनोरत। विप्रवाक्य करूनी।

असो ब्राह्मणा सुखर वंदिती। तेथे मानव बापुडे किती।

जरी ब्राह्मण मूढमती। तरी ते जगदवंद्य।

अंत्यज शब्द ज्ञाता बरवा। परी तो नेऊनी काय करावा।

ब्राह्मणा सानिध्य पुजावा। हे तो न घडे की।

३७५) १८७४ सालच्या महारवतनाच्या कायद्यात सुधारणा करण्यासाठी दि. १९/०३/१९२८ रोजी विधानमंडळासमोर डॉ. आंबेडकरांनी एक विधेयक विचारासाठी मांडले होते.

३७६) १९२८ साली इंदोरचे महाराज सर तुकोजीराव यांचा विवाह अमेरिकन युवती कुमारी मिलर हिच्याशी झाला.

३७७) तुकोजी महाराज धनगर समाजाचे होते.

३७८) मुंबई प्रांत उपजिल्हा अधिकारी म्हणून अस्पृश्य समाजातील पहिले अधिकारी म्हणून मा.क. जाधव यांची नेमणूक झाली होती ती डॉ. आंबेडकरांमुळेच.

३७९) ३/०८/१९२८ रोजी महार वतने नष्ट करण्याची घोषणा डॉ. आंबेडकरांनी केली. वतनदारी ही महाराच्या उत्कर्षातील धोंड आहे असे त्यांना वाटले.

३८०) ब्रिटीश सरकारच्या राज्यघटना सुधारणा मंडळावर सर जॉन सायमनची नेमणूक केली होती. म्हणून सरकारच्या मंडळास सायमन कमिशन नावाने ओळखले जात होते.

३८१) सायमन कमिशन मंडळ भारतास पहिली भेट देण्यासाठी ३/०२/१९२८ रोजी भारतात आले होते.

३८२) सायमन मंडळात एकही हिंदू सभासद नव्हता.

३८३) फेब्रुवारी १९२८ ते मे १९२८ मोतीलाल नेहरूच्या नेतृत्वाखाली सर्व पक्षीय परिषद भरवून हिंदू स्वराज्याच्या घटनेचा आराखडा तयार करणारी समिती स्थापन केली. या समितीने जुन १९२८ पासून ऑगस्ट १९२८ पर्यंत राज्यघटनेचा आराखडा तयार केला होता.

३८४) डॉ. आंबेडकरांच्या दलितवर्गातील कोणत्याही संस्थेस आराखडा परिषदेने आमंत्रित केलेले नव्हते.

३८५) मोतीलाल नेहरू मुसलमान धार्जिने आहेत असे परखडपणे डॉ. आंबेडकर म्हणाले. त्या राज्यघटनेनुसार हिंदूला धोका व हिंदूस्थानवर आरिष्ट आहे. नवीन प्रांतरचना होणार हे डॉ. आंबेडकरांनी ओळखले होते.

३८६) ऑगस्ट १९२८ ला डॉ. आंबेडकरांची मुंबई प्रांतीक मंडळावर निवड झाली.

३८७) बहिष्कृत हितकारणी सभेने विधीमंडळातील १४० जागांपैकी २२ जागेची मागणी केली.

३८८) भावी राज्यघटनेत २ कलमांचा अतर्भाव करावा.

१) पहिल्या कलमानुसार प्रांताच्या उत्पन्नावर दलित वर्गाचा शिक्षणासाठी अग्रहक्क असावा.

२) दुसऱ्या कलमानुसार लष्कर आरमार आणि पोलीस दलात दलित वर्गाला प्रवेश मिळावा अशी मागणी बहिष्कृत हितकारणी सभेने केली होती.

३८९) २३/०८/१९२८ रोजी पुण्याला सायमन मंडळ केंद्रीय समीती व मुंबई प्रांतीक समिती या तीन मंडळासमोर डॉ. आंबेडकरांची साक्ष झाली.

३९०) १९२९ साली बहिष्कृत भारत व समता पाक्षिक दोन्ही बंद पडले.

३९१) संप हे कामगारांचे कायदेशीर शस्त्र आहे. परंतु त्याचा वापर योग्य वेळेसच करावा.

३९२) १९२९ ला पुन्हा सायमन मंडळापुढे डॉ. आंबेडकरांची साक्ष झाली. त्यावेळी मेजर ॲटले इंग्लंडचे मुख्य प्रधान होते. ते सायमन मंडळाचे सभासद होते.

३९३) सायमन मंडळाच्या समितीने ७/०८/१९२९ रोजी वृत्तांत सादर केला. त्यात दलित वर्गाला विभक्त मतदार संघ नसावा. परंतु १४४ जागांपैकी ३३% राखीव घ्याव्यात.

३९४) डॉ. आंबेडकरांनी अहवालावर नाराजी दाखवून १७/०५/१९२९ रोजी स्वत:ची वेगळी मतपत्रिका दाखल केली.

३९५) मुस्लीम नेते मौलाना आझाद याने कलकत्ता येथे मुस्लीम परिषदेत मत व्यक्त केले होते की हिंदूच्या ९ प्रांताबरोबर मुस्लीमांचे ५ प्रांत निर्माण होतील.

३९६) हिंदूच्या प्रांतातील मुसलमानाला जशी वागणूक दिली जाईल तशीच वागणूक मुसलमानांच्या प्रांतातील हिंदूना दिली जाईल. हे गांधीवादी मुसलमान व राष्ट्रवाद्यांना डॉ. आंबेडकरांनी स्पष्ट सांगितले होते.

३९७) १४/०६/१९२८ रोजी बहिष्कृत हितकारणी सभा बरखास्त करून भारतीय बहिष्कृत समाज शिक्षण प्रसारक मंडळाची स्थापना केली.

३९८) भारतीय बहिष्कृत शिक्षण प्रसारक मंडळ या संस्थेला १८६१ च्या चॅरिटेबल सोसायटीज रजिस्ट्रेशन ॲक्ट क्र. १९ अन्वये मान्यता मिळाली होती.

३९९) भारतीय बहिष्कृत समाज सेवा स्थापन केली. या समितीचे अध्यक्ष स्वत: डॉ. आंबेडकर होते. तसेच प्रमुख कार्यवाहक सीताराम शिवतरकर होते.

४००) स्वाभिमान शून्य, देशाभिमान शून्य जीवन जगणे नामर्दपणाचे आहे.

४०१) कोकणातील दलितांच्या जमिनी संदर्भात जर तुम्ही कोकणात आलात तर तुम्हाला गोळ्या घालून ठार करू अशी धमकीची पत्रे डॉ. आंबेडकरांना आली होती.

४०२) १९/०५/१९३९ या दिवशी मध्य प्रांत व वऱ्हाड प्रांतातील अस्पृश्यांनी पातुर्डी येथे सभेचे आयोजन केले होते. डॉ. आंबेडकरांची बहिण तुळसाबाई धर्माजी कांतेकर या मृत्यू पावल्या असताना सुद्धा

जनतेच्या आग्रहास्तव डॉ. आंबेडकर सभेला गेलेच. विद्यार्थी दशेत त्या बहिणीकडे बाबासाहेब राहत असत.

४०३) धर्माजी कांतेकर बी.बी.सी.आय. रेल्वेच्या परळ (मुंबई) येथील कारखान्यात रखवालदार होते.

४०४) ४/०६/१९२९ रोजी जळगावातील १२ महारांनी मुस्लीम धर्माची दिक्षा घेतली होती.

४०५) प्र. केशव अत्रे देशस्थ ब्राह्मण यांनी वैश्य समाजातील गोदुताई श्यामराव मुंगी यांच्या कन्येशी लग्न केल्याबद्दल बहिष्कृत भारत मध्ये अभिनंदन केले होते.

४०६) दादरच्या गणेशोत्सवास अस्पृश्यांना बंदी केली. पोलीस उभे केले. प्रबोधनकार केशव सीताराम ठाकरे इत्यादी अनेक पुढारी अतिश्रम घेत होते. शेवटी स्पृश्य पुढाऱ्यांनी हात जोडले. पोलीस उभे केले. जागोजागी गुंडांना उभे केले. डॉ. आंबेडकर, बोले, प्रबोधनकार केशव ठाकरे इ. अनेक पुढाऱ्यांनी अतिश्रम घेतले होते व गणेशोत्सवात अस्पृश्यांना प्रवेश मिळाला.

४०७) अडीअडचणीच्या सुख आणि दु:खाच्या वेळी दिलासा देणारे दत्तोबा पोवार हे बाबासाहेबांचे दोस्त होते.

४०८) खानदेशाच्या दौऱ्यानंतर बाबासाहेब चाळीसगावच्या अस्पृश्यांच्या अग्रहास्तव चाळीसगावला निघाले. तेथे टांगा पलटी झाल्यामुळे

२३/११/१९२९ रोजी बाबांच्या उजव्या पायाचे हाड मोडले होते.

४०९) भिक्षुकशाही म्हणजेच माणुसकीचा हिन नमुना.

४१०) १३ ऑक्टोंबर १९२९ रोजी स्पृश्य पुढारी वा.वि.साठे, देशदास रानडे, केशवराव जेधे, न.वि. गाडगिळ व अस्पृश्य पुढाऱ्यांनी पुण्याच्या पार्वती मंदिरात पूजा-अर्चा करण्याचा हक्क मिळावा म्हणून सत्याग्रहास सुरूवात केली.

४११) ३१/१२/१९२९ पर्यंत साम्राज्यांतर्गत स्वराज्य देण्याची ब्रिटीशांना काँग्रेसने (राष्ट्रीय सभेने) अट घातली.

४१२) पुण्याच्या मंदिरात अस्पृश्य सत्याग्रहाच्या सभेस प्रबोधनकार ठाकरे, देवराव नाईक, प्रधान, शिवतरकर, खांडगे, कवळी,कद्रेकर इ. मंडळी होती.

४१३) सावरकराने रत्नागिरी येथे विठ्ठल मंदिरात अस्पृश्यांना प्रवेश मिळावा म्हणून सत्याग्रह केला.

४१४) कारवारचे विठ्ठल मंदिर, अमरावतीचे अंबादेवी मंदिर, खुलना येथील कपिल मुनी, कालीमंदीर असे अनेक लोकांनी मंदिर प्रवेशाचे लढे चालू केले होते.

४१५) पुण्याचे पार्वतीमंदिर सनातन्याने बंद ठेवल्यामुळे सत्याग्रह बंद ठेवावा लागला.

४१६) १२/०३/१९३० रोजी काँग्रेसचे पुढारी मोहन गांधीने दांडी मोर्चाने स्वातंत्र्य युद्धातील सत्याग्रही पर्व सुरू केले.

४१७) २/०३/१९३० रोजी सामाजिक स्वातंत्र्यासाठी डॉ. आंबेडकरांनी नाशिकला मंदिर प्रवेश लढा चालू केला.

४१८) नाशिकचा मंदीर प्रवेश लढा १९३५ पर्यंत चालू होता.

४१९) १९३० च्या सायमन मंडळाच्या प्रतिवृतात विधीमंडळातील २५० जागांपैकी १५० जागा मिळणार होत्या. अस्पृश्य हिंदूंना संयुक्त मतदार संघात राखीव जागा देण्यात आल्या होत्या. अस्पृश्य वर्गास निवडणुकीस उबे राहण्याची पात्रता ठरविण्याचा अधिकार राज्यपालास दिला होता.

४२०) ८/०८/१९३० ला बहिष्कृत वर्गाची सभा नागपूरला भरली. हिंदुस्थानातील परिस्थितिची भिन्नता लक्षात घेऊन राज्यघटना बनविली पाहिजे. कोणत्याही राष्ट्राला दुसऱ्या राष्ट्रावर राज्य करण्याचा अधिकार नाही. त्याचप्रमाणे कोणत्याही समाजाला दुसऱ्या समाजावर सत्ता गाजविण्याचा अधिकार नाही असे तत्वपुर्ण भाषण डॉ. आंबेडकरांनी केले.

४२१) गांधीने आरंभिलेली असहकारतेची चळवळ अप्रसंगीक आहे असे डॉ. आंबेडकर म्हणाले.

४२२) क्रांती एका पक्षाकडून दुसऱ्या पक्षाकडे व एका राज्याकडून दुसऱ्या राज्याकडे राजकीय सत्ता देते.

४२३) ब्रिटीश सत्तेवर आल्यापासून भारतात ३१ दुष्काळ पडले व त्यामध्ये अडीच ते ३ कोटी लोक भुकेने व्याकुळ होऊन मृत्यू पावले.

४२४) आपला समाज स्वराज्यवादी आहे. देशास स्वराज्य मिळालेच पाहिजे असे बाबांनी निसंदिग्ध घोषणा केली.

४२५) अस्पृश्यतेचे उच्चाटन करण्याची अट राष्ट्रीय सभेने घेतलेली नाही. स्पृश्य अस्पृश्यात प्रेमभाव वाढावा म्हणून गांधीने कधीही उपोषण केले नाही. तरी सरकार व राष्ट्रीय सभेवर आपण विसंबून राहू नये. राष्ट्रीय सभा ही पक्ष नसून चळवळ आहे. गरीब जनतेच्या बाजूने ते लढणार नाहीत असे डॉ. आंबेडकरांनी परिषदेत स्पष्टपणे सांगितले.

४२६) अस्पृश्यांच्या सर्व दु:खावर राजकीय सत्ता हा काही एकच उपाय नाही. तर त्यांनी आपली सामाजिक पातळी उंचावणे त्यातच त्यांचा उद्धार आहे.

४२७) डॉ. आंबेडकरांच्या भाषणात दाहकता व प्रकाश दोन्ही तत्वे असतात.

४२८) राजकीय व सामाजिक जिवनाची जेव्हा ते चिरफाड करीत तेव्हा बाबा कठोर व न्यायनिष्ठुर बनत. तरी त्यांच्या हृदयातील स्वदेशाभिमानाचे स्पंदन आणि स्फूरन कधीही थांबले नाही.

४२९) सायमन मंडळाच्या सिफारसीनुसार भारतातील निरनिराळ्या पक्षातील पुढाऱ्यांना परिषदेसाठी बोलाविले होते. ब्रिटीश लोकसभेतील पक्षांच्या प्रतिनिधीशी भारतीय राज्यघटने विषयी विचार करावा असे परिषदेत ठरले होते. बाबासाहेबांना ६/०९/१९३०रोजी पत्र मिळाले होते.

४३०) बहिष्कृत भारत या नावावारून बरेच लोक पेपर घेत नाहीत. त्यांना आपले म्हणणे कळावे म्हणून बहिष्कृत भारत नाव बदलून जनता असे ठेवले होते. शंकररावांनी बहिष्कृतांच्या चळवळीसाठी बराच खर्च केला होता म्हणून डॉ. आंबेडकरांनी शंकरराव परशाचे जाहीर आभार मानले होते.

४३१) जनता पाक्षिक २४/११/१९३० रोजी सुरू झाले.

४३२) बंद पडलेल्या "समता" व बहिष्कृत भारताच्या वर्गणीदारास विनामुल्य त्यांची वर्गणी फिटेपर्यंत जनताचे अंक पाठविण्यात आले होते.

४३३) जनता पाक्षिकाचे प्रकाशक व व्यवस्थापक भास्कररराव र. कद्रेकर होते.

४३४) रशिया, जर्मन, अमेरिका, जपान इ. देशातील प्रमुख पुढाऱ्यांना भेटून मी माझ्या लोकांच्या हक्काची मागणी करीनच परंतु स्वराज्याच्या मागणीचा पाठपुरावा केल्याशिवाय राहणार नाही. प्रसंगी राष्ट्रसंघापुढेसुद्धा मी मागणी करीन असे डॉ. आंबेडकर म्हणत असत.

४३५) ४/१०/१९३० रोजी डॉ. आंबेडकर व्हायसरॉय या बोटीने लंडनला निघाले.

४३६) १८/१०/१९३० रोजी डॉ. आंबेडकर बोटीने लंडनला पोहचले.

४३७) चेस्टर फिल्ड गार्डन्स थॉमस कुक ॲण्ड सन्स बक्ले स्ट्रिट लंडन येथे डॉ. आंबेडकर राहत असत.

४३८) १२/११/१९३० ला लंडनला गोलमेज परिषद सुरू झाली. परिषदेचे उद्घाटन झाले. लंडनचे बादशहा पंचम जॉर्ज यांच्या हस्ते उद्घाटन झाले.

४३९) इंग्लंडचे मुख्य प्रधान रॅम्से मॅक्डोनाल्ड १२/११/१९३० च्या परिषदेचे अध्यक्ष होते.

४४०) १२/११/१९३० ची परिषद हिंदू पुढारी हिंदी संस्थाने यांनी विलायतेत जाऊन ब्रिटीश मुत्सद्यांशी विचार विनिमय करण्यासाठी बोलाविले होते.

४४१) परिषद सेंट जेम्स राजवाड्यात १७-२१ नोव्हेंबर १९३० पर्यंत होती.

४४२) परिषदेस सप्रु, जयकर, मुंजे, जीना, बिकानेरचे महाराज, डॉ. आंबेडकर, पतियाळचे नरेश, भोपाळचे नबाव, ना.म. जोशी, सर मिर्झाइस्माईल इ. विधीज्ञ पंडीत ऐश्वर्यशाही महाराजांचे विख्यात राज्यशास्त्रज्ञ मुरब्बी मुत्सुद्दी व्यक्ती होत्या.

४४३) डॉ. आंबेडकर परिषदेत गर्जले. भारतातील अज्ञ, अर्धनग्न, दलितमुक्या, भुकेकंगाल अशा लोकांची स्थिती गुलामापेक्षा अत्यंत वाईट आहे. अशा भारतातील एक पंच मांस लोकसंख्या असलेल्या आणि ज्याची लोकसंख्या फ्रान्सएवढी आहे अशा लोकांची गाऱ्हाने मी परिषदेपुढे मांडत आहे. दलितांची मागणी अशी आहे की भारतातील सरकार लोकांनी लोकांकडून लोकांसाठी चालविलेले राज्य असावे असे ठामपणे विधान केले.

४४४) तेज बहाद्दूर सप्रु म्हणाले ब्रिटीश समुहातील तिन्ही घटका प्रमाणे आम्हाला दर्जा प्राप्त पाहिजे अशी भारताची मागणी आहे.

४४५) बिकानेरचे महाराज म्हणाले इंग्रजी अंमलाखाली असलेली संस्थानिक व आपण तयार आहोत. ब्रिटीश राजवट आम्हाला मान्य आहे.

४४६) पतियाळचे नरेश, भोपाळचे नवाब यांनी बिकानेरच्या महाराजांना पाठिंबा दिला.

४४७) जयकरांनी व साहित्याचे राज्य व्हावे अशी विनंती केली.

४४८) पतियाळच्या महाराजांनंतर डॉ. मुंजेने लॉर्ड फिल्डच्या भाषणाचा खरपूस समाचार घेतला.

४४९) ना.म. जोशीने कामगारांच्या हक्काची मागणी केली.

४५०) सर मिर्झाइस्माईल म्हणाले भावी राज्यघटना संयुक्त पद्धतीची असावी.

४५१) सर सी.पी. रामास्वामी म्हणाले भावी राज्यघटना सुसह्य असावी.

४५२) बडोद्याचे महाराज परिषदेस हजर होते.

४५३) बडोद्याच्या महाराजांचे डोळे आनंदाश्रूने भरून आले होते अशी डॉ. आंबेडकरांनी परिषदेत भाषण केले होते. परत आल्यावर बडोदे नरेश्याने आपल्या महाराणीजवळ मनोगत व्यक्त केले. आपण केलेली मदत सार्थकी लागली. डॉ. आंबेडकरांच्या यशाबद्दल सयाजीरावांनी काही निवडक लोकांना मेजवानी दिली.

४५४) १९१७ साली डॉ. आंबेडकर अमेरिकेहून लंडनला गेले. तेव्हा क्रांतीकारक समजून पोलीसांनी त्यांच्या हॅटपासून बुटापर्यंत तपासणी केली.

४५५) १२/११/१९३० ची पहिली गोलमेज परिषद संपल्यावर पंतप्रधानाच्या कन्या मिस इसाबेल हिने निवडक प्रतिनिधींना मेजवानी दिली. त्यात बडोदे नरेश सयाजीराव महाराज, डॉ. आंबेडकर, सर मिर्झाइस्माइल, जीना, तांबे होते.

४५६) पंतप्रधानाच्या घरी (चेकर या खेडेगावी) हिंदी प्रश्नावर चर्चा केली. परंतु डॉ. आंबेडकरांनी स्पष्ट सांगितले की अल्पसंख्याक व दलितांचे प्रश्न समंजसपणाने मान्य न केल्यास अल्पसंख्यांक गट व अस्पृश्य वर्ग स्वयंशाषित भारताच्या भावी राज्यघटनेला मान्यता देणार नाही.

४५७) परिषदेच्या चर्चेत अधिवेशनाचे रूपांतर निरनिराळ्या समितीत झाले होते.

१) अल्पसंख्यांक उपसमिती

२) प्रांतविषयक उपसमिती

३) नौकऱ्याविषयक समिती

४) संयुक्त राज्यघटना समिती

४५८) डॉ. आंबेडकरांची निवड ३ समित्यांवर केली होती. परंतु संयुक्त राज्यघटना समितीवर केली नाही.

४५९) डॉ. आंबेडकरांनी भारतातील अस्पृश्ययतेचा प्रश्न जगाच्या वेशीवर टांगण्यासाठी निरनिराळ्या देशातील वृत्तपत्रांमध्ये अस्पृश्यांच्या करूण कहाणीचे लेख लिहिले, माहिती पत्रके काढली. भारतात अस्पृश्य वर्ग युगानुयुगे अपमानकारक जीवन व अतर्क्य दु:ख भोगत आहे. याकडे संपूर्ण जगाचे लक्ष वेधले. एका मागोमाग एक विनंती पत्रके काढून ते आग्रहाची विनंती करीत होते की भारतातील अस्पृश्य वर्ग सुसंस्कृत जगाला हाक मारीत आहे की अस्पृश्य वर्गाचा हा प्रश्न सोडविण्यासाठी मानवतेच्या पातळीवर आपले पुण्य कर्म करावे. याचा परिणाम असा झाला की मिस इलिनॉर्ड, मिस इलेन, नॉर्मन अँन्जेल इ. लोकसभेतील सदस्यांनी लॉर्ड सॅकी यांची भेट घेऊन अस्पृश्य वर्गाला सरसकट मतदानाचा अधिकार असावा. तसेच त्यांच्या गाऱ्हाण्याचे निवारण व्हावे अशी विनंती केली आणि भावी राज्यघटनेत अस्पृश्यांना मतदानाचा अधिकार असेल असे लॉर्ड सॅकी यांनी आश्वासन दिले. डॉ. आंबेडकर खरोखरच अस्पृश्यांचे पुढारी आहेत की नाहीत अशी चौकशी लॉर्ड सॅकी यांनी पेट्रोजवळ केली होती. त्यावेळी डॉ. आंबेडकर आपली बाजू अग्रही न्यायनिष्ठूर व कठोर पद्धतीने मांडतात. म्हणून काही वृत्तपत्रे त्यांच्या विरूद्ध प्रचार करतात असे लॉर्ड सॅकी यांना सांगण्यात आले.

४६०) परिषदेचे कामकाज पहात असताना वेळ काढून बाबासाहेबांनी ४ पेट्या ग्रंथ खरेदी केले होते.

४६१) लंडनमध्ये असताना चवदार तळ्याचा निकाल लागून आपण विजयी झालो असे त्यांना समजले त्यांना मोठा आनंद झाला.

४६२) डॉ. आंबेडकरांनी ४ वृत्तपत्रे काढली. मुकनायकात त्यांनी मुक्यांची गाऱ्हाणी मांडली. बहिष्कृत भारतात त्यांनी बहिष्कृत भारताचे दर्शन घडविले. समतामध्ये त्यांनी सामाजिक समतेचा आग्रह धरला व जनता ही चळवळीची चौथी अवस्था साकार करून दाखविली.

४६३) निरनिराळ्या समित्यांचा अहवाल संमत करून गोलमेज परिषद १९/०१/१९३१ स्थगित झाली.

४६४) रॅम्से मॅक्डोनाल्ड साहेबांनी अस्पृश्यांच्या हक्काचे संरक्षण होणे जरूरीचे आहे असे लोकसभेत भाषण केले.

४६५) अस्पृश्यांच्या गाऱ्हाण्यावर आवाज उठविणारे इंग्लंडचे गृहस्थ आय झॅक फुड यास सभासदांनी ताकिद दिली की अस्पृश्य वर्गाच्या मानवी हक्काचे आपण कर्तव्य बजावले नाही तर त्यांचे शाप व तळतळाट ब्रिटीश राज्यांना भोवल्याशिवाय राहणार नाही. त्यांना सहाय्य व सहानभुतीचा हात द्यावा. त्यांना त्यांच्या पायावर उभे करणे हेच आपले धोरण ठरले पाहिजे. आय झॅक फुडचे वक्तव्य म्हणजे डॉ. आंबेडकरांच्या इंग्लंडमधील कार्याचे प्रशस्तीपत्र होते.

४६७) शूरवीर डॉ. आंबेडकर गोलमेज परिषदेतील आपल्या बुद्धीतेजाने विजयी होऊन दि. १३/०२/१९३१ रोजी लंडनहून मार्शलीस बंदरातून एस.एस. मुलतानी बोटीने मायदेशी रवाना झाले. त्यांचे २७ फेब्रुवारी १९३१ ला मुंबईत आगमन झाले.

४६८) गांधीला मी अस्पृश्यांचा पुढारी (कैवारी) आहे असे मी माणनार नाही असे डॉ. आंबेडकर म्हणाले.

४६९) मंदिर प्रवेशाची चळवळ अन्यायी आहे असे गांधी डॉ. आंबेडकरांना म्हणाले होते.

४७०) टिळकांचा ही गांधीच्या वक्तव्यास दुजोरा होता.

४७१) १९/०४/१९३१ रोजी परळ (मुंबई) च्या गोखले एज्युकेशन सोसायटीच्या सभागृहात अस्पृश्यांची सभा भरली होती. ही सभा उधळून लावण्याचा विरोधकांचा विचार होता. विरोधकांमध्ये प्रतिस्पर्धी बाळकृष्ण देवरूखकर होते. सभागृहाच्या बाहेर विरोधकांनी गोंधळ घालण्यास सुरू केले. परंतु समता सैनिक दलाने विरोधकांस चांगला धडा शिकविला. देवरूखकरांनी तर बाबासाहेबांच्या मोटारीकडे पळ काढला. बाबासाहेबांनी त्याला आपल्या मोटारीत बसवून सुखरूप जमावाच्या बाहेर आणले.

४७२) मानवेंद्रनाथरॉय हा कट्टर कम्युनिष्ट नेता होता. डॉ. आंबेडकरांचे मत काय आहे हे पाहण्यासाठी स्वत:चे नाच बदलून वेश बदलून (डॉ. मेहमूद) बाबांना भेटण्यास आला. दोघांचीही राजकारणावर चर्चा झाली. रॉय निघुन गेल्यावर बाबासाहेब प्रधानांना म्हणाले, भेट घेण्यास आलेला पाहुणा बतावणी करतो त्याप्रमाणे तो संयुक्त प्रांतातील मुसलमान नसून तो बंगाली बाबू असावा. खरोखर १५ दिवसानंतर आरक्षकांनी त्याला अटक केल्यावर तो डॉ. महंमुद नसून मानवेंद्र नायराम होता.

४७३) चिरनेर खेड्यात १९३० ला जंगल सत्याग्रह झाला. त्यावेळी एक मामलेदार व काही सरकारी नोकर ठार झाले होते. ४९ आरोपींपैकी फक्त चारच आरोपी सोडायचे होते. वकीलपत्र डॉ. आंबेडकरांनी घेतले होते. सरकारी वकिलांनी डॉ. आंबेडकरांना विचारले की आरोपी १५ ला तुम्ही त्याच्या नाकावर असलेल्या काळ्या ठिपक्यावरून ओळखता किंवा त्याच्या चेहऱ्यावरून असे विचारताच डॉ. आंबेडकर म्हणाले काय हो! आरोपीचे नाक त्याच्या मुखावर नाही? न्यायालयात एकच हशा पिकला.

४७४) आरोपी नं. ८,९,१० च्या वतीने २० जून १९३१ ला बाबांनी बचावाचे भाषण केले.

४७५) २ जूलै १९३१ केसचा निकाल लागून ४ ऐवजी १७ आरोपीस निर्दोष सोडले.

४७६) डॉ. आंबेडकरांच्या भाषणाइतके भारदस्त विचारपुर्वक जाणीवपुर्वक सूत्रबद्ध भाषण पहिल्या गोलमेज परिषदेत दुसऱ्या कोणत्याही पुढाऱ्याचे झाले नाही असे सर्व्हेट ऑफ इंडियाने प्रसिद्ध केले.

४७७) कुलाबा समाचार, डेली, मिरर, संडे, क्लिनीकल, केसरी इ. वृत्तपत्राने डॉ. आंबेडकरांचे गोलमेज परिषदेच्या भाषणाबद्दल आभार मानले.

४७८) ९/०८/१९३१ रोजी गांधीने डॉ. आंबेडकरांना पत्र लिहून मी तुम्हाला भेटण्यासाठी येत आहे असे कळविले. परंतु गांधीच्या वयाचा विचार करून डॉ. आंबेडकरच गांधीला मनीभवन येथे भेटण्यासाठी गेले होते.

४७९) दुसऱ्या गोलमेज परिषदेपर्यंत गांधी डॉ. आंबेडकरांना ब्राम्हण समजत होते.

४८०) टिळक गांधीला जैन समजत असत.

४८१) स्त्रीयांना उद्देशून डॉ. आंबेडकरांनी भाषन केले की भावी पिढीला आजच्या गुलामगिरीचा मागसूसही दिसणार नाही असे अलौकिक स्वार्थ त्यागाची आपण कामे करावयास सज्ज झाला आहात का ? माझ्या कार्याची जबाबदारी पार पाडण्याचे पुण्य तुमच्या पदरी पडेल.

४८२) ५/०८/१९३१ रोजी शनिवार दिवशी दुसऱ्या गोलमेज परिषदेसाठी डॉ. आंबेडकर इतर पुढाऱ्यांसमवेत एस.एस. मुलतान बोटीने मुंबईहून रवाना झाले.

४८३) १९/०८/१९३१ रोजी डॉ. आंबेडकर लंडनला पोहचले.

४८४) गांधी सरोजिनी नायडूसह मदनमोहन मालवीय इतर परिवारासह २९/ ०८/१९३१ ला मुंबईहून निघाले आणि १२/०९/१९३१ ला लंडनला पोहचले.

४८५) दुसरी गोलमेज परिषद ७/०९/१९३१ ला सुरू झाली.

४८६) १६/०९/१९३१ ला गांधी म्हणाले व्यापक अर्थाने म्हटल्यास मी डॉ. आंबेडकरांच्या विचारांशी सहमत आहे. परंतु विचाराने मी गेव्हिंग आणि सर सुलतान यांच्या मताशी सहमत आहे.

४८७) गेव्हिंग आणि सरसुलतान हे संस्थानिकांच्या मताचे होते.

४८८) १८/०९/१९३१ ला परिषदेत डॉ. आंबेडकरांनी गांधीला विचारले की तुम्ही मांडलेले विचार हे तुमचेच आहेत की काँग्रेसचे आहेत.

४८९) गांधी म्हणाले डॉ. आंबेडकरांच्या विचारांशी अस्पृश्यांच्या प्रश्नाबद्दल काँग्रेस सहमत असेल.

४९०) मदन मालवीय म्हणाले सरकारने शिक्षणावर पुरेसा पैसा खर्च केला असता तर अस्पृश्यता कधीच नष्ट झाली असती.

४९१) डॉ. आंबेडकर पंडीत मदन मालवीय यांच्या प्रश्नाला उत्तर देतात की मी शिकून सुशिक्षित झालो मग माझी अस्पृश्यता का नष्ट झाली नाही ?

४९२) दुसरी गोलमेज परिषदसुद्धा डॉ. आंबेडकरांनी राजकीय पुढारी अर्थशास्त्राचे प्राध्यापक दलितांचे कैवारी प्रजेच्यासंमित्र अशा सर्वांगिण व्यक्तीमत्वाने व पराक्रमाने गाजविली.

४९३) डॉ. आंबेडकर व गांधीची भेट घडवून आणण्यासाठी गांधीचे चिरंजीव देवदास गांधी डॉ. आंबेडकरांना भेटले. सरोजिनी नायडूच्या निवासस्थानी भेट घडवून आणली.

४९४) २८/०९/१९३१ रोजी अल्पसंख्यांक समितीच्या कार्यास प्रारंभ झाला. पुढाऱ्यांचे एकमत होत नसल्यामुळे बैठक तहकूब झाली. त्या रात्री गांधी मुसलमान पुढाऱ्यांना भेटणार होते.

४९५) गांधी किंवा काँग्रेस यांचे प्रतिनिधीत्व कोणत्या का स्वरुपाचे असेना त्यांचे म्हणणे किंवा करार आम्हाला मान्य नाही असे डॉ. आंबेडकर म्हणाले.

४९६) पहिल्या गोलमेज परिषदेत अस्पृश्यांचे स्थान राज्यघटनेत मान्य केलेले आहे जर दुसऱ्या गोलमेज परिषदेत भावी राज्यघटनेत अस्पृश्यांना मान्यता मिळत नसेल तर अशा समितीत मी भाग घेणार नाही असे डॉ. आंबेडकर गरजले.

४९७) गांधीने मुसलमानाच्या १४ मागण्या मान्य केल्या. पंजाब व बंगालमध्ये बहुसंख्य प्रतिनिधीत्व द्यावे हे ही मान्य केले. याशिवाय कोरी हुंडीही कबूल केली. परंतु गांधीने एक अट घातली होती ती म्हणजे मुसलमानाने अस्पृश्यांच्या मागण्याला विरोध करावा असा गांधीचा कावा होता.

४९८) डॉ. आंबेडकर अस्पृश्यांचे पुढारी नसून मी आहे असे सुचविले. परंतु भारतातून डॉ. आंबेडकरांना आलेल्या असंख्य तारा व पत्राचे बंडल पाहून गांधीचा दावा लटका व खोटा ठरला. गांधी गोंधळून गेले इतेही गांधी हरले.

४९९) गांधी लंडनमध्ये असताना म्युरायल लेस्टर या बाईकडे राहत असत. थी बाई डॉ. आंबेडकरांना पाहताक्षणी हा कोण सवाई महात्मा असे उद्‌गार तिच्या तोंडातून निघाले. त्या बाईने डॉ. आंबेडकरांना काही प्रश्न विचारले. आपल्या विरोधाची काही कारणे तिला सांगितली.

५००) ज्या सरकारने आजपर्यंत अस्पृश्यता नष्ट करण्यासाठी काहीही केले नाही त्या सरकारची आज्ञा आम्हास बंधनकारक नाही ह्याबाबतीत त्यांची क्षिती बाळगण्याचे काहीच कारण नाही. असे लेख (डॉ. आंबेडकरांचे) टाइम्स मध्ये येत त्यावेळी गांधीची गाळण उडे.

५०१) ब्रिटीश सम्राटाला डॉ. आंबेडकरांनी थोडक्यात पण खंबीर शब्दात अस्पृश्यांची कहाणी सांगितली. डॉ. आंबेडकरांचा तेजस्वी चेहरा, बोलके डोळे, दुथडी भरून वाहणारा अवेश पाहून, त्यांच्या मुखातून अस्पृश्यांच्या दुर्दशेची करूण कहाणी ऐकूण सम्राटाला अत्यंत खेद व विषद वाटला. डॉ. आंबेडकरांच्या वडिलाविषयी व शिक्षणाविषयी सम्राटाने अस्थापूर्वक चौकशी केली.

५०२) गांधी म्हणत मी अस्पृश्यांचा स्वाभाविक पालक आहे. डॉ. आंबेडकर म्हणत आपण अस्पृश्य वर्गाचे जन्मजात अन् स्वयंसिद्ध नेते आहोत.

५०३) डॉ. आंबेडकर कोणत्याही बुद्धीवादी, क्रांतीपुरूषाशी, महात्म्याशी, प्रेषिताशी आपल्या बुद्धी वैभवाच्या बळावर टक्कर देण्यास समर्थ असतात.

५०४) टी.ए. रामन नावाच्या वार्ताहरास बोटीवर असताना एका सहप्रवासाने सांगितले की, भविष्यात मी जर कुणाचा खून करीन तर तो खून डॉ. आंबेडकरांचा असेल.

५०५) सर चिमणलाल सेटलवाड म्हणाले काँग्रेसमध्ये अस्पृश्यांचे प्रतिनिधीत्व करण्यास पुढारीच नाहीत.

५०६) एम.सी.राजा यांनी गांधी व काँग्रेसचा धिक्कार केला व म्हणाले काँग्रेसमधील इतर अस्पृश्य वर्गीय पुढारी डॉ. आंबेडकरांच्या पासंगालाही पुरणार नाहीत. कोठे इंद्राचा ऐरावत तर कोठे शाम भटाची तहानी - अशी स्थिती झाली असती.

५०७) गोलमेज परिषदेच्या कार्याचे वर्णन करताना डॉ. आंबेडकर म्हणाले, प्रतिनिधी म्हणून काँग्रेसने गांधीची निवड करावी हे एक दुर्दैव होय. राष्ट्राच्या भवितव्याविषयी मार्गदर्शन करण्यास गांधीपेक्षा अधिक नालायक माणसाची निवड झाली नसती.

५०८) गांधीचे गुरू गोखले यांनी आधिच भाकित केले होते की, जेव्हा राजकीय शिष्टाई किंवा वाटाघाटीचा इतिहास लिहिला जाईल, तेव्हा गांधी अपयशी ठरल्याचे दिसेल.

५०९) स्पृश्य हिंदूंच्या मानेवर फक्त राजकीय पारतंत्र्याचे जू होते. तर अस्पृश्य वर्गाच्या मानेवर सामाजिक व राजकिय पारतंत्र्याचे जू होते.

५१०) अस्पृश्यांच्या मागण्याबद्दल मी प्राण पणास लाऊन विरोध करीन असे गांधी म्हणत.

५११) मुसलमानांच्या मागण्यांपुढे गांधीने मान झुकविली. त्या मागण्या अन्याय व वक्रबुद्धीच्या होत्या.

५१२) मुसलमानाला स्वतंत्र मतदार संघ व स्वतंत्र प्रांत देण्याचे गांधीने कबूल केले.

५१३) अस्पृश्य मुसलमान किंवा ख्रिश्चन झाले तरी आपणास पर्वा नाही असे गांधी म्हणाले.

५१४) डॉ. आंबेडकर विलायतेत असताना मुंबई सरकारने त्यांची जे.पी. म्हणून निवड केली होती.

५१५) सर मिर्झाइस्माइल यांच्या निवासस्थानी गांधी डॉ. आंबेडकरांची भेट होऊन गांधीच्या हास्यपद विचारांची डॉ. आंबेडकरांनी जाणीव करून दिली होती. नंतर १/१२/१९३१ ला मुख्य प्रधानाने परिषद बरखास्त केली.

५१६) डॉ. आंबेडकरांने पुस्तकाच्या ३२ पेट्या श्रीनिवास बरोबर भारतात पाठविल्या होत्या.

५१७) दि. २८/१२/१९३१ ला गांधी मुंबईला परत आले त्यावेळी ८००० अस्पृश्य स्त्री-पुरूषांनी गांधीला काळी निशाणे दाखवून निषेध नोंद केला. स्पृश्य पुढारी स्वागतासाठी आले असता स्वागत निषेधाचा हलकल्लोळ झाला होता. दोन्ही पक्षांनी एकमेकांवर लाठ्या-काठ्या, विटा व सोडावॉटरच्या बाटल्यांचा भडीमार केला. अशा रितीने गांधीचे स्वदेशी स्वागत झाले.

५१८) डॉ. आंबेडकर ४/०१/१९३२ ला अमेरिकेहून लंडनला परत आले. १५ जाने १९३२ ला मार्सेलिस येथे आगबोटीत चढले. त्याचवेळी ब्रिटीश सरकारने नियुक्त केलेले सत्ताधिकार विचार समितीचे (फ्रेंचाईस कमिटीचे) सभासद आणि मुसलमान कमिटीचे सभासद सौकत अली प्रवास करीत होते.

५१९) अमेरिकेहून लंडनला डॉ. आंबेडकर आले त्यावेळी त्यांच्याबरोबर ग्रंथाच्या २४ पेट्या होत्या.

५२०) डॉ. आंबेडकरांचे २९/०१/१९३२ ला सकाळी ६ वाजता मुंबई धक्क्यावर आगमन झाले. गगनभेदी जयघोषात त्यांचे स्वागत झाले. समता सैनिकाने मानवंदना दिली. पि. बाळू आणि काजरोळकर गांधीवादी असूनही ते स्वागतास हजर होते. मुसलमानांनी सौकत अलीचे स्वागत केले. त्यावेळी सौकत अली म्हणाले की, डॉ. आंबेडकरांनी गोलमेज परिषदेत दाखविलेली हिंमत खरोखरच प्रसंशनीय होती. डॉ. आंबेडकर माझे धाकटे बंधु आहेत असेही ते म्हणाले.

५२१) २९/०१/१९३२ ला ११४ संस्थांच्या वतीने डॉ. आंबेडकरांना मानपत्र देण्यात आले. डॉ. आंबेडकर गहिवरून म्हणाले, गोलमेज परिषदेत मला मिळालेल्या यशाचा धनी मी नसून तुम्हीच सर्वजण आहात.

५२२) डॉ. आंबेडकर म्हणतात, तुम्ही मला देव बनवू नका. एखाद्या व्यक्तीला देवपदाला चढवून इतरांनी आंधळपणाने वाहवत जाणे हे कमकुवत पणाचे लक्षण आहे. तसेच लंडनला असताना मी ४ वेळा गांधीला कसा भेटलो व गांधीने आगाखानाला कुराणाची शपथ घालून अस्पृश्यांच्या मागण्यांना पाठिंबा न देण्यासाठी कशी विनंती केली हि माहिती त्यांनी जाहिर सभेत दिली.

५२३) दुसऱ्याही गोलमेज परिषदेत डॉ. आंबेडकर विजयी झाले. मतदानाचा अधिकार देण्याचे ठरविणाऱ्या समितीचे नाव लोथीयन समिती असे होते.

५२४) अस्पृश्यांवर कोणत्याही तऱ्हेचा बहिष्कार घालणे हा कायद्याने गुन्हा आहे असे राज्यघटनेत नमुद करावे. तसेच नागरिक हक्क भोगण्यास त्यांना स्वातंत्र्य द्यावे अशी केलेली मागणी समितीने मान्य केली.

५२५) बिहारमध्ये डॉ. आंबेडकरांचे मोठ्या थाटात स्वागत करण्यात आले. तसेच मद्रासमध्येही त्यांचे २८/०२/१९३२ ला प्रचंड अशा जनसमुदयाने स्वागत केले.

५२६) डॉ. आंबेडकरांच्या मार्गातील एक अडचण म्हणजे फेब्रुवारी १९३२ मध्ये हिंदू महासभेचे नेते, बा.सी.मुंजे, अस्पृश्यांचे नेते एम.सी. राजा यांच्यात संयुक्त मतदार संघ व राखीव जागा असाव्यात असा झालेला करार.

५२७) राजा-मुंजे कराराची माहिती मिळताच बंगाल, आसामच्या नेत्याने त्या कराराचा धिक्कार केला. विधिमंडळाचे सदस्य आणि बंगाल नामशुद्र असोशिएशनचे अध्यक्ष एम.बी. मलिक अध्यक्ष संयुक्तप्रांत आदि असोशिएशन आदि धर्म मंडळे, पंजाब, डोस्प्रेड क्लास ॲण्ड सोसायटी दिल्ली या सर्वांनी राजा मुंजे कराराला विरोध करून डॉ. आंबेडकरांच्या मागणीला पाठींबा दिला. सावरकर प्रणीत रत्नागिरी हिंदू सभेने डॉ. आंबेडकरांचे अभिनंदन केले.

५२८) सरकारने नाशिक जिल्ह्यातील अस्पृश्य वर्गाच्या स्थितीची पाहणी करण्यासाठी सिमिंग्टन व झकेरिया मनियार यांची समिती नेमली होती.

५२९) इंडियन लेजिस्टेटिव्ह कमिटीचा १९१६ चा निर्णय सर हॅन्रीशार्प (भारताचे शिक्षण आयुक्त) साऊथबरो मताधिकार विचार समिती यांनी अस्पृश्यांच्या गुन्हेगार जमाती, वन्यजाती, आदिवासी यांचा समावेश केला होता. परंतु लोथीयन समितीने डिस्प्रेड क्लास म्हणजे अस्पृश्य वर्ग असा अर्थ केला होता.

५३०) ४/०५/१९३२ ला डॉ. आंबेडकर मुंबईस परतले व ५-६ ला कामठीला डिस्प्रेड क्लास परिषदेस गेले.

५३१) ७/०५/१९३२ ला डिस्प्रेड क्लास परिषद सुरू झाली. राजा-मुंजे कराराला विरोध करणारे व डॉ. बाबासाहेबांस पाठिंबा देणारे सुमारे २०० संदेश त्या ठिकाणी आले होते.

५३२) डॉ. आंबेडकरांच्या मोटारीला ॐ चिन्हांकित भगवा ध्वज होता.

५३३) हिंदूंची अंत:करणे दगड विटांच्या भिंतीप्रमाणे आहेत. भिंतीवर डोके आपटून शेवटी कपाळ मोक्ष होतो. हिंदू लोकांच्या मनाची कठोरता नष्ट होत नाही.

५३४) ४/०१/१९३३ सरकारने गांधीला येरवडा तरूंगात टाकले. अस्पृश्यांना हिंदूपासून वेगळे करू नये. तसेच अस्पृश्यांना सरकारने कोणत्याही सवलती देऊ नये असे गांधीचे मत होते. गांधीने येरवडा तुरूंगात उपोषण सुरू केले.

५३५) डॉ. आंबेडकरांशिवाय गांधीचा जीव वाचविणे अशक्य होते. महत्प्रयासाने डॉ. आंबेडकरांनी सरकारकडून अस्पृश्यांचे हक्क मिळविले होते.

५३६) माझ्यापुरते बोलायचे तर मी कोणतीही गोष्ट करण्यास तयार आहे. पंरतु माझ्या अस्पृश्य वर्गाचे हक्क कमी करण्यास मी मान्यता देणार नाही असे डॉ. आंबेडकर म्हणाले.

५३७) गांधी म्हणाले डॉ. आंबेडकर माझा जीव वाचवा. हिंदू धर्माला आपल्या भूतकाळातील पापांच निरसन करण्यासाठी एकवेळ संधी द्यावी अशी गांधीने डॉ. आंबेडकरांना कळकळीची विनंती केली.

५३८) पुणे करारावर सह्या करणारे पुढारी -

डॉ. आंबेडकर, पंडीत मदन मालविय, जयकर, सप्रु, बिर्ला, राजगोपालचारी, राजेंद्र प्रसाद, श्रीनिवास, राजभोज, पि. बाळू, ग.अ. गवई, ठक्करबाबा, सोळंकी, बरवले, सा.व्हि.मेथा, कामत, राजा गोस्वामी. मुंबईला गेल्यावर आणखी सह्या घेण्यात आल्या.

५३९) २६/०९/१९३३ पुणे करार ब्रिटिश लोकसभेकडून शिक्कामोर्तब करून पास करण्यात आला.

५४०) गांधी म्हणाले डॉ. आंबेडकरांच्या पाठीमागे एवढा समाज आहे असे मला अगोदर माहित असते तर, त्यांच्या मागण्याला मी विरोध केलाच नसता.

५४१) ७ नोव्हेंबर १९३३ ला व्हिक्टोरीया आगबोटीने लंडनला जात असताना बोटीतील प्रमुख प्रवासी गांधीच्या उपोषणाबद्दल चर्चा करीत असता त्यातील एक युरोपियन प्रवासी डॉ. आंबेडकरांकडे बोट दाखवून म्हणाला, **हिंदुस्थानच्या इतिहासाची नवीन पाने लिहिणारा हाच तो तरूण पुढारी.**

५४२) डॉ. आंबेडकर म्हणत दु:खांती किंवा कष्टांती सुख मिळते हा नियम माझ्यासाठी खोटा आहे. हा नियम माझ्यासाठी लागू नाही.

५४३) जे प्रेम करू शकतात तेच सेवा करू शकतात.

५४४) टाईम्स ऑफ इंडियाच्या पत्रकारास डॉ. आंबेडकर म्हणाले ब्रिटीशांनी हिंदुस्थानात जबाबदार राज्य पद्धतीचे राज्य देण्यास संस्थानिकांच्या उत्सुकतेवर किंवा विरोधावर अवलंबून राहू नये. गांधीने मंदिर प्रवेशासाठीविरोध करून प्राण पणाला लाऊ नये आणि महाराज्यपालांनी त्या विधेयकाची मुस्काटदाबी करू नये.

५४५) ज्या धर्माने आम्हाला हिन-नीच दर्जा दिलेला आहे. तो धर्म आम्ही आमचा कसा मानावा.

५४६) स्पृश्य हिंदूला डॉ. आंबेडकर म्हणाले, मनुष्याच्या ठाई असलेल्या पवित्र व्यक्तीमत्वाविषयी सन्मान बाळगणे तुम्हास सभ्यपणाचे वाटत असेल तर तुम्ही देवळे उघडा आणि सज्जनास शोभेल असे वर्तन करा. सज्जन म्हणून घेण्यापेक्षा तुम्हास हिंदूजन म्हणून टेंभा मिरवायचा असेल तर देवळाची द्वारे बंद करा आणि आत्मनाश करून घ्या.

५४७) चातुर्वर्ण अस्पृश्ययतेची जननी व असमानतेचे मुळ आहे.

५४८) सर व्हॅलेन्टाईन चिरोलने टिळकाला असंतोषाचे जनक ही उपाधी टिळकांच्या जिवीत कार्याचे यथार्थ वर्णन ठरते असे म्हटले आहे.

५४९) डॉ. आंबेडकरांच्या बुद्धीमत्तेच्या क्षमतेचे आकलन होत नसलेल्या सवर्ण हिंदू पुढाऱ्याने डॉ. आंबेडकरांना कुतित्स्त बुद्धीने ब्रम्हद्वेष्टा अशी उपाधी दिली.

५५०) जप, तप, यज्ञ-याग, पुजा-अर्चा, पंढरपूर, त्र्यंबकेश्वर, काशी, हरीद्वार, द्वारका, एकादशी, सोमवार वगैरे उपवास, शिवलिला अमृत, गुरूचरित्र, शनिमहात्मे वगैरे पोथ्यांची पारायणे करणे सोडून द्या. सर्व सुखाचे अगर कायदा आहे. म्हणून कायदा करण्याची शक्ती हस्तगत केली पाहिजे. हाच तुमच्या उद्धाराचा मार्ग आहे.

५५१) १३/०४/१९३३ ला डॉ. आंबेडकर येरवड्यातील गांधीला भेटले तेव्हा गांधीने डॉ. आंबेडकरांना फुलांचा गुच्छ दिला व डॉ. आंबेडकरांना म्हणाले सनातनी लोक मला दैत्य म्हणतात. तेव्हा डॉ. आंबेडकर म्हणाले सनातन्यांकडून तुम्ही आणखी कोणती अपेक्षा करता ?

५५२) अर्मी इन इंडिया हा बाबासाहेबांचा ग्रंथ अपुरा राहिला.

५५३) २७/०५/१९३५ ला माता रमाईची जीवनज्योत मालवली.

५५४) एका माथेफिरू सिंधी हिंदू युवकाने डॉ. बाबासाहेबांस स्वत:च्या रक्ताने पत्र लिहून पाठविले की, हिंदू धर्माचा त्याग केल्यास तुम्हास ठार मारणार आहोत.

५५५) मसुरकर महाराजांनी धर्मांतर न करण्याविषयी डॉ. आंबेडकरांचे मन वळविण्याचा प्रयत्न केला.

५५६) रामचंद्र गणेश प्रधानाच्या नेतृत्वाखाली एक शिष्टमंडळ डॉ. आंबेडकरांना भेटले व धर्मांतर आत्ताच करू नये असे सांगू लागले. त्यावर डॉ. आंबेडकर म्हणाले मी आणखी ५ वर्ष थांबतो परंतु शंकराचार्याच्या गादीवर अस्पृश्य व्यक्तीस बसवून त्याच्या पायावर शंभर एक ब्राम्हण कुटुंबाने सामाजिक समता मान्य असल्याबद्दल व हृदय पालटाचा निर्देशक म्हणून डोके ठेऊन पाया पडावे.

५५७) धर्मांतराला आणखी ५ वर्ष वेळ आहे. जर आपल्या कृतीने अस्पृश्यता निवारण्यास काही भरीव कार्य करून दाखविल्यास धर्मांतराच्या प्रश्नाचा आपण पुन्हा विचार करू असेही डॉ. आंबेडकर म्हणाले होते.

५५८) १३/०१/१९३६ शिखांच्या नेत्यांनी डॉक्टरांना शिखधर्म स्विकारण्याची विनंती केली.

५५९) १५/०३/१९३६ या दिवशी चित्तरंजन नाटक कंपनीने बॉम्बे थिएटरमध्ये बाबांचा सत्कार केला. आप्पासाहेब टिपणीसकृत दख्खनचा दिवा हे नाटक दाखवत असता त्या नाटकात पेशवे कालीन अस्पृश्यांना किती अमानुषपणे वागणुक होती त्या विषयी काही प्रसंग होते. महार जातीच्या माणसाच्या गळ्यात मडके व कमरेला बोराटी बांधलेली असे. नाटकातील नटसुद्धा मडके व बोराटी बांधून रंगभूमीवर येण्यास शरमत असत.

५६०) केरळमधील थिय्या समाजाचे नेते डॉ. कुहिर व इतर चार नेत्यांनी शिखधर्म स्विकारला होता.

५६१) डॉ. आंबेडकर व गांधीची भेट शेगावला झाली. परंतु बोलणी फिसकटली.

५६२) शेठ वालचंद हिराचंद आणि शेठ जननालाल बजाज यांनी डॉ. आंबेडकरांना विचारले आपण नेहरू गांधीच्या म्हणण्याप्रमाणे का चालत नाहीत. त्यावर डॉ. आंबेडकर म्हणाले, त्यांच्याशी माझे अनेक मुद्यावर मतभेद आहेत. त्यांच्या त्यांच्या उदाहरणाला लागू होण्यासारखा मी माणूस नाही. तत्कालीन यशाकरीता स्वत:च्या विवेकबुद्धीच्या बळी देणारा मी माणूस नाही. आई व दाई यांच्यात जो फरक असतो तो फरक त्यांच्यात नि माझ्यात आहे हे विसरून कसे चालेल.

५६३) जात-पात तोडक मंडळाच्या सभेत डॉ. आंबेडकरांनी अध्यक्षीय भाषणाची पुस्तीका तयार केली. "जातीचे निर्मुलन" "ॲनिहिलेशन ऑफ कास्ट" असे नाव होते. हे पुस्तक जात-पात तोडक प्रबंध म्हणून प्रसिद्ध झाले. या प्रबंधावरून डॉ. आंबेडकरांचे अफाट वाचन, सूक्ष्म निरीक्षण प्रवृत्ती प्रत्ययाला येते. त्यांनी श्रुती-स्मृतिला तर्कशास्त्राच्या प्रखर कसोटीला लावले होते. तो प्रबंध जसा खोचक-बोचक आहे, चिघळलेल्या जखमेवर जसा काडीखार झोंबतो तसा तो हिंदूंच्या मनाला झोंबतो.

५६४) हिंदूंच्या देवदेतांची अस्पृश्यांनी पुजा करू नये. हिंदूंच्या तिर्थ यात्रेंच्या ठिकाणी जाऊ नये असे जाहिर आवाहन त्यात केलेले आहे.

५६५) बौद्धधर्म स्वीकारावा म्हणून इटलिचे लोक १० जून १९३६ ला दादरला राजगृह येथे डॉ. आंबेडकरांना भेटले होते.

५६६) मुसलमान, ख्रिश्चन सरकार यांना डॉ. आंबेडकरांच्या विरूद्ध उठवावे म्हणून व पदभ्रष्ट करावे म्हणून गांधी प्रयत्न करीत होता.

५६७) हिंदुस्थानात मुसलमानांचे राज्य स्थापन्यासाठी हिंदूच लढत होते. मुसलमान नेते जीनाने अमेरिकन लेखक लुई फिशर या लेखकास सांगितले होते की, हिंदी मुसलमानांपैकी शेकडा ७५ टक्के मुसलमान पुर्वाश्रमीचे हिंदूच होते. नेहरूंनी तर तो आकडा ९५ टक्के सांगितला.

५६८) काँग्रेस पक्षाच्या व्यासपीठावरून मौलाना अहमद अलीने अस्पृश्यांची विभागणी हिंदू व मुसलमानांत समसमान करावी अशी मागणी केली होती. इतकेच नव्हे तर शरणगतीच्या वेळी अस्पृश्यांची हिंदूत नोद होऊ नये म्हणून मुसलमानाने हरकत केली होती.

५६९) गांधी म्हणत असत डॉ. आंबेडकरांच्या मापकाठीने जर धर्म मोजले तर सर्व धर्म तोकडे पडतील.

५७०) डॉ. आंबेडकर गांधीला म्हणत असत की गांधीने अनुवंशिक तत्वाप्रमाणे तागडी न धरता बॅरिस्टर होऊन अर्धवट संन्याशी अर्धवट राजकारणी व्हायला नको होते.

५७१) डॉ. आंबेडकरांनी स्वतंत्र मजूर पक्षाची स्थापना केली. त्या पक्षाचा जाहीरनामा थोडक्यात असा होता- भुमीहिन गरीब कुळे शेतकरी, कामगार यांच्या निकडीच्या गरजा आणि गाऱ्हाणे शिक्षण निवारा आरोग्य सेवा वाचनालये सभागृहे रोटरी बोलपट पुर्ण करून खेड्यांना आधुनिक स्वरूप देऊन सर्वांगीण उन्नती करणे.

५७२) काँग्रेसी पिळवणूक करण्याऱ्यांची एक संघटना आहे.

५७३) लंडनमध्ये असताना मुंबईच्या विविध वृत्त या साप्ताहिकाने एक खोटी बातमी छापली होती. ती म्हणजे डॉ. आंबेडकरांनी एका इंग्रज बाईशी लग्न केले होते व १४ जानेवारी १९३७ रोजी तिला घेऊन ते मुंबईस येतआहेत. डॉ. आंबेडकर मुंबईला पोहचल्यावर त्याविषयी वार्ताहराने विचारले असता ते म्हणाले हे निराधार आहे, असत्य आहे. मला चोरून लग्न करण्याची काही आवश्यकता नाही.

५७४) डॉ. आंबेडकरांनी जरी लग्न केले असते तरी त्यांच्या अढळ श्रद्धेला काही धोका पोहचला नसता हे अढळ सत्य आहे.

५७५) १७/०२/१९३७ साली सार्वत्रिक निवडणुका झाल्या. त्यामध्ये डॉ. आंबेडकर विजयी झाले. डॉ. आंबेडकरांच्या विरूद्ध असलेले काँग्रेसचे बाळू बाबाजी पालवणकर हरले. स्वातंत्र मजूर पक्षाच्या १७ जागांपैकी१२ जागा यशस्वी झाल्या होत्या.

५७६) दि. १६/०३/१९३७ रोजी चवदार तळ्याच्या केसचा निकाल लागला. डॉ. आंबेडकर विजय झाले. पाणी पिण्याचा हक्क प्रस्थापित झाला.

५७७) हरी नावाचा अस्पृश्य नेहरूचा नोकर होता. त्यालाच उभा करून काँग्रेसने त्याला निवडून आणले होते.

५७८) १९ जुलै १९३३ ला काँग्रेसने मंत्रीमंडळ बनविले. एक दिवस अगोदर कुपर मंत्रीमंडळाने राजीनामा दिला. ब्रिटीश राज्याशी निष्ठेने वागण्याची शपथ काँग्रेस आमदाराने घेतली. हातात गीता घेऊन शपथविधी झाला व विधीमंडळाच्या खुर्च्यावर विराजमान झाले.

५७९) डॉ. आंबेडकरांने हातात गीता न घेताच शपथविधी उरकला.

५८०) देशभक्ती हे राजकारण्याचे अंतीम आश्रय स्थान असते असे डॉ. आंबेडकर म्हणत.

५८१) देशभक्ती हे बदमाशाचे अंतीम आश्रय स्थान असते असे जॉनसनचे मत होते.

५८२) १९३७ साली मसुरला अस्पृश्यांच्या जिल्हा परिषदेत डॉ. आंबेडकर अध्यक्षीय भाषणात म्हणाले गांधीच्या हातून कामगार व दलित वर्गाचे कधीही कल्याण होणार नाही असे माझे ठाम मत आहे. (शेतकरी कामगार फेडरेशनची सभा होती)

५८३) मी कम्युनिष्टांचा कट्टर वैरी आहे असे डॉ. आंबेडकर म्हणत असत.

५८४) "हिलाल" वृत्तपत्राचे संपादक अलीबहादूर खान यांनी "विविधवृत्त" साप्ताहिकाचे संपादक रामचंद्र काशिनाथ तटणीस यांच्यावर अब्रुनुकसानीचा दावा माझगाव (मुंबई) कोर्टात चालत होता. डॉ. आंबेडकरांनी वकिलपत्र स्विकारले होते. डॉ. आंबेडकरांचे सात तास बचावाचे भाषण झाल्यावर हद्दपारीची मागणी केलेल्या आरोपीस (तटणीसाला) फक्त ५ रूपये दंड झाला.

५८५) डॉ. आंबेडकरांनी १३/०५/१९३८ ला कणकवलीला जाऊन सभा घेतली. त्यावेळी कणकवली गावाला प्रथमच ध्वनीक्षेपणाचे दर्शन झाले. महारांना आपले हक्क संपादन करण्यासाठी आणि सन्मानाने उदरनिर्वाह करण्यासाठी अविरत झगडले पाहिजे असा उपदेश केला.

५८६) १५/०५/१९३८ रोजी चिपळूणच्या सभेत डॉ. आंबेडकरांनी सिंहगर्जना केली की, गांधीची मोहिनीविद्या माझ्यावर छाप पाडू शकत नाही. नेहरू व सुभाषबाबू गांधीला शरण गेले. परंतु मी गांधीला कधीही शरण जाणार नाही आणि जर कधी काळी मी काँग्रेसमध्ये गेलोच तर स्वकर्तृत्वाने व गुणवत्तेने तेथे छाप टाकेन.

५८७) खोती नष्ट करण्याचे विधेयक काँग्रेसने मुद्दामच अडथळा आणून दाबून ठेवले आहे. पाठिंब्याअभावी जर ते विधेयक यशस्वी झाले नाही तर शेतकऱ्यांनी कर बंदीची चळवळ सुरू करावी. मी स्वत: त्या प्रश्नावर तुरूंगात जाण्यास तयार आहे. ऐंशी टक्के लोकसंख्या असलेल्या शेतकऱ्यांच्या कुटूंबापैकी एखाद्यास या प्रांताचे मुख्य प्रधानपद प्राप्त झाल्याचे मला पहावयाचे आहे.

५८८) ऑगस्ट १९३८ साली आर.एम. भट माध्यमिक शाळेत सभा होती. त्या सभेत डॉ. खरे यांच्या राजीनाम्याचा कच्चा खरडा आपण तयार केला नाही असे गांधीने खोटे निवेदन केले होते. तर डॉ. खरे यांनी गांधीचे म्हणणे धांदात खोटे आहे हे सिद्ध करून दाखविले होते.

५८९) हरिजन असल्यामुळे मंत्री म्हणून डॉ. खऱ्यांना गांधीनी विरोध दर्शविला होता.

५९०) दोन प्रभावी पक्ष असल्याशिवाय कोणत्याही देशाचा राज्यकारभार सुरळीत चालत नाही असे डॉ. आंबेडकरांचे मत होते.

५९१) डॉ. आंबेडकरांच्या समोर गांधी पवित्र माणूस आहे असे म्हटल्यास बाबासाहेब ताडकन बोलत गांधी घुबडासारखे अपवित्र व अशुभ आहेत.

५९२) चित्रा नावाच्या मासिकाला मुलाखत देताना डॉ. आंबेडकर म्हणाले गांधीचे गोलमेज परिषदेच्या वेळेचे वागणे अत्यंत विश्वासघातकीपणाचे होते. एखाद्या घोटीव बदमाशानेही असले नीच कपट केले नसते.

५९३) मुख में राम बगल में छुरी अशा प्रकारच्या माणसाला जर महात्मा म्हणता येत असेल तर मोहनदास महात्मा आहेत.

५९४) खरा क्रांतीकारक गुळमुळीत भाषा बोलत नसतो तो धूर व धुळ उठवत वावरत असतो.

५९५) बेळगावच्या शाखेने निपाणीला सभा घेतली. डॉ. आंबेडकरांचा भव्य सत्कार करून रथातून एक मैल मिरवणूक काढली. रथाला ५० बैल जुंपले होते.

५९६) मनुष्याच्या इच्छेविरूद्ध त्यास काम करण्यास भाग पाडणे म्हणजे त्यास गुलाम बनविणे. कामगाराला शिक्षा करणे म्हणजे त्यास गुलाम बनविणे. युनाइटेड स्टेटच्या राज्यघटनेत म्हटल्याप्रमाणे गुलागिरी म्हणजे अनैच्छिक दास्य होय. संप करणे म्हणजे कामगाराला आपण कोणत्या अटीवर काम करण्यास तयार आहोत हे सांगण्याचा स्वातंत्र असलेला हक्क होय असे डॉ. आंबेडकर म्हणत.

५९७) ७/११/१९३८ ला स्वतंत्र मजूर पक्ष व गिरणी कामगार युनियनने एक दिवसाचा संप पुकारला. त्यावेळी काँग्रेस नेत्यांनी मुंबईत संप अयशस्वी करण्यासाठी तुफान प्रचार केला होता.

५९८) डिलाईड रोडला दोन्ही पक्षाचे केंद्र होते. गिरणी संपाच्या वेळी दगडफेक झाली. एक पोलीस अधिकारी व काही पोलीस जखमी झाले. पोलीसांनी गोळीबार केला. त्यात दोन इसम जखमी झाले. एकाने मुन्शिच्या गाडीवर हल्ला केला. गाडीचा चक्काचूर झाला. गाडीत सरदार पटेल, मथुरादास, निकमजी, भवानजी, अर्जुनखीमजी मुन्शी होते. ७२ लोक जखमी झाले होते. ११ जणांना प्राणांतिक जखमा झाल्या. ३५ लोकांना अटक झाली. अहमदाबाद अमळनेर, जळगाव, चाळीसगाव, धुळे, पुणे इ. ठिकाणी संपाचे लोन पसरले होते.

५९९) संपाच्या नेत्याने बळजबरीचे मार्ग अवलंबिले असे सरदार पटेल म्हणाले तेव्हा सरदार पटेलांचे निवेदन म्हणजे अथपासुन इतिपर्यंत असत्त्याने विणलेले जाळे आहे असे डॉ. आंबेडकर म्हणाले.

६००) कम्युनिष्टांनी व डॉ. आंबेडकरांनी कामगार हितासाठी एक आघाडी बनविली होती. परंतु डॉ. साहेबांनी आपला पक्ष व संघटना कम्युनिष्टपासून सावधपणे अलग ठेवली होती.

६०१) स्वामी सहजानंद डॉ. आंबेडकरांना राजगृहावर भेटले व काँग्रेसला मिळण्यासाठी चर्चा करु लागले. परंतु साहेब म्हणाले काँग्रेसने जर ब्रिटीश साम्राज्यशाही विरूद्ध खरोखरच लढा पुकारला असता तर मी काँग्रेसमध्ये आलो असतो. परंतु वस्तुस्थिती तशी नाही. काँग्रेस पक्ष आपल्या हाती असणारी यंत्रणा भांडवलवाले व स्वार्थी लोकांसाठी वापरत आहे. म्हणून मी काँग्रेसला मिळू शकत नाही.

६०२) महाडला शेतकऱ्यांची परिषद भरली होती. काँग्रेसी मंत्रीमंडळ शेतकऱ्यांच्या दु:खासंबंधी कसे अपयशी ठरले हे डॉ. आंबेडकर सांगत होते. मुंबई राज्याचे मुख्यमंत्री बाळ गंगाधर खेर हे गुळाचे गणपती आहेत व इतरमंत्री सरदार पटेलांच्या दाराचे कुत्रे आहेत. सरदार पटेल गुजरातमध्ये मुख्यमंत्री खेरांच्या सत्कार प्रसंगी म्हणाले होते की, हा सत्कार मुख्यमंत्री म्हणून करण्यात येत नसून खेर गांधीभक्त आहेत म्हणून करण्यात येत आहे. एका महाराष्ट्रीयनचा हा अपमान आहे. त्याचा मी सूड घेईनच. पटेलांनी जर माझा असा अपमान केला असता तर मी त्याला जोड्यांनी मारला असता असे जाहीर सभेत डॉ. आंबेडकर गर्जले.

६०३) डॉ. आंबेडकरांच्या दलाविषयी पटेल व खेरांनी प्रसंशा उद्‌गार काढलेले, बाबांनी मुंबईच्या सभेत उल्लेख केला.

६०४) विरोध व वैर ह्यातला जो फरक जाणतो तोच खरा शहाणा.

६०५) पुण्यातील गोखले अर्थशास्त्र व राजकारणांचे शिक्षण देणाऱ्या डॉ. आंबेडकरांना २९/०१/१९३९ रोजी आमंत्रण देऊन राजकारण व अर्थशास्त्र विषयावरील व्याख्यान कार्यक्रम आयोजीत केला. तेथे २ तास व्याख्यान अतिशय मार्गदर्शक झाले.

६०६) आपल्या जिवीतासंबंधी व देशासंबंधी स्वतंत्रपणे व शास्त्रशुद्ध रितीने विचार करण्याची प्रवृत्ती गांधी युगातील लोकांत राहिली नव्हती. म्हणून गांधीयुगास डॉ. आंबेडकर तमोयुग म्हणत असत.

६०७) काँग्रेस सर्व भारताची प्रतिनिधी आहे असा गांधीचा दावा फॅसिस्ट वृत्तीचा असून तो हिंदी लोकांस प्राणघातक ठरेल असे पत्रक सावरकर, न.ची. केळकर, जमनादास मेहता, चिमनलाल सेटलवाड, सर कावसजी जहांगीर, विठ्ठलराव चंदावरकर यांनी काढले होते. त्यावर डॉ. आंबेडकरांची सही होती.

६०८) ऑक्टोंबर १९३९ च्या तिसऱ्या आठवड्यात नेहरू डॉ. आंबेडकर भेट झाली. २ तास चर्चा झाली. ती भेट पहिलीच होती.

६०९) नेहरूला डॉ. आंबेडकर खाजगी भाषणात चौथ्या इयत्तेतील शाळकरी मुलगा म्हणत असत.

६१०) युद्धविषयक धोरण स्पष्ट करीत असतानाच दलित वर्ग शूद्रांच्या निच स्थानी कुजत राहील असा राजकीय दर्जा सहन करणार नाही. अस्पृश्यांवरील हिंदूंच्या सामाजिक, आर्थिक, धार्मिक वर्चस्वात भर पडेल तर ती मी सहन करणार नाही असे काँग्रेसला डॉ. आंबेडकरांनी ठासून सांगितले.

६११) दलित वर्ग माझा आहे. त्यांच्यात मी जन्मलो आहे. मी त्यांचा आहे. जीवात जीव असेपर्यंत मी त्यांना अंतर देणार नाही.

६१२) विधीमंडळाला मी दृढनिश्चयपुर्वक सांगतो की, जेव्हा अस्पृश्यांचे हित व देशाचे हित यांमध्ये संघर्ष निर्माण होईल, त्यावेळी मी माझ्यापुरते सांगेन की अस्पृश्यांच्या हितालाच मी प्राधान्य देईन. जी छळ करणारी जमात आहे ती देशाच्या नावाने बोलत असली तरी मी त्यांना पाठिंबा देणार नाही.

६१३) देशाचे हित आधी की माझे हित आधी असा प्रश्न उद्‌भवला तर मी देशाचेच हित पाहिन.

६१४) माझ्या समाजाचे हित आधी की देशाचे हित आधी असा प्रश्न उद्‌भवल्यास मी माझ्या अस्पृश्य बांधवांच्या मागे उभा राहीन. ही माझी भूमिका प्रत्येक ठिकाणी समजून घ्यावी. युद्धविषयक ठराव मांडण्यापूर्वी काँग्रेस अध्यक्ष व कार्यकारिणी अध्यक्ष भुलाभाई देसाई, गांधीचे कार्यवाहक महादेव देसाई यांच्याशीही चर्चा झाली.

६१५) १९ मार्च हा दिवस स्वतंत्र दिन म्हणून अस्पृश्य समाजात साजरा करतात. कारण ह्याच दिवशी महाडला मागणी स्वातंत्र्याचा लढा सुरू झाला होता.

६१६) गांधी आणि त्यांच्या सहकाऱ्यांनी सुभाषबाबूला काँग्रेस अध्यक्ष पदावरून काढले.

६१७) २२/०६/१९४० ला सुभाषबाबूंनी डॉ. आंबेडकरांची मुंबईला भेट घेतली.

६१८) सुभाषबाबूला डॉ. आंबेडकरांनी २ प्रश्न विचारले -

१) आपण काँग्रेसच्या विरोधात निवडणुकीला उभे राहणार काय ?

सुभाषबाबूचे उत्तर नकारार्थी होते.

२) अस्पृश्यांच्या बाबतीत तुमच्या पक्षाची ठाम भूमिका कोणती राहील ?

या प्रश्नाचे सुभाषबाबू निश्चीत असे काहीच उत्तर देऊ शकले नाही.

६१९) बळाचा उपयोग हिंसेचा पाडाव करण्यासाठी ही गोष्ट वेगळी आणि अन्यायी अटी घालण्यासाठी वापरणे ही गोष्ट वेगळी हे समजणे गांधीच्या विचारसरणीच्या बाहेरचे आहे असे डॉ. आंबेडकर म्हणाले.

६२०) दु:खाचे मुळ बळाच्या उपयोगात नसून त्याचा दुरूपयोग करण्यात आहे.

६२१) काँग्रेस सत्तेच्या किल्ल्या हातात घेण्यासाठी लढत आहे. काँग्रेस देशासाठी लढते हे म्हणणे शुद्ध ढोंग आहे.

६२२) डॉ. आंबेडकरांचा थॉट्स ऑन पाकिस्तान हा ग्रंथ डिसेंबर १९४० साली प्रसिद्ध झाला.

६२३) राजगोपालचारीने मुस्लीम लिगचा सैनिक म्हणून नाव नोंदविले होते.

६२४) सुसंगतीच्या नावाखाली पूर्वी केलेल्या विधानाला विचारवंत व्यक्ती कधीच चिटकून राहत नाहीत. पुर्नविचार करण्याचे आणि त्यानुसार मतांतर करण्याचे धाडसही जबाबदार व्यक्तीच्या अंगी असावे

लागते. निस्वार्थ बुद्धीने व देशहित बुद्धीने कार्य करणाऱ्या विचारवंतांच्या जीवनात जेव्हा असे प्रसंग येतात तेव्हा ते तसेच वागतात.

६२५) डिसेंबर १९४१ च्या दुसऱ्या आठवड्यात डॉ. आंबेडकर राष्ट्रीय संरक्षण मंडळाच्या दुसऱ्या अधिवेशनाला दिल्लीला उपस्थित होते.

६२६) १९४२ च्या फेब्रुवारीत भरलेल्या राष्ट्रीय संरक्षक मंडळाच्या सभेला डॉ. आंबेडकरांनी सहभाग घेतला होता.

६२७) १३/०२/१९४२ रोजी हिंदूने आम्हास कसे वागवले हा ग्रंथ लिहिण्यास सुरूवात केली. हा ग्रंथ १९४५ मध्ये व्हॉट काँग्रेस ॲण्ड गांधी हॅव डन टू अनटचेबल्स् या नावाने प्रसिद्ध झाला.

६२८) १९४२ साली वागळे हॉल मुंबईला वसंत व्याख्यान मालेच्या निमित्ताने पाकिस्थान विषयी विचार थॉट्स ऑन पाकिस्तान या डॉ. आंबेडकरांच्या ग्रंथावरुन ३ दिवस चर्चा चालली होती. त्यावेळी डॉ. आंबेडकर म्हणाले इतिहास विसरा असे लोकांना सांगणे चूक आहे. जे इतिहास विसरतात ते इतिहास घडवू शकत नाहीत.

६२९) ३०/०३/१९४२ ला डॉ. आंबेडकरांनी क्रिप्स साहेबांची भेट घेतली. ज्या राज्यघटनेस अस्पृश्यांची मान्यता नाही ती आमच्यावर लादली तर ब्रिटीशांनी आमचा विश्वासघात केला असे आम्ही मानू. असा निरोप ब्रिटीश सरकारला द्यावा असे क्रिप्स साहेबांना सांगण्यात आले.

६३०) १४/०४/१९४२ रोजी मुंबई आणि महाराष्ट्रातील प्रमुख शहरात आंबेडकर जयंती अतीउत्सहात पार पडली.

६३१) पुण्यात शनिवार वाड्याच्या समोर झालेल्या जयंतीच्या सभेत एम.सी.राजा, राजभोज यांची भाषणे प्रा.श्री.म.माटे यांच्या अध्यक्षेत झाली. डॉ. आंबेडकरांना दिर्घायुष्य लाभावे, जीवन सुखी व्हावे अशा सुभेच्छा देण्यात आल्या. ४९ सार्वजनिक संस्थांनी ९ दिवस आंबेडकर जयंतीचा कार्यक्रम आखला होता.

६३२) अशीच पुणे महानगरपालिकेने पालिका सभागृहात सभा आयोजीत केली होती. नगराध्यक्ष गणपतराव नलावडे सभाध्यक्ष होते. डॉ. मोहिते, पोपटलालशहा, राजाराम म. भोळे इ. मान्यवरांनी डॉ. आंबेडकरांवर स्तुती सुमने वाहिली. केशवराव जेधे, बापुसाहेब गुप्ते यांनी बाबांच्या कार्याला गौरविले.

६३३) १९/ ०४/ १९४२ साली कल्याण येथे रोहिदास तरूण सुधारक संघाच्या महिला शाखेचे उद्घाटन बाबासाहेबांच्या हस्ते झाले.

६३४) राजकिय विचारवंतांपैकी एडमंड बर्क हा डॉ. आंबेडकरांचा सर्वांत अत्यंत आवडीचा होता.

६३५) ना.म. जोशी म्हणाले आपला एकेकाळचा शिष्य एवढ्या महान योग्यतेला चढलेला पाहून मला धन्यता वाटली. डॉ. आंबेडकर चौथ्या इयत्तेत शिकत असताना आपण त्यांचे गुरू होतो. डॉ. आंबेडकर हुशार व धिट विद्यार्थी होते.

६३६) मुंबईला कामगार मैदानावर सुवर्ण महोत्सव समितीने सभा घेऊन डॉ. आंबेडकरांना एक थैली भेट देण्यात आली. त्यावेळी डॉ. साहेब म्हणाले माझा वाढदिवस साजरा करण्याची सवय तुम्ही सोडून द्या. कारण जोसमाज एखाद्याचे उदोउदो करतो तो नाशाच्या मार्गावर आहे असे मी मानतो.

६३७) २/०७/१९४२ ला महाराज्य पालांनी नवीन कार्यकारी मंडळ बनविले. त्यात १४ हिंदी व ५ युरोपियन मंत्री होते. त्यामध्ये डॉ. आंबेडकरांचे नाव होते.

६३८) टाईम्स ऑफ इंडिया या वृत्तपत्रातून डॉ. साहेबांचा गौरव करून एका अस्पृश्य हिंदूची भारतीय सरकारच्या कार्यकारी मंडळात नेमणूक झाली. हे या देशाच्या इतिहासातील पहिलेच उदाहरण आहे अशी प्रसंशा केली.

६३९) एका अस्पृश्याने मुसलमान धर्म स्वीकारून खुशरु नाव धारण करून मोठा पराक्रम केला होता. त्याने दिल्लीच्या खिलजी घराण्याचा पाडाव करून हिंदू राज्य स्थापन करून मुसलमानाला दे माय धरणीला सोडले होते. परंतु डॉ. आंबेडकरांची नेमणुक अस्पृश्य वर्गातून पहिले लोक नेते म्हणून झाली होती.

६४०) डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी न्यायाधिशाचे पद नाकारले होते.

६४१) शिख धर्माची शिकवण समजून घेण्यासाठी मुलगा यशवंतराव व पुतण्या मुकुंदरावाला अमृतसरला गुरूद्वारात ठेवले होते.

६४२) चित्रा नावाच्या मासिकात गांधी महात्मा आहेत काय ? अशा शिर्षकाच्या लेखात गांधीची उपरोधक व उपहासाचे शस्त्र वापरून महात्मेपणाची यथास्थित टिंगल केली होती.

६४३) जे बौद्धधर्म सोडून हिंदूधर्मात आले नाहीत त्यांना ब्राम्हणांनी अस्पृश्य बनविले असे डॉ. आंबेडकरांनी शूद्र पूर्वी कोण होते या ग्रंथात विस्तृतपणे नमूद केलेले आहे.

६४४) थॉट्स ऑन पाकिस्तान या ग्रंथाची दुसरी आवृत्ती म्हणून पाकिस्तान ऑर दि पार्टिशियन ऑफ इंडिया नावाचा ग्रंथ १९४५ ला प्रसिद्ध झाला. या ग्रंथास गांधी, जीनाने मान्यता दिली होती.

६४५) मुसलमान विरहित सैन्य भारताच्या सुरक्षेच्या दृष्टीने अत्यंत महत्वाचे आहे. पाकिस्तान निर्मिती पूर्वी पाकिस्तानातील हिंदू व भारतातील मुसलमान यांची अदलाबदली करावी असेही डॉ. आंबेडकरांनी सूचीत केले होते.

६४६) १९४१ च्या ऑगस्टमधील वतनदार महारांच्या सिन्नरच्या सभेला डॉ. आंबेडकर होते.

६४७) राष्ट्रीय संरक्षण मंडळाचे तिसरे अधिवेशन १९४२ मध्ये भरले होते.

६४८) लॉर्ड लिनलिथगो यांनी १९४२ ला मंत्रीमंडळाच्या बैठकीत ठराव मांडला की सर्व काँग्रेस पुढाऱ्यांना अंदमान बेटावर कैदेत ठेवा. त्यावेळी डॉ. आंबेडकरांनी खडसाऊन सांगितले की त्यांना कैद करून अंदमानात पाठविणे हे ब्रिटीशांच्या नावाला महान कलंक ठरेल. लोकशाही पद्धतीला न साजेसे वर्तन सरकारने करू नये.

६४९) २३/०८/१९४२ रोजी दिल्लीतील सत्कार प्रसंगी बाबांनी मंत्रीमंडळात जाण्याचा हेतू स्पष्ट केला. अस्पृश्य वर्गाला इतरांच्या बरोबरीचे स्थान देणे हे माझे साध्य आहे. तुम्ही इतरांचे गुलाम राहू नये यासाठी शासनाची सुत्रे तुमच्या हाती द्यावयाची आहेत. आमच्या समाजाचे भवितव्य सुधारण्याचे प्रयत्न होत नसतील तर मी राजीनामा देऊन बाहेर पडेन.

६५०) हिंसेला शरण जाऊन मिळालेली शांतता खरी शांतता नसून, युद्धाचा नायनाट करायचा असेल तर युद्ध जिंकून तह प्रस्थापित केला पाहिजे.

६५१) कॅनडातील क्युबो शहरी इन्टिट्युट ऑफ पॅसिफिक रिलेशन्स या संस्थेची डिसेंबर १९४२ मध्ये आठवी परिषद भरली होती. या परिषदेला अनटचेबल्स ॲण्ड दि इंडिया कॉन्टिट्युशन या शिर्षकाखाली डॉ. आंबेडकरांनी एक निबंध सादर केला होता. हाच निबंध पुढे मि. गांधी ॲण्ड द इमॅन्सिपेशन ऑफ अनटचेबल्स या नावाने पुस्तक रूपाने प्रसिद्ध केला.

६५२) गांधीने अनेक ठिकाणी अनेक चुका करून आज फाळणीची परिस्थिती निर्माण केली आहे असे डॉ. आंबेडकर म्हणाले.

६५३) लॉर्ड लिनलिथगो यांना डॉ. आंबेडकरांने ७२ पानांची कैफियत सादर केली होती. त्याची माहिती दलित कार्यकर्त्याला व्हावी म्हणून दिल्लीला बैठक बोलविली होती. त्या बद्दल ८/१२/१९४३ ला परळ (मुंबई) येथे ही सभा झाली. या देशाला स्वराज्य मिळेल तेव्हा मुसलमानासोबत आपणही सोबत भागीदार राहणार आहोत. आपण यशस्वी झालेलो आहोत असे डॉ. आंबेडकरांनी अवेशपूर्ण भाषणात सांगितले.

६५४) सत्ता सोपविण्यासाठी केवळ हिंदू मुसलमानात संमेट होऊन उपयोग नाही. दलित वर्गासह तडजोड घडवून आणली पाहिजे असे व्हाईसरॉयने स्पष्ट नमूद केले.

६५५) भारताला जर कोणी दगा दिला असेल तर तो अस्पृश्यांनी नसून शास्त्री सारख्या लोकांनी दिला आहे. अस्पृश्यांनी फक्त न्याय संरक्षण मागितले.

६५६) विद्यार्थ्याने विद्यार्थी दशेत फक्त अभ्यासाकडे लक्ष द्यावे, राजकारण करू नये.

६५७) राज्यघटना तयार करून दाखवा असे भारतमंत्र्यांनी आवाहन केले. नेरूंनी १५० ते २०० पानांचा नेहरू रिपोर्ट तयार करून दिला. त्यामध्ये अस्पृश्यांचा प्रश्न धार्मिक असून राजकीय नाही असे नमूद होते.

६५८) माझ्या मृत्यूनंतर माझ्या विचाराची किंवा सांप्रदयाची संस्था काढू नये. समाज अथवा संस्था कालमानानुसार आपल्या विचाराला मुरड घालण्यास तयार होत नसेल तर ती जीवन संघर्षात टिकू शकणार नाही.

६५९) माझी बाजू पूर्णपणे बरोबर आहे अशी माझी खात्री पटल्यावरच विद्यार्थाने माझे नेतृत्व स्विकारावे.

६६०) मुंबईत दलित फेडरेशन तर्फे डॉ. आंबेडकरांना थैली अर्पण करण्यात आली. बाबासाहेब सभेसमोर बोलत असताना म्हणाले अस्पृश्य वर्ग मुसलमानासारखा भूभाग तोडून मागत नाही. फक्त समानतेचे हक्क मागत आहेत. जर आमच्या मागण्या न्याय नाहीत असे काँग्रेसला वाटले तर आमचे प्रकरण निस्पृह जागतिक न्यायालयासमोर ठेवावे. आम्ही न्यायालयाचा निर्णय माणण्यास तयार आहोत.

६६१) भारतातील अनेक विमानतळे डॉ. आंबेडकरांच्या कारकिर्दीत बांधण्यात आली. अरबी समुद्राला बंगालचा उपसागर जोडण्याची मनिषा अपूर्ण राहिली. डॉ. आंबेडकरांच्या कामाची कार्यक्षमता पाहून सर सेनापतीनी आश्चर्य व्यक्त केले.

६६२) सत्य हे कटू सत्य असते. वादळ उठविण्यात मला मजा वाटते असे डॉ. आंबेडकर म्हणत.

६६३) ९/१२/१९४३ रोजी बाबासाहेबांनी धनबादला भुलनबावरी खानीची तपासणी केली. डोक्याला सुरक्षा टोपी घालून ४०० फुट खोल खाणीत उतरले.

६६४) १०/१२/१९४३ रोजी राणीगंज कोळसा खाणीत मजुरांची चौकशी केली. सितापूर खाणीतील मजुरांची स्थती पाहिली. सोधपूर खाणीत जाऊन मजुरांची विचारपूस केली. बंगाल व बिहार राज्याच्या मंत्रांची खाणकामगार संघटनेसमोर अमुल्य भाषणे झाली.

६६५) २८/०४/१९४४ बिहारमधील कोडर्मा अर्भकाच्या खाणीची पाहणी केली.

६६६) कामाचे ८ तासाचे दिवस ठरवून दिले. दामोदर धरण योजना डॉ. आंबेडकरांनीच जन्माला घातली. संपुर्ण दामोदर योजनेचे अवघड कामही डॉ. आंबेडकरांच्याच बुद्धीची किमया आहे.

६६७) डॉ. आंबेडकरांनी ब्रिटीश सरकार भारत देश सोडण्यापूर्वी काँग्रेसला विचारले की ब्रिटीश भारत सोडणार आहेत, आगामी घटनेत अस्पृश्यांचे स्थान कोणते असेल हे जाहीर करा.

६६८) सत्ता देणे सोपे असते परंतु शहाणपण देणे कठीण असते.

६६९) डॉ. आंबेडकरांचे दामोदर (धरण) योजनेचे कार्य पूर्ण भारताचा चेहरा मोहरा बदलून टाकणारे आहे. दामोदर नदी बिहारचे संकट समजले जात असे. दर २-४ वर्षांनी महापूर येऊन लाखो लोकांचे जीवन नष्ट होत होते. १८५९ पासून १२ महापूर आले होते. १७/०७/१९४३ ला महापूर आला त्यावेळी ७० गावे नष्ट झाली. ११,००० घरे वाहून गेली. लाखो लोक बेघर झाले. बंगालचा भारताशी संपूर्ण संबंध तुटला होता. अन्नधान्य पोहचविणे कठीण झाले होते. त्यात जपानी सैन्य कलकत्यापर्यंत बॉम्ब वर्षाव करीत होते. याच सुमारास बंगालमध्ये दुष्काळाने कहर केला होता. सुमारे २५,००० लोक मृत्युमुखी पडले होते. लक्षावधी लोक अपंग झाले होते. याच सुमारास भारत सरकारने डॉ. आंबेडकरांवर दामोदर नदीला अटोक्यात आणण्याच्या योजनेचे काम सोपविले होते आणि डॉ. आंबेडकरांच्या खंबीर नेतृत्वाने दामोदर प्रकल्प (दामोदर योजना) कार्यान्वीत झाला.

६७०) डॉ. आंबेडकर मजूर मंत्री असताना मजूर खात्याव्यतिरिक्त कोळसा खाणी, मुद्रण-लेखन सामुग्री, लष्कर, मुलकी अधिकाऱ्यांना संस्थानात असणाऱ्या केंद्रातून प्रशिक्षण देणे, प्रसिद्धी लष्कर भरती, गृहबांधणी, सार्वजनिक बांधकाम, पिलाणी येथील प्रशिक्षण केंद्र सिव्हिल पायोनिअरचे खाते अशी खाती बाबांकडे सोपविली होती.

६७१) ब्रिटीश सरकारने हिंदी स्वातंत्र्याचा ठराव १५/०७/१९४७ रोजी स्वीकृत केला.

६७२) घटना समितीत राजेंद्र प्रसादने डॉ. आंबेडकरांस बोलण्यास विनंती केली तेव्हा अखंड हिंदूस्थानची घोषणा डॉ. आंबेडकरांनी केली. घटना समिती मंत्रमुग्ध झाली. आचार्य आत्र्यांनी त्या दिवसापासून डॉ. आंबेडकरांच्या विरोधात न लिहिण्याची शपथ घेतली. जे हात दगड मारण्याच्या तयारीत होते तेच हात फुलांचा वर्षाव करीत होते. निंदक म्हणून गणलेले डॉ. आंबेडकर राष्ट्राच्या घटना समितीचे सल्लागार बनले. नव्हे ! घटनेचे शिल्पकार झाले.

६७३) डॉ. आंबेडकर ध्वज समितीचे सदस्य होते.

६७४) नेहरूंनी डॉ. आंबेडकरांस विधीखाते सांभाळाल काय अशी विचारणा केली. डॉ. आंबेडकरांनी होकार दिला. नियोजन व विधीखाते नेहरूंनी बाबांकडे सोपविले.

६७५) मुंबईच्या वकीलाच्या संस्थेने ६/०८/१९४७ ला डॉ. आंबेडकरांचा सत्कार केला.

६७६) फेब्रुवारी १९४८ ला फक्त ६ महिन्यांच्या कालावधीत घटनेचा कच्चा आराखडा डॉ. आंबेडकरांने तयार केला व घटना समितीचे अध्यक्ष डॉ. राजेंद्र प्रसाद यांना सादर केला. तो कच्चा मसुदा लोकमताकरीता देशासमोर ठेवण्यात आला.

६७७) शारदा कबीर व डॉ. आंबेडकर यांचा विवाह १५/०४/१९४८ रोजी हार्डिज ॲव्हेन्यु नवी दिल्ली आपल्या निवासस्थानीच झाला.

६७८) मसुदा कमिटीचे अध्यक्ष डॉ. आंबेडकर होते.

६७९) १४/०४/१९५० साली संपूर्ण देशात आंबेडकर जयंती साजरी झाली.

६८०) १४/११/१९४८ घटनेचा कच्चा खरडा मसुदा समितीने घटना समितीसमोर ठेवला.

६८१) राष्ट्रध्वजावर चरखा न ठेवल्यास आपण त्या ध्वजास वंदन करणार नाही असे गांधी म्हणाले.

६८२) १०/०७/१९४७ रोजी ध्वज समितीच्या कामासाठी डॉ. आंबेडकर विमानाने दिल्लीला निघाले. सांताक्रुज (मुंबई) विमानतळावर प्रांतिक हिंदू सभेच्या नेत्यांनी डॉ. आंबेडकरांना भगवा ध्वज अर्पण करून म्हणाले, राष्ट्रध्वज भगवाच ठेवा. तेव्हा अनंतराव गद्रे, केशव ठाकरे, गावडे यांना डॉ. साहेब म्हणाले भगव्या ध्वजासंबंधी चळवळ झाल्यास मी पाठिंबा देईन.

६८३) हिंदू महासभेचे नेते रावबहाद्दूर सी.के.बोले, अनंतराव गद्रे यांना सांताक्रुज (मुंबई) विमान तळावर म्हणाले, एका महाराच्या मुलाकडून भगवा ध्वज घटना समितीवर लावण्याची अपेक्षा तुम्ही करता आहेत नाही का ?

६८४) ध्वज समितीने अशोक चक्रांकित तिरंगा घ्वज राष्ट्रध्वज असावा असे ठरविले. (निश्चीत केले.)

६८५) जर काँग्रेस पक्ष डॉ. आंबेडकरांना ब्रिटीशांचा बगलबच्चा म्हणत होता, तोच काँग्रेसपक्ष डॉ. आंबेडकरांचा जयघोष करू लागला.

६८६) ज्याने २० वर्षापुर्वी मनुस्मृतीची होळी केली. त्याच बंडखोर धुरंदरास आपली नवीन स्मृती रचण्यास डॉ. आंबेडकरांस विनंती करावी लागली. हा स्पृश्य हिंदूंवर नियतीने उगवलेला सुडच म्हणावा लागेल.

६८७) मुंबईचे अस्पृश्य मंत्री तपासे यांनी पंढरपुरच्या विठोबाच्या मंदिरात ११/११/१९४७ रोजी कार्तिकी एकादशी दिवशी प्रथम प्रवेश केला. त्या दिवशी विठूराया बंध मुक्त झाला.

६८८) २०/११/१९४८ रोजी घटनेचे ११ कलम स्वीकृत करण्यात आले आणि भारतमातेच्या कपाळी असलेला कलंक धुवून निघाला.

६८९) घटनेचे पहिले अधिवेशन २६/५/१९४८, दुसरे अधिवेशन ३०/०७ ते १७/१०/१९४८ व तिसरे अधिवेशन १४/११/१९४८ पासून सुरू.

६९०) घटनेत ३९५ कलमे व ८ परिशिष्टे आहेत.

६९१) २६/११/१९४९ रोजी घटना समितीने राज्यघटना स्विकारली.

६९२) २६/०१/१९५० पासून राज्यघटनेचा देशावर अंमल चालू झाला.

६९३) ५/११/१९४९ रोजी लेखन समितीचे सभासद टी.टी. कृष्णामाचारी सभागृहात माहिती सांगत होते. घटनेचा मसुदा तयार करण्याकरीता ७ सदस्यांची निवड केली होती. त्यापैकी एकाने राजीनामा दिला. त्याची जागा भरली नाही. एक मृत्यू पावला, त्याचीही जागा तशीच राहिली. एक अमेरिकेस गेला, त्याचीही जागा तशीच राहिली. एक संस्थानिकाच्या कामात गुंतला होता. त्यामुळे तो असून नसल्यात जमा होता. दोन सभासद प्रकृतीस्वास्थ बिघडले म्हणून हजर राहत नसत. शेवटी घटना तयार करण्याचा संपूर्ण भार (जबाबदारी) डॉ. आंबेडकरांनीच उचलली.

६९४) २५/११/१९४९ रोजी चर्चेला उत्तर देताना डॉ. आंबेडकर म्हणाले घटना कितीही चांगली असली तरी ती राबविण्याऱ्यावर बरी वाईट ठरते.

६९५) जानेवारी १९५२ ला सार्वत्रिक निवडणुका झाल्या. बाबासाहेबांच्या विरोधात काँग्रेसने काजरोळकरास उभे केले होते. डॉ. डांगे यांनी राखीव जागेची मते देऊ नयेत म्हणून प्रचार केला. त्यामुळे ५०,००० पेक्षा जास्त मते हेतुता वायफळ घालविण्यात आली. ही मते अवैद्य ठरविण्यात आली. म्हणून बाबासाहेबांना या निवडणुकीत खोटी हार घ्यावी लागली.

नारायण काजरोळकराला १३७९५० मते पडली बाबासाहेबांना १२३५७६ मते पडली.

राखीव मतदान (साहेबांस मिळणारे) ५०,००० पेक्षा जास्त अवैध ठरवून साहेबांचा खोटा पराभव करण्यात आला.

६९६) हिंदू कोड बील मंजूर करण्यास काँग्रेसचा विचार नाही असे दिसताच डॉ. आंबेडकरांनी २७/०९/१९५१ रोजी आपल्या मंत्रीपदाचा राजीनामा पाठविला.

६९७) हैद्राबादच्या उस्मानिया विद्यापीठाने १२/०१/१९५३ रोजी डॉ. आंबेडकरांना डॉक्टर ऑफ लिटरेचर ही पदवी दिली.

६९८) या देशाला स्वातंत्र गमविण्याचा प्रसंग अनेक वेळा आलेले आहेत. तेही भारतीयांच्याच देशद्रोही आणि विश्वासघातामुळे.

६९९) मोहंमद बिन कासिमने जेव्हा सिंधवर स्वारी केली. तेव्हा राजादाहिरच्या सरसेनापतीने मोहंमद बिन कासिमच्या मुनिमाकडून लाच घेऊन आपल्या राजाच्या बाजूने लढण्याचे नाकारले.

७००) मोहंमद घोरील हिंदुस्थानावर स्वारी करण्याचे आमंत्रण देऊन, पृथ्वी राजाच्या विरूद्ध लढणारा जयचंद्र राठोड होता तसेच सोलंकी राजाचे व आपले सहाय्य देण्याचे वचन मोहंमद घुरीला दिले होते.

७०१) शिवाजीच्या विरूद्ध मराठे सरदार व रजपुत मोघलांच्या बाजूने लढत होते.

७०२) जेव्हा शिख राज्यकर्त्यांविरूद्ध ब्रिटीश लढत होते. तेव्हा शिखांचे सेनापती मूग गिळून गप्प बसले होते.

७०३) १८५७ ला ब्रिटीशांच्या विरूद्ध हिंदुस्थान युद्धाच्या वेळी शिखांनी हिंदुस्थानला कसलेही सहाय्य केले नाही.

७०४) १८१८ साली पेशव्याच्या गद्दारीमुळे महारांना ब्रिटीशांना सहाय्य करावे लागले.

७०५) डॉ. सौ सविता आंबेडकर म्हणत असत राजकारण हे डॉक्टरांचे जीवन आहे. तेच त्यांच्या मानसिक आणि शारिरिक प्रकृतीला शक्तीवर्धक औषध आहे.

७०६) कोल्हापुरला स्त्रीयांचा प्रचंड समुदाय डॉ. आंबेडकरांना मानपत्र देताना, डॉ. आंबेडकर म्हणाले, हिंदुसंहिता विधेयकाबद्दल भारतातील प्रमुख स्त्री नेत्यापैकी कोणीही स्त्रीयांच्या सामाजिक प्रगतीमध्ये उत्साह दाखविला नाही. हिंदू संहितेची स्थिती नासक्या रसायनात दुध मिसळावे तशी झालेली आहे.

७०७) महाडच्या वसतीगृहाचे आवार स्वत: बाबांनी कुदळ, फावडे, टोपली घेऊन साफसुफ केले होते.

७०८) अस्पृश्य वर्गातील तरूण शिक्षित मुलींनी वरच्या वर्गातील व्यक्तींशी लग्न करू नये असा सल्ला डॉ. आंबेडकर देत असत.

७०९) श्रीनिवास शास्त्री अकसाने म्हणाले होते की, अंतर राष्ट्रीय शांतता परिषदेत डॉ. आंबेडकरांची उपस्थिती देशाच्या हिताला बाधक होईल. त्याचवेळी डॉ. आंबेडकरांनी त्यांना उत्तर दिले. माझ्या सार्वजनिक जीवनातल्या इतिहासात मला लांछनपद असे मी काहीही केलेले नाही. शास्त्री स्वत: ब्रिटीशांचे कुलुंगी कुत्रे आहेत. शास्त्रींनी जर त्यांच्या जिवनात महत्व संपादन केले असेल तर ते ब्रिटीशांनी त्यांना नाच्या पोर समजून नाचविल्यामुळेच देशाला जर कोणी दगा दिला असेल तर, तो गांधी शास्त्र्यांनीच दिला. अस्पृश्यांनी नाही.

७१०) कलकत्याला दौलतराव गुलाजीराव जाधव रेल्वेत मोठे अधिकारी होते. डॉ. आंबेडकर त्यांच्या घरी जेवले म्हणून स्वयंपाकी व नोकरांनी जाधवांचे घर बाटले म्हणून नोकरी करण्याचे नाकारले. जाधव महार होते हे त्या नोकरांना माहित नसावे.

७११) जाधवांनी अनेक इतर अधिकाऱ्यांच्या त्रासातून डॉ. आंबेडकरांनी बरेच वेळा सोडविले होते. जाधव कलकत्याहून बाबासाहेबांसाठी ग्रंथ व मासे तप्तरतेने पाठवित असत.

७१२) इंग्लंडच्या वास्तव्यात बाबासाहेबांबद्दल अफवा पसरविण्यात आली होती की, बाबासाहेबांनी एका बाईशी लग्न केले. महापुरूषाला हिनत्व आणण्याचे असे कितीतरी वेळा अनेक महापुरूषांच्या जीवनात काही हलकट लोकांनी प्रयत्न केलेले आहेतच. बाबासाहेबांचा त्या बाईशी जिव्हाळ्याचा सूख दु:खाचा पत्रव्यवहार असे. त्यांनी त्या बाईबरोबर बायबलचा अभ्यास केला होता. तिच्याशी बाबांचे चांगले संबंध होते. बाबांनी गांधीने व काँग्रेसने अस्पृश्य वर्गास कसे वागविले हा ग्रंथ त्या बाईला अर्पण केला. त्या बाईचे नाव फॅनी फिजरॉल्ड होते.

७१३) १०/०१/१९४६ रोजी नवी दिल्ली येथे लोकसभेच्या १० सभासदांच्या शिष्टमंडळाने डॉ. आंबेडकर, नेहरु व जीना बरोबर चर्चा केली. तेव्हा एकट्या डॉ. आंबेडकरांबरोबर ९० मिनिटे चर्चा झाली.

७१४) २६/०६/१९४६ ला सिद्धार्थ महाविद्यालय सुरू केले.

७१५) शूद्र पुर्वी कोण होते हा ग्रंथ डॉ. आंबेडकरांनी महात्मा फुले यांना अर्पण केला.

७१६) ९/१२/१९४६ डॉ. सच्चिदानंद यांच्या अध्यक्षेतेखाली घटना समितिची बैठक झाली.

७१७) भारताची फाळणी करणाऱ्या पुढाऱ्यांना गांधी म्हणाले होते, अगोदर माझे तुकडे करा. मग देशाचे तुकडे करा. त्याच माथेफिरू गांधीने देशाचे दोन तुकडे करण्यासाठी पुढाकार घेऊन पाकिस्थानची निर्मीती केली.

७१८) फाळणीच्या वेळेस लाखो लोकांना बेघर व्हावे लागले. सैतानाने मुलाबाळांच्या अमानुषपणे कत्तली केल्या. पिसाट नरपशूंनी स्त्रीयांच्या अब्रु लुटून विटंबना केली. स्त्रियांचे अपहरण करण्यात आले. जबरदस्तीने मुसलमान धर्माची दिक्षा देण्यात आली. रस्ते मुंडक्यांनी व धडांनी भरले होते. अस्पृश्यांनी आपल्या मनगटावर मुसलमान धर्माच्या मैत्रीचे द्योतक म्हणून एक बिल्ला बांधावा. जीनाला अस्पृश्यांनी आपला त्राता समजावा जानेंद्र मंडलांनी फतवा काढला होता.

७१९) डॉ. आंबेडकरांनी पत्राद्वारे पाकिस्तानच्या सरकारचा निषेध केला. मिळेल त्या साधनाने भारतात परत येण्याचे आपल्या लोकांना आवाहन केले.

७२०) दिल्लीतील निर्वासितांनी व्यापलेल्या मशिदी मुसलमानाला वाहिवाटीसाठी द्याव्यात म्हणुन १३/०१/१९४८ ला गांधीने उपोषण सुरू केले. त्याचा परिणाम असा झाला की, भारताकडून पाकिस्थानला ५५ कोटी रुपये द्यावे लागले.

७२१) देशाच्या फाळणीमुळे निर्माण झालेल्या परिस्थितीमुळे राष्ट्राला रक्त व अश्रुंच्या पुरातून वाट काढावी लागत आहे असे नेहरूंनी कबूल केले.

७२२) स्वातंत्र्याचा दिवस उजाडण्यापूर्वी एक दिवस अगोदर कलकत्याला लोकांनी गांधीवर दगडांचा वर्षाव केला होता.

७२३) दारूण निराशा, गोधळ, हाहा:कार उडाला असतानाच ३०/०१/१९४८ रोजी दिल्लीला नथुराम गोडसेने गांधीला गोळ्या घालून ठार केले.

७२४) १५/०४/१९४८ डॉ. आंबेडकरांचा विवाह सविताशी (शारदा) झाला. त्यावेळी एखाद्या संस्थानिकाने सामान्य बाईशी लग्न करण्यात जे वैशिष्ट्य आहे. त्याहीपेक्षा जास्त मोठे वैशिष्ट्य डॉ. आंबेडकरांच्या या सोहळ्याला आहे असे न्यूयार्क टाईम्सने म्हटले.

७२५) डॉ. आंबेडकरांच्या वाढदिवसानिमित्त मुंबईचे मुख्यमंत्री बाळासाहेब खेर म्हणाले डॉ. आंबेडकर फक्त दलितांचे नेते नसून ते भारताचे महान पुढारी आहेत.

७२६) **मुंबईला शिवडी येथील वाढदिवसाच्या कार्यक्रमात स.का.पाटील म्हणाले डॉ. आंबेडकर एकटेच मध्यवर्ती चालवू शकतील.**

७२७) मी मध्यवर्ती सरकारला जाऊन मिळालो आहे काँग्रेस पक्षाला नव्हे असे बाबासाहेब उद्‌गारले. मी काँग्रेसमध्ये गेलो तर पाण्यात दगड जसा अभंग राहतो तसा मी राहिन. तुम्ही मात्र काँग्रेसमध्ये गेलात तर ढेकळाप्रमाणे विरघळून जाल. म्हणून तुमची संघटना आलिप्त व अभेद्य ठेवा.

७२८) डॉ. आंबेडकरांबद्दल गौरोद्‌गार काढताना मुंबईच्या वरिष्ट न्यायालयाचे न्यायमुर्ती महंमद अली करिम म्हणाले, आपणास घटनेद्वारे मिळालेले हक्क प्रत्येक नागरिक भोगीत असताना प्रत्येक भारतीय नागरिक डॉ. आंबेडकरांची कृतज्ञपणे आठवण करील.

७२९) लोकसभेचे सभासद हनुमंतय्या नवी दिल्ली येथे म्हणाले डॉ. आंबेडकरांना भावी पिढ्या एक उद्धारकर्ता आणि घटनाशास्त्रातील एक मोठा अधिकारी व्यक्ती म्हणून ओळखतील व असाही एक दिवस उगवेल ते देशाचे प्रधानमंत्री झाल्याचे लोकांच्या दृष्टीस येईल.

७३०) लोकसभेचे दुसरे सभासद सिध्वा म्हणाले की, खरे सांगावयाचे झाल्यास डॉ. आंबेडकरांच्या कर्तृत्वाचा आणि कार्याचा गांधीवर प्रभाव पडल्यामुळेच गांधीला दलितांच्या हक्कासाठी काहीतरी करावे असे वाटू लागले.

७३१) जनता पत्राचे संपादक यशवंतराव आंबेडकर होते.

७३२) बौद्ध धर्म विधी कसे असतात. सिलोनमध्ये बौद्ध धर्म कितपत जीवंत आहे हे पहाण्यासाठी डॉ. सौ. सविताबाई, दलित पक्षाचे कार्यवाहक पांडुरंग राजभोज डॉ. आंबेडकरांसमवेत विमानाने कोलंबोला गेले.

७३३) कोलंबो येथे भाषणात डॉ. आंबेडकर म्हणाले भारतातून बौद्ध धर्म समुळ नष्ट झालेला नाही. शंकराचार्याच्या उदयानंतर बौद्ध धर्म अनेक वर्षे चालू होता. शंकराचार्य व त्यांचे गुरू बौद्ध धर्मीय होते. बौद्ध धर्माच्या विरूद्ध प्रचार करणाऱ्या वैष्णव व शैव पंथाच्या लोकांनी बौद्ध धर्मातील काही आचार व चालीरितीचा स्वीकार केला.

७३४) अलाउद्दीनने स्वारी केली तेव्हा हजारो बौद्ध भिख्खुंच्या कत्तली केल्या होत्या.

७३५) हिंदू समाजाच्या मूलभूत चौकटीमध्ये बदल करण्याचे कार्य एका महाराने करावे म्हणून डॉ. आंबेडकर भारावून गेले होते.

७३६) हिंदी संहिता विधेयक तयार करताना आधारभूत ग्रंथसामुग्री व हस्तलिखीतांनी एक खोली भरली होती.

७३७) हिंदू संहितेत फरक करून ३९ पानांची पुस्तीका तयार करून लोकसभेच्या सदस्यांना दिली.

७३८) बौद्ध धर्म भारत देशात १२०० वर्षे नांदला असे बाबांनी वरळी (मुंबई) च्या सभेत सांगितले.

७३९) अमेरिकेहून परत आल्यावर नेहरूनी घोषणा केली की हिंदी संहिता बील लोकसभेत पास झाले नाही तर आपले सरकार राजीनामा देईल.

७४०) सरदार पटेल, राजेंद्र प्रसाद यांनी विधेयकास विरोध केला होता.

७४१) डॉ. आंबेडकरांनी हिंदू संहिता बील लोकसभेत ५/०१/१९५१ रोजी मांडले होते.

७४२) भारतीय स्त्रीयांच्या अवनतीला व नाशाला कारण मनुस्मृती आहे असे डॉ. आंबेडकरांनी ठासून सांगितले.

७४३) जून १९५० ला डॉ. आंबेडकरांनी पिपल्स इज्युकेशन सोसायटी नावाचे महाविद्यालय सुरू केले. कौन्सिलला समारंभ राजेंद्र प्रसाद च्या हस्ते झाला. पहिले प्राचार्य म.भि. चिटणीस होते. पुढे १९५५ ला त्या महाविद्यालयाचे नाव मिलींद महाविद्यालय ठेवले व सभोतालच्या वनाचे नाव नागसेन वन असे नामकरण केले.

७४४) हिंदू संहिता बील पास होत नाही असे दिसताच २७/०९/१९५१ ला डॉ. आंबेडकरांनी मंत्रीपदाचा राजीनामा दिला.

७४५) भारताला सुभाषबाबूंनी स्वातंत्र मिळवून दिले. काँग्रेसने नव्हे असे निवडणुक प्रचार सभेत डॉ. आंबेडकर म्हणाले.

७४६) मी देशाशी काहीही विद्रोह केला नाही. देश हितच हृदयात सदैव बाळगले. गोलमेज परिषदेच्या वेळी मी देशहिताच्या दृष्टीने गांधीच्याही पुढे २०० मौलांनी होतो असे डॉ. आंबेडकर म्हणाले.

७४७) ५/०६/१९५२ रोजी डॉ. ऑफ लॉ ही पदवी कोलंबिया विश्वविद्यापीठाने डॉ. आंबेडकरांना दिली.

७४८) दलित समाजातील सुशिक्षित लोकांवर माझा विश्वास नाही असे डॉ. आंबेडकर म्हणत असत.

७४९) विद्यापीठ हे ज्ञानाचे केंद्र असले पाहिजे कारकुनी करण्यासाठी नाही.

७५०) हैद्राबादला दलित फेडरेशनच्या सभेत डॉ. आंबेडकर म्हणाले जे लोक पंढरपूरच्या यात्रेला जातील त्यांना आपण जातीबहिष्कृत करू.

७५१) भाषिक आंध्रराज्य करण्यासाठी पोटी श्रीरामलू यांना आत्मबलिदान करावे लागले.

७५२) श्यामची आई बोलपट काढल्याबद्दल आचार्य अत्रेस डॉ. आंबेडकरांनी धन्यवाद दिले.

७५३) ३/१०/१९५४ रोजी माझे वैयक्तीक तत्वज्ञान या विषयावर डॉ. आंबेडकरांचे आकाशवाणीवर भाषण झाले.

७५४) ३/१०/१९५४ रोजी शेड्युल कास्ट फेडरेशनने डॉ. आंबेडकरांना १,१८,००० रूपयांची थैली अर्पण केली. तिचा उपयोग दादरला उभारण्यात येणाऱ्या इमारतीसाठी करण्यात येईल असे डॉ. आंबेडकरांनी सांगितले.

७५५) पददलित समाजाला मनुष्याचा दर्जा मिळवून देणे त्यांच्या आत्मसन्मानाची वाढ करणे आणि त्याला आत्मोद्धार करण्यास समर्थ करणे हेच डॉ. आंबेडकरांचे जीवन कार्य होते.

७५६) शंकराचार्याचा उदय होताच हिंदू धर्माने धूर्तपणे बौद्ध धर्माची काही तत्वे आपल्या धर्मात समाविष्ट करून घेतली. मात्र जातीभेद कर्मकांड तसेच ठेवले.

७५७) रामानुज, चक्रधर, कबीर, रामानंद, नानक, चैतन्य, ज्ञानदेव आणि महाराष्ट्रातील इतर संत कवी यांच्या शिकवणीमुळे हिंदू धर्माचे तिसऱ्यांदा पुनरूज्जिन झाले. चौथ्या स्थित्यांतराला प्रारंभ राजाराममोहनरॉय, महात्मा ज्योतिबा फुले, न्या. रानडे यांच्या कार्याने झाला.

७५८) डॉ. आंबेडकरांच्या कार्यामुळे पुनरूज्जीवनाच्या ५ व्या स्थितंतरास प्रारंभ झाला.

७५९) हिंदू धर्म आणि हिंदू समाज यांच्या विरूद्ध पुकारलेले डॉ. आंबेडकरांचे बंड धरणी कंपासारखे हादरे होते.

७६०) अडीज हजार वर्षात पददलित समाजात डॉ. आंबेडकर हे पहिले क्रांतीकारक नेते होते.

७६१) डॉ. आंबेडकर चेहऱ्याने निमगोल, डोक्यावर टक्कल, उंची ५ फुट ७ इंच, वजन १८० पौंड, छाती ४४ इंच विशाल, महत्वकांक्षेचे निदर्शक होते. आव्हान देणाऱ्या हनुवटीत आकाश कोसळले तरी कार्य तडीस नेण्याचे अलौकिक धैर्याचे निदर्शक होते. त्यांच्या हनुवटीच्या बाकात सर्व जगाच्या तिरस्काराचे तीन-तेरा करण्याचे सामर्थ होते. त्यांचे डोळे तेजस्वी नी भेदक होते. हे स्वयंप्रकाशित स्वतंत्रप्रज्ञावंत वादळी मनोवृत्तीचे होते. मनाविरूद्ध काही घडल्यास त्यांच्या रागाचा पारा चढत असे.

७६२) थोर पुरूषांचा राग क्षणिक असतो.

७६३) बाबासाहेब एवढे तटस्थ असत की यशवंताच्या लग्नाला ते हजर राहिले नाहीत. डॉ. सविता हजर होत्या.

७६४) यशवंतरावाचा मुलगा आजचे प्रकाश आंबेडकर यांना पाहताचक्षणी बाबासाहेब त्यांना गोंजारत असत.

७६५) डॉ. आंबेडकरांचा कुत्रा मरण पावला त्यावेळी ते अक्षरश: दु:खाने अतिविव्हळ झाले होते.

७६६) बाबासाहेबांना गाण्याची, वादनाची, चित्रकलेची आवड होती. ते स्वत: चित्रकार होते.

७६७) डोळे बिघडले त्यावेळी माझे वाचन बंद होईल म्हणून बाबासाहेब रडत होते. त्यांना निरनिराळ्या पेनचा अतीमोह असे. मौल्यवान कपड्यांचे ते शौकीन होते.

७६८) बाबासाहेब पाकशास्त्रात पारांगत होते. स्वत: स्वयंपाक करून दुसऱ्याला जेऊ घालण्यात त्यांना आनंद वाटत असे.

७६९) बाबांचे हस्ताक्षर अतिशय वळणदार होते.

७७०) चांगल्या जातीचा कुत्रा दिसल्यास ते जरूर घेत. त्यांनी हरीण सुद्धा पाळले होते.

७७१) पंडीत मदनमोहन मालवीयाने बाबांचे ग्रंथसंग्रह २ लाख रूपयांना घेण्याची इच्छा प्रदर्शित केली होती. त्यावेळी बाबा म्हणाले ग्रंथसंग्रह जाणे म्हणजे माझ्या कुडीतून प्राण जाणेच होय. त्यांच्या ग्रंथसंग्रहाला हात लावण्यास ते कुणालाही परवानगी देत नसत.

७७२) नवी दिल्ली येथेही त्यांचे ग्रंथसंग्रहालय होते.

७७३) धेय्यपुर्तीसाठी अविरत परिश्रम केल्याने मनुष्याला कार्य करण्याची अफाट शक्ती नी प्रसंशनीय नैतिक धैर्य लाभते असे बाबा वारंवार म्हणत असत.

७७४) तीन महान व्यक्तींचा डॉ. आंबेडकरांच्या जीवनावर व जीवीतकार्यावर परिणाम झाला.

१) महात्मा बुद्धाचे जीवन

२) महात्मा कबीरांची शिकवण

३) महात्मा जोतीरावांचे कार्य

७७५) अढळ विचाराच्या आणि जीवीतकार्यासाठी झटणाऱ्या थोर पुरूषाला शत्रू असतात.

७७६) धर्माचा संबंध थेट हृदयाशी असतो तर निर्बंधाचा संबंध बुद्धीशी असतो.

७७७) जीवनात भावना मोठे कार्य घडवून आणतात.

७७८) बाबासाहेब डिसेंबर १९५४ ला तिसऱ्या जागतिक बुद्ध परिषदेत रंगूनला गेले. सोबत सावदकर व पत्नी सवीतामाई होत्या.

७७९) रंगूनच्या तिसऱ्या जागतिक बुद्ध धम्म परिषदेत बाबासाहेब म्हणाले बुद्ध धर्माला विरोध करणाऱ्यांनी माझ्याशी वादविवाद करण्यास यावे मी सर्व पंडितांचा पराभव करीन. हिंदू धर्मावर बुद्धधर्माचे फार दूरवर परिणाम झालेले आहेत. गोरक्षण हा बुद्धधर्माच्या अहिंसेचा एकप्रकारे विजय आहे.

७८०) अशोकचक्र भारताच्या ध्वजावर झळकत आहे ती माझीच कामगिरी आहे असे बाबासाहेब म्हणत असत.

७८१) रंगूनहून आणलेली बुद्धमुर्ती बाबासाहेबांनी पुण्याजवळील देहूरोड येथे नवीन बांधलेल्या बुद्धविहारामध्ये बुद्धमुर्तीचे अनावरण केले.

७८२) १२०० वर्षानंतर बुद्धमुर्तीची प्राणप्रतिष्टा करण्याचा बहुमान भारत देशात दलित समाजाचा आहे.

७८३) पंढरपूरच्या विठेबाची मूर्ती वस्तुत: बुद्धाची मूर्ती आहे. विठोबाचे पांडूरंग हे नाव पुंडलीक या शब्दापासून बनलेले आहे. पुंडलिक म्हणजे कमळ आणि कमळालाच पालीमध्ये पांडुरंग म्हणतात. म्हणजेच पांडुरंग दुसरा कोणी नसून बुद्धच आहे.

७८४) मे १९५५ मध्ये डॉ. आंबेडकरांनी भारतीय बुद्धजन समितीची स्थापना केली. बाबासाहेबांनी दिक्षा घेतल्यानंतर त्या समितीचे नामकरण भारतीय बौद्धमहासभा असे केले.

७८५) मुंबईचे मूळ रहिवाशी कोळी आहेत. मंबई ईस्टेट लक्ष्मीबाई नावाच्या विधवा बाईची आहे. ती पोर्तुगीजांनी करारान्वये भाडेतत्वावर घेतली होती. शेवटी तिची सर्व मालकी त्यांनी आपल्याकडे घेतली.

७८६) बुद्ध ॲण्ड हिज धम्म हा ग्रंथ प्रथम बुद्ध ॲण्ड हिज गॉस्पेल नावाने मंत्रीमंडळाच्या खाजगी वाचनासाठी ५० प्रती छापल्या होत्या.

७८७) थॉट्स ऑन लिंग्विस्टीक स्टेट्स या ग्रंथात डॉ. आंबेडकरांनी हिंदी राष्ट्रभाषा व्हावी म्हणून ७७ विरूद्ध ७८ मते पडली असे नमूद केले आहे.

७८८) बुद्ध जयंतीनिमीत्त २४/०५/१९५६ रोजी डॉ. आंबेडकरांचे नरेपार्क मुंबई येथे शेवटचे भाषण झाले.

७८९) बाबासाहेबांचा आजार जास्तच वाढू लागला. ते आपल्या पत्नीला म्हणत तू डॉ. आहेस तू मला बरे करू शकत नाहीस मग मी दुसरे डॉक्टर का पाहू नये. (बाहेरून आणलेली औषध घेणे पत्नीला आवडत नसे.)

७९०) नागपूर ही प्राचीन काळच्या बौद्ध धर्मीय नाग लोकांची नगरी असल्यामुळे बाबांनी नागपूर भूमीची दिक्षा समारंभासाठी निवड केली.

७९१) २३/०९/१९५६ ला एक पत्रक काढून १४/१०/१९५६ ला ९ ते ११ या वेळेत सकाळी बौद्ध दिक्षा घेणे समारंभ होईल असे प्रशिद्ध केले होते.

७९२) गोरखपूर जिल्ह्यातील कुशीनाराचे महास्थवीर चंद्रमणी यांना खास आमंत्रण देऊन दिक्षा सोहळ्यासाठी बाबांनी बोलवून घेतले.

७९३) डॉ. बाबासाहेब आंबेडकर, नानकचंद रट्टू व पत्नीसह दिल्लीहून विमानाने नागपूरला ११/१०/१९५६ ला आले.

७९४) बुद्ध धर्माचा महापंडीत नेता नागार्जन यांच्या वास्तव्यामुळे पूर्वी पुणीत झालेल्या नागपूर नगरीचे महत्व ऐत्याहासिक सांस्कृतीक धार्मिक नगरीत रूपांतर झाले.

७९५) नागपूरला श्रधानंद पेठेतील चोखामेळा वसतीगृहाशेजारी १४ एकर जागेवर भव्य असे स्वेत वस्त्रांनी आच्छादित धम्मपिठ तयार केले होते. त्यावेळी जनसागर घोषणा देत होता. भगवान बुद्ध की जय!

बाबासाहेब की जय! बाबासाहेब करे पुकार बौद्ध धर्म का करो स्वीकार! आकाश पाताळ एक करा बौद्ध धर्माचा स्वीकार करा!

७९६) आपण बौद्ध धर्म का स्विकारत आहात असा प्रश्न पत्रकारांनी विचारताच बाबासाहेब रागाने म्हणाले हा प्रश्न तुम्ही स्वत:ला का विचारत नाहीत. सवलती मिळविण्यासाठी ब्राम्हण अस्पृश्य होतील काय? बुद्ध धर्माची लाट संपूर्ण देशात पसरेल व शेवटी ब्राम्हण बौद्ध दिक्षा घेतील.

७९७) वार्ताहर अनेक वर्षापासून माझा पाठलाग करीत आहेत परंतु त्यांनी माझे काहीही वाकडे केलेले नाही असे बाबासाहेब रागाने म्हणाले.

७९८) १४/१०/१९५७ ला सकाळी बाबासाहेबांनी पांढरा सदरा, पांढरा लांब कोट व पांढरे शुभ्र धोतर नेसून नानकचंद रट्टू पत्नी सविताबाई आणि सहकाऱ्यांच्या बरोबर धम्मपीठावर आले. सवीताबाइने पांढरी साडी परिधान केली होती.

७९९) एका हातात काठी व दुसरा हात नानकचंद रट्टूच्या खांद्यावर ठेऊन बाबासाहेब धम्मपीठावर उभे राहिले तेव्हा अत्यंत उत्स्फुर्त समाजाने टाळ्यांच्या कडकडाटात घोषणासह स्वागत केले तो समय सकाळी ९.१५ चा होता.

८००) धम्मपीठावर टेबलावर ब्रांझ धातूची बुद्धाची मुर्ती होती. दोन बाजूला दोन वाद्य होते. महाबोधीचे कार्यवाहक देवप्रिय वलिसिंह सारनाथचे थेरो भिक्षु सद्धातिस्सा भिक्षु परमशांती, संघरत्ना, सांचीचे पन्नत्तीस्सा, हुबळीचे परमशांती भिक्षु पन्नानंदा हे बुद्ध धर्मोपदेशक बसले होते.

८०१) कुमारी इंदुमती बळवंत वराळे यांच्या मराठी गौरव गीताने सभेला सुरूवात झाली. रामजीच्या पुण्यतिथीनिमित्त प्रचंड जनसमुदाय एक मिनीट स्तब्ध झाला आणि मुख्य समारंभाला सुरूवात झाली.

८०२) ऐंशी वर्षाचे वयोवृद्ध महास्थवीर चंद्रमणी व भगव्या कफण्या (चिवर) परिधान केलेले दुसरे चार भिख्खु बाबासाहेबांना व सविताबाईंना पाली भाषेतून बुद्ध धर्माची दिक्षा देत होते. त्यानंतर त्यांनी स्वत: तयार केलेल्या २२ प्रतिज्ञेचा शपथविधी झाला. डॉ. बाबासाहेब आंबेडकर व सविताबाईंनी बौद्ध धर्म स्वीकारला असे घोषीत करण्यात आले.

८०३) बाबासाहेबांनी स्वत: धम्म स्वीकारल्यावर उपस्थित जनसमुदायास बौद्ध धम्म दिक्षा देण्यात आली.

८०४) बुद्धाने धम्मचक्रप्रवर्तन सारनाथला केले. डॉ. आंबेडकरांनी धम्मचक्रप्रवर्तनास सुरूवात नागपुरातून केली.

८०५) गांधीने अस्पृश्यांना हरिजन बनविले. तर बाबासाहेबांनी त्यांना बहुजन बनविले.

८०६) ज्याने बाबासाहेबांबरोबर बौद्ध धर्म स्वीकारला त्यामध्ये नागपूर वरिष्ट न्यायालयाचे भूतपुर्व मुख्य न्यायाधिश डॉ. एन. भवानी शंकर नियोगी होते.

८०७) अनुयायांसह बाबासाहेबांनी बुद्ध धर्म स्वीकारला म्हणून स्वागत करणारे संदेश आले. त्यामध्ये ब्रम्हदेशाचे पंतप्रधान यु.बा.स्वे. ब्रम्हदेशाचे भूतपुर्व पंतप्रधान यु.न. कलकत्याचे डॉ. अरविंद बारवा, कोलंबोचे एच. डब्लु अमरसुर्या यांनी संदेश पाठविले होते. परंतु भारताचे पंतप्रधान नेहरू उपराष्ट्रपती राधाकृष्णन राजगोपालचारी किंवा राष्ट्रपती राजेंद्र प्रसाद यांनी संदेश पाठविले नाहीत.

८०८) १५/१०/१९५६ ला नागपूरला बाबासाहेबांचे शेवटचे राजकीय भाषण झाले. जर हिंदू धर्माने अस्पृश्य वर्गाला शस्त्र धारण करण्याचे स्वतंत्र दिले असते तर हा देश कधीही गुलामगिरीत पडला नसता. हिंदू

धर्माने पददलितांच्या उत्साहावर पाणी ओतले. म्हणून मला धर्म बदलण्याची आवश्यकता वाटली अशा आशयाचे बाबांचे भाषण झाले.

८०९) महास्थवीर चंद्रमणी व इतर भिक्षुंनी धर्मांतराच्या वेळी जे पत्रक काढले होते त्यात हिंदू धर्म व बौद्ध एकाच वृक्षाच्या दोन फांद्या आहेत असे म्हटले होते.

८१०) डॉ. आंबेडकरांनी निधड्या छातीने पुन्हा धर्मचक्र फिरवयास लावले ही आधुनिक भारताने पाहिलेली सर्वात मोठी क्रांती होय.

८११) १५/१०/१९५६ ला नागपूर नगरपालिकेने डॉ. आंबेडकरांचा मानपत्र देऊन सत्कार केला. नेहरू सरकारवर टिका करीत म्हणाले की, ते सरकार मी जवळून पाहिले आहे. सुशिक्षित स्त्रीया वाम मार्गाला लागल्या आहेत. निवडणुकीचे तिकीट मिळविण्यासाठी ते वाटेल ते करतील.

८१२) १६/१०/१९५६ ला चांदा येथे दिक्षा समारंभात बाबांनी पंचशिल त्रिशरण बावीस प्रतिज्ञा म्हणून उपस्थित जमावास बौद्ध दिक्षा दिली.

८१३) कबीरांचे दोहे बाबा अत्यंत आवडीने म्हणत असत. बुद्धम् शरणम् गच्छामी हे रेकॉर्ड बाबांच्या आवडीचे होते.

८१४) सर वुईल्यम हंटर यांनी १८८१ मध्ये भारतात बुद्ध धर्म येणार असे भाष्य केले होते. ते बाबासाहेबांनी कृतीत आणून खरे करून दाखविले.

८१५) रविंद्रनाथ टागोरांनीसुद्धा होवो बुद्ध धर्माचे पुनरागमन अशी कवीता करून भारतात बौद्ध धर्म येण्याची वाट पाहिली होती.

८१६) १४/११/१९५६ ला डॉ. आंबेडकरांच्या बरोबर मिलींद महाविद्यालयाचे प्राध्यापकम.भि.चिटणीस, बळवंत वराळे विमानाने काठमांडूला भातृसघाच्या चौथ्या जागतिक परिषदेला गेले. परिषदेचे अध्यक्ष डॉ. मालालासेकर होते.

८१७) डॉ. सवीताबाईच्या वडीलांचे नाव कृष्णराव कबीर व भावाचे नाव बाळू कबीर होते.

८१८) १/१२/१९५६ ला मथुरा मथावर भरलेल्या प्रदर्शनातील बुद्धीस्ट आर्ट गॅलरी बाबांनी पाहिली. त्यावेळी एका चाहत्यांनी विचारले निरनिराळ्या देशातून आलेल्या बुद्ध मुर्तीमध्ये एवढा फरक कसा? बाबा म्हणाले, बुद्धाचे महापरिनिर्वाणानंतर ६०० वर्षापर्यंत बुद्धाचे चित्र कोणी रेखाटले नव्हते किंवा मूर्तीही कोणी घडविली नव्हती. त्यानंतर आपल्या कल्पनेने पुतळा तयार केला. त्यानंतर अनेक देशातल्या अनेक सौंदर्याच्या कल्पनेप्रमाणे बुद्धाची पुस्तके व मुर्त्या तयार झाल्या.

८१९) २/१२/१९५६ रोजी बुद्धगया येथे अशोक विहारामध्ये बुद्धाच्या अडीच हजाराव्या पुण्यतिथी समारंभात भाग घेतला. त्या कार्यक्रमास बाबांची उपस्थीती होती.

८२०) ३/१२/१९५६ ला बाबासाहेब नानकचंद रट्टूच्या खांद्यावर हात ठेवून व दुसऱ्या हातात काठी घेऊन आपल्या माळ्याच्या आजारपणाची चौकशी करण्यासाठी गेले. त्यांच्या औषधाची सोय केली व त्यांना धीर दिला.

८२१) मुंबईला १०/१२/१९५६ ला बौद्ध धर्म दिक्षा सोहळा आयोजीत करण्याचे ठरविले होते.

८२२) ४/१२/१९५६ ला राज्यसभेत सभासदांशी चर्चा केली. राज्यसभेला बाबांची ही शेवटची भेट होती.

८२३) ५/१२/१९५६ ला मालवणकराबरोबर सवीताबाई दुपारी दिड वाजता काही खरेदीसाठी गेल्या होत्या. ५ ते ६ वेळा बाबासाहेबांनी सवीता घरी आल्यात की नाहीत ते घंटी वाजवून चौकशी केली. सवीताबाई सायंकाळीसाडे पाच वाजता घरी आल्या. तेव्हा बाबासाहेब तिच्यावर खूप रागावले होते.

८२४) ५/१२/१९५६ ला सायंकाळी जैन प्रतिनिधींबरोबर चर्चा केली. जैन प्रतिनिधी परत गेल्यावर नानकचंद रट्टू बाबांच्या डोक्यावर तेल चोळीत असता बाबासाहेब बुद्धंम् शरणंम् गच्छामी हे पद म्हणीत होते. तसेच हातात काठी घेऊन उठताना बाबासाहेब चलो कबीर तेरा भवसागर डेरा हे पद गुणगुणत उठले त्यावेळी रात्री ११.१५ मिनीटे झाली होती. त्यापूर्वी बुद्ध आणि त्यांचा धम्म या ग्रंथाचा उपोद्घात यांच्या टंकलिखीत प्रती तसेच प्र.के. अत्रे, श्री. म. जोशी, ब्रम्हदेशाचे सरकार यांना लिहिलेल्या पत्राच्या प्रति टेबलावर आणून ठेवण्यास सांगितले. ते मी पुन्हा वाचून पाहीन असे बाबा रट्टूला म्हणाले.

८२५) ६/१२/१९५६ ला सकाळी ६.३० वाजता सवीताबाईंनी बाबाकडे पाहिले. त्यांचा एक पाय उशीवर टेकलेला होता. सविताबाईने बागेत एक चक्कर मारली. नंतर बाबांना उठविण्यासाठी गेल्या तेव्हा बाबांनी चिरनिद्रा घेतलेली तिने पाहिली.

८२६) सविताबाईने रट्टूला आणण्यासाठी गाडी पाठविली. रट्टू आल्याबरोबर बाबांच्या शवावर ओणवे राहून आक्रोश करू लागला. बाबासाहेब मी सेवेला आलो आहे. मला काम द्या. असे म्हणून टाहो फोडला.

८२७) चिमणलाल शहाला १० वर्षापुर्वी बाबासाहेब म्हणाले होते जोपर्यंत दलितांच्या सेवेसाठी माझी आवश्यकता आहे तोपर्यंत मला आयुष्य लाभेलच.

८२८) भाऊराव गायकवाड यांना ४ वर्षापुर्वी बाबासाहेब म्हणाले आता मी फार काळ जगत नाही. तरी तुम्ही तुमच्या मनाची खंबीर तयारी ठेवा.

८२९) नानाकचंद रट्टूनेच ही दु:खद वार्ता मध्यवर्ती सरकारच्या मंत्र्यांना व इतरांना कळविली.

८३०) दिल्लीला २६ अलीपूर रस्ता येथे निवास्थानी असंख्य जनसमुदाय जमा झाला. पंतप्रधान पंडीत नेहरू गृहमंत्री वल्लभभाऊपंत दळणवळणमंत्री बाबू जगजीवनराम राज्यसभेचे उपसभापती इ. बाबांच्या दर्शनासाठी आले. दुपारी आकाशवाणीवरून ही बातमी ऐकताच कोट्याधी भारतीयांची हृदये दु:खाने हादरून गेली. जगजीवनराव यांनी विमानाची सोय केली. वस्तीतील रहदारी बंद पडली. अफाट जनसमुदाय दु:खाने विव्हळू लागला होता. बाबासाहेब अमर रहे! अशा आवाजाने प्रेतयात्रेला निवासस्थानापासून आरंभ झाला. लोकशवाची गाडी दिसताच त्या महापुरूषाला वंदन करित होते. दिल्लीतील वकिलांनी विख्यात विद्वान महापुरूषाला वंदन केले. नेहरूंनी खास दुताकरवी शवास हार घातला. लोकसभेचे कार्यवाहक व राज्यसभेच्या कार्यवाहाने त्या महान संसदपटूला पुष्पहार अर्पण केला.

८३१) दिल्लीहून मुंबईला विमान रात्री ९.३० वाजता निघाले. त्यात शंकरानंद शास्त्री, भिख्खु आनंद कौसल्यायन, सविताबाई, रट्टू, सुदामा स्वयंपाकी, सोहनलाल शास्त्री इ. मंडळी होती. विमान सकाळी पहाटे ३ वाजता सांताक्रुज मुंबई विमानतळावर उतरले.

८३२) बाबांचे शव फुलापुष्पांनी बहरलेल्या ट्रकवर ठेवले. ७ डिसेंबर १९५६ ला दुपारी १.३० वाजता दादर (राजगृह) येथून अंतयात्रेला सुरूवात झाली. डॉ. आंबेडकर रोड पोयबावाडी एल्फिस्टन पुल सयानी रस्ता, गोखले रस्ता या मार्गाने अंत्ययात्रा दादर हिंदू स्मशान भूमीत आली. सर्व मुंबापुरी दु:ख सागरात बुडाली.

८३३) मुंबईतील सर्व कारखाने, गोद्या, रेल्वे कारखाने, कापड गिरण्या बंद होत्या. सफाई खात्यातील कर्मचारी वर्ग कामावर गेला नाही. शाळा, महाविद्यालये, चित्रपटगृहे बंद होती. नागपूर आणि निरनिराळ्या शहरात

उत्फुर्त बंद पाळण्यात आला. अहमदाबादच्या कापड गिरण्या बंद पडल्या. त्या भयंकर बातमीने लोकांचे हातपाय गळाले. काहींना मुर्च्छा आली. आसपासचे लोक खास गाड्या करून आले होते. उत्तर मुंबईतील रहदारी बंद पडली. अंत्यदर्शनासाठी रस्त्याच्या कडेला लोक दुतर्फा रांगा लावून उभे होते. घरांची छपरे, गच्छा झाडे माणसांनी भरून गेली होती. फुलांचा वर्षाव इतका होत होता की ४ ते ५ मिनिटांनी फुलांचा ढिगारा बाजूला काढावा लागे. मुंबईच्या मंत्र्यांनी व काँग्रेसच्या नेत्यांनी रस्त्यात हार घातले.

८३४) दिवंगत नेत्याची इच्छा पुर्ण करण्यासाठी १ लाखापेक्षा जास्त अनुयायांनी शवाला साक्ष ठेऊन बुद्ध धम्माची दिक्षा घेतली.

८३५) भैय्यासाहेबांनी चिता पेटविताच सारा जनसमुदाय दु:ख सागरात बुडाला.

८३६) मुंबई नगरीच्या पोलीस दलाने महामानवाला शेवटची मानवंदना दिली. अशाप्रकारे बहुमान बिनसरकारी माणसाला मुंबईत प्रथमच देण्यात आला.

८३७) मुंबई विधीमंडळाचे सभापती सलीम मुंबई सरकारचे मुख्य सचीव डॉ. सवीताबाई, मुकुंदराव आंबेडकर, रावबहादूर बोले, भाऊराव गायकवाड, आर.डी. भंडारे, बी.सी. कांबळे, मो.वा.दोंदे इ. अनेक मान्यवर नेते व प्रतिष्टित नागरीक स्मशानभूमीत हजर होते.

८३८) ज्या दिवशी सांचीला ८ दिवसाचा अडीच हजारावा बुद्ध जयंतीचा उत्सव पुर्ण झाला. त्याच दिवशी ७ डिसेंबर १९५६ ला डॉ. आंबेडकरांचा पार्थीवदेह दृष्टी आड व्हावा ही विधीघटना किती विलक्षण.

८३९) सर्व राष्ट्रांनी डॉ. आंबेडकरांच्या निधनाचा शोक व्यक्त केला. सर्वच पक्षांनी देशाचा सुपुत्र हरवला असे विधान केले.

८४०) हिंदू समाजातील छळ करणाऱ्या सर्व प्रवृत्तीविरूद्ध बंड करून उठणारे व्यक्ती म्हणून डॉ. आंबेडकरांचे स्मरण राहील असे नेहरू म्हणाले. डॉ. आंबेडकर भारताच्या मंत्रीमंडळातील अनमोल रत्न आहे असे परदेशी पाहुण्यांना बाबा मंत्रीमंडळात असताना नेहरू ओळख करून देत असत.

८४१) शोक व्यक्त करताना नेहरू म्हणाले डॉ. आंबेडकरांच्या निधनाने जगातील लोकशाही निर्बल झाली. लोकशाहीच्या मतप्रणालीचा एक महान कैवारी नाहीसा झाला.

८४२) डॉ. आंबेडकरांच्या मृत्यूमुळे भारत एका महान वीर पुरूषाला मुकला असे सावरकर म्हणाले.

८४३) डॉ. आंबेडकर ध्येयनिष्ट जीवन जगले. दलितांचा उद्धार करणे त्यांचे जीवीत कार्य होते. त्यांनी त्यांचे कार्य शेवटपर्यंत सोडले नाही असे मुंबई सर्वोच्च न्यायालयाचे हंगामी न्यायाधीश कोयाजी म्हणाले.

८४४) डॉ. आंबेडकर आमच्या घटनेचे शिल्पकार आहेत. त्यांची दलितांची सेवा आणि अनेक क्षेत्रातील कार्य महान आहेत असे राजेंद्र प्रसाद म्हणाले.

८४५) डॉ. आंबेडकरांच्या रागाचे दर्शन म्हणजे त्यांनी घेतलेल्या बुद्ध धर्माची दिक्षा असे राजगोपालचारी म्हणाले.

८४६) डॉ. आंबेडकर व्यक्तीश: अत्यंत प्रामाणिक गृहस्थ होते. ते तीक्ष्ण बुद्धीचे निर्बंध पंडीत होते. त्यांची विद्वत्ता अत्यंत गाढी होती. प्रथमत: त्यांच्याशी योग्य रीतीने बोलणी केल्यास ते अत्यंत जिव्हाळ्याचे होत असत असे राजाजी म्हणाले.

८४७) हिंदुस्थान टाईम्स (दिल्ली) दैनिकाने म्हटले डॉ. आंबेडकरांनी केलेल्या देशसेवेची आठवण मागे राहील.

८४८) मुंबईचे फ्रीप्रेस जर्नल दैनिक म्हणाले अन्यायाच्या विरूद्ध लढणारा एक सात्विक नेता म्हणून देशाला डॉ. आंबेडकरांची चिरकाल आठवण राहील.

८४९) कलकत्याच्या स्टेटसमन दैनिकाने म्हटले डॉ. आंबेडकरांची कारकिर्द म्हणजे बुद्धीमतांनी मनोनिग्रह यांचा झगडा होता. त्यांची प्रचंड विद्वत्ता निर्बंध शास्त्र अर्थशास्त्र, समाजशास्त्र, कामगार व राजकारण या निरनिराळ्या शास्त्रातील व क्षेत्रातील त्यांचा अनुभव त्यांनी त्यांना वेगळ्या परिस्थितीत भर टाकण्यास समर्थ केले असते.

८५०) अमृत बझार (कलकत्ता) पत्रिका दैनिक म्हणाले अन्यायी व माणुसकीचे हक्क नाकारणाऱ्या समाजरचनेचा विध्वंश करणे जणू डॉ. आंबेडकरांच्या लढाऊ वृत्तीने विडाच उचलला आहे.

८५१) न्युयार्क टाईम्स दैनिक म्हणाले मुख्यत: अस्पृश्यांचे कैवारी म्हणून डॉ. आंबेडकरांचे नाव सर्व जगाला माहित होतेच. जगात एकही पुढारलेले राष्ट्र नसेल की ज्यांना त्यांनी आपल्या व्यक्तीमत्वाचा ठसा भारताच्या नैर्बंधिक रचनेच्या मोठ्या भागावर उठवलेला आहे हे ज्ञात नसेल.

८५२) लंडनचे टाईम्स दैनिक म्हणाले ब्रिटीश सत्तेच्या शेवटच्या काळातील भारतातील सामाजिक व राजकीय क्रांतीचा जेव्हा इतिहास लिहिला जाईल तेव्हा त्यात डॉ. आंबेडकरांच्या नावाचा प्रामुख्याने उल्लेख होईल. निर्धार व धैर्य त्यांच्या मुखावर कोरलेले होते.

८५३) ब्रम्हदेशाचे पंत्रप्रधान म्हणाले डॉ. आंबेडकर हे एक नामांकित व्यक्ती होते. बदलणारे प्रवाह आणि परिस्थिती जेव्हा राष्ट्राच्या सामाजिक रचनेवर आणि जीवनावर मोठा परिणाम करीत आहे तेव्हा त्यांनी हिंदुस्थानातील मोठी ऐतिहासिक कामगिरी केलेली आहे. देशातील सामाजिक जीवन पद्धतीत फरक पडून येत असता तिला गती देणाऱ्यांपैकी डॉ. आंबेडकर एक होत.

८५४) डॉ. आंबेडकरांच्या निर्वाणानंतर ११ व्या दिवशी त्यांच्या मृत्यूची चौकशी करण्यासाठी एक शिष्टमंडळ पंत्रप्रधान नेहरू गृहमंत्री वल्लभपंत राष्ट्रपती राजेंद्र प्रसाद यांना भेटले व तसे निवेदन सादर केले.

८५५) दिल्लीच्या पोलीस अधिकाऱ्याकडे बाबांच्या मृत्यूच्या चौकशीसाठी भैय्यासाहेबांनी तक्रार दाखल केली.

८५६) सरकारने चौकशी केली आणि २६/११/१९५७ ला गृहमंत्री पंडीतपंत याने लोकसभेत निवेदन केले की दिल्लीच्या पोलीस उपनिरिक्षकांनी (डेपुटी इनस्पेक्टर जनरल ऑफ पोलीस दिल्ली) केलेल्या तपासाप्रमाणे डॉ. आंबेडकरांचा नैसर्गिक मृत्यू झाला होता.

८५७) महाराष्ट्र राज्याचे पहिले मुख्यमंत्री यशवंतराव चव्हाण यांनी बाबासाहेबांच्या कर्तृत्वास अनुसरून व लोकमताला मान देऊन डॉ. आंबेडकर जयंतीची सुट्टी महाराष्ट्रात जाहीर केली.

८५८) १४/१०/१९५६ ला नागपूरला दिक्षा समारंभ झालेल्या जागेपैकी ११ एकर जमीन संबंधीत बुद्ध संस्थेला दिली.

८५९) डॉ. आंबेडकरांचा अंत्यसंस्कार झाला. ती दादर हिंदू स्मशानभूमीची जागा संबंधीत बुद्ध संस्थेला सरकारने दिली.

८६०) बाबांचा पुतळा दोन्ही सचिवालयाच्या मध्यभागी उभारण्यात आला.

८६१) डॉ. आंबेडकरांनी पाक्षिके, साप्ताहिके चालविली. अर्थशास्त्र इतिहासावर ग्रंथ लिहिले. हजारोंनी राजकीय परिषदेची अध्यक्षस्थाने भुषविली. वसतीगृहे, वाचनालये चालविली. विधी महाविद्यालयाचे प्राचार्यपद भूषविले. सामाजिक, राजकिय व कामगार चळवळी चालविल्या. राजकीय पक्ष स्थापन केले. माहाविद्यालये चालविली. मत्सुद्याचे शहाणपण, नेत्यांचे गुण, विरांचे धैर्य, हुतात्मांची सहनशीलता,

विद्वानांची व्यासंगप्रियता कितीतरी मोठमोठी स्थाने, ज्ञानाने लोकशाहीनिष्ट, वृत्तीने मानवतेच्या प्रतिष्टेवरील प्रेमाने गाजवली भूषविली, अशी गुणसंपदा स्वयंप्रेरणेने, स्वकष्टाने आपल्या जीवनात दाखविली. मनूला त्याच्या सिहासनावरून खाली उतरविले. आपल्या धेय्याला राज्यघटनेत समाविष्ट करून बहुजनाला माणसात बसवून स्वाभिमानाने जीवन दिले. अस्पृश्यांच्या धैय्यापलीकडे त्यांनी कतृत्व करून दाखविले. इतिहासात तोड नाही अशी देशहितदक्षता दाखवून देशाला अनमोल अशी राज्यघटना लिहून दिली.

बाबासाहेबांच्या रूपाने -

भारत देशात अलौकि ज्ञानाचे एक नवीन तिर्थक्षेत्र निर्माण झाले.

भक्तांसाठी नवीन प्रेरणेचे केंद्र जन्मास आले.

ज्ञानाने चालते बोलते विद्यापीठ उदय पावले.

काव्याला एक नवे स्फुर्तीस्थान लाभले.

वाङ्मयाला एक नवीन संधी लाभली.

युद्धाची जागा बुद्धावर सोपविली.

दया, प्रेम, मैत्री, करूणेची बीजे रूजविली.

शिका, संघटित व्हा, संघर्ष करा वाणी गरजली.

अंधांना दृष्टी, मुक्याला वाचा, बहिऱ्याला कान, पांगळ्याला पाय,

निर्बुद्धाला बुद्धी दिली.

भटांना त्यांची जागा दाखविली.

स्वतंत्र, समता, बंधुत्वाची भावना रूजविली.

१०० वर्ष शेळी होऊन जगण्यापेक्षा १ दिवस वाघ होऊन मरा अशी

रणगर्जना केली.

दिनजनांची जगी एकच होती ती भिमाई माऊली.

अनंत सोसिले, कष्ट झाला दिनांची साऊली खरोखर.

जगात दुसरा डॉ. आंबेडकर पैदा होणे न भूतो ऽ न भविष्यती।

विभाग पहिला समाप्त

अनमोल खजिना

विभाग - ०२

१) ०१/०१/१८१८ : भिमा कोरेगाव क्रांती दिन
२) १७/०९/१८५७ : अनागरीक धम्मपाल जयंती
३) १७/०३/१८६३ : छत्रपती सयाजीराव महाराज जयंती दिन
४) २४/०९/१८७३ : महात्मा जोतीराव फुलेंनी सत्यशोधक समाजाची स्थापना केली.
५) १७/०९/१८७८ : पेरीयार रामास्वामी नायकर जन्मदिवस
६) १०/०७/१८८७ : महात्मा फुलेंनी स्वतःचे मृत्युपत्र लिहून ठेवले.
७) १८८१ : सर विल्यम हंटर यांनी बौद्ध धर्म भारतात येणार असे भाकीत केले होते.
८) १८/०५/१८८८ : मुंबईला मांडवी येथील कोळीवाडा सभागृहात हजारो सामान्य लोकांनी ज्योतीबा फुलेंना महात्मा ही पदवी दिली.
९) १४/०४/१८९१ : डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचा जन्मदिवस
१०) २९/०९/१८९२ : रावबहादूर एन. शिवराज जन्मदिन
११) १०/०३/१८९७ : सावित्रीबाई फुले स्मृतीदिन
१२) २१/०६/१८९४ : साताऱ्यातील सैनिकाचा पहिला अर्ज रामजीबाबांनी सरकारला दिला.
१३) ०७/११/१९०० : भिमरावाचा साताऱ्यात शिक्षणासाठी इंग्रजीच्या पहिल्या वर्गात प्रवेश
१४) ०९/०९/१९०६ : छत्रपती शाहू महाराज व व्हाईसरॉय लॉर्ड मिंटो यांची भेट
१५) एप्रिल १९०७ : भिमराव मॅट्रिकची परीक्षा पास झाले.
१६) ०३/०१/१९०८ : एलफिस्टन कॉलेजमध्ये भिमरावाने प्रवेश घेतला.
१७) ०५/०४/१९१० : अस्पृश्यांचा लष्करात भरतीचा ठराव मंजूर झाला.
१८) १४/१२/१९१० : शि.ज. कांबळे यांनी अस्पृश्यांच्या न्याय हक्कासाठी भारतमंत्री अर्लक्यु यांच्याकडे मागणी केली.
१९) १२/१२/१९१२ : भय्यासाहेब (यशवंतराव) आंबेडकरांचा जन्मदिवस
२०) २८/११/१९१२ : भिमरावांचे छत्रपती शाहू महाराजांस पत्र
२१) ०८/०६/१९१३ : बडोदे सरकारची अट मान्य करून भिमरावांने करारावर सही केली.
२२) २१/०७/१९१३ : भिमराव न्यूयार्कला पोहचले. कोलंबिया विश्वविद्यापीठात प्रवेश
२३) ०२/०६/१९१५ : कोलंबिया विश्वविद्यापीठातून एम.ए. ची परीक्षा उत्तीर्ण झाले.
२४) ०९/०५/१९१५ : अडमिनिस्ट्रेशन ऑफ फायनान्स ऑफ इंडिया हा ग्रंथ भिमरावांनी लिहिला. १९२६ साली हा ग्रंथ प्रकाशीत झाला.
२५) ०९/०५/१९१६ : भिमरावांनी कोलंबीया विश्वविद्यापीठात ॲनीहिलेशन ऑफ कास्ट इन इंडिया निबंध लिहून वाचन केले. या पुस्तकाच्या भाषण करण्याअगोदर २००० प्रती संपल्या होत्या.
२६) २४/०७/१९१७ : शाहू महाराजांनी प्राथमिक शिक्षण मोफत आणि सक्तीचे करण्याचा हुकुम दिला.
२७) २०/०८/१९१७ : भारतमंत्री मॉंटेंग्यु यांनी सक्तीच्या शिक्षणाची घोषणा केली.
२८) ११/११/१९१७ : डॉ. आंबेडकर अभिनंदन सभा झाली.
२९) २८/११/१९१७ : सर्व्हंट ऑफ इंडिया सोसायटीच्या हॉलमध्ये अस्पृश्यांची दुसरी सभा झाली.
३०) २३/०३/१९१८ : सयाजीराव गायकवाड यांच्या अध्यक्षतेत मुंबईमध्ये अस्पृश्यता निवारण परिषद घेतली.

३१) १८/०४/१९१८ : शिक्षणासाठी सहकार्य करणाऱ्या सयाजीराव महाराजांची भिमरावांने भेट घेतली.
३२) १२/११/१९१८ : सिडनहॅम कॉलेजमध्ये भिमराव आंबेडकर प्राध्यापकाच्या (अर्थशास्त्र) नौकरीवर रुजू झाले.
३३) २७/०१/१९१९ : डॉ. आंबेडकरांची साऊथ ब्युरो कमिशनपुढे महत्वपुर्ण साक्ष झाली.
३४) ३०/११/१९१९ : अकोला जिल्ह्यातील अकोट तेथे वतनदार महारांची सभा झाली.
३५) २०/०१/१९२० : डॉ. आंबेडकरांचे मानगावला जातीभेदावर भाषण.
शाहू महाराज त्या सभेचे अध्यक्ष होते.
३६) ३१/०१/१९२० : मुकनायक पहिला अंक प्रकाशीत झाला.
३७) ११/०३/१९२० : सिडनहॅम कॉलेजच्या प्राध्यापकाच्या नोकरीचा राजीनामा दिला.
३८) २०/०३/१९२० : मानगावला अस्पृश्य परिषद झाली.
३९) १५/०४/१९२० : मानगावला अस्पृश्यता निवारण परिषद संपन्न झाली.
४०) १३/०५/१९२० : छत्रपती शाहू महाराजांचे डॉ. आंबेडकरांना पत्र आले.
४१) ३०/०५/१९२० : नागपूरला डॉ. आंबेडकरांच्या उपस्थितीत व छत्रपती शाहू महाराजांच्या अध्यक्षेत बहिष्कृत वर्गाच्या सभेत धुम्रपान निषेध करण्यात आला.
४२) ३१/०५/१९२० : नागपूरला बहिष्कृत वर्गाच्या सभेचा दुसरा दिवस
४३) ०३/०६/१९२० : अकोला ब्राम्हणेतर अकोला जिल्हा परिषद घेण्यात आली.
४४) ०७/०६/१९२० : ऑल इंडिया डिस्प्रेट क्लासेस एज्युकेशन संस्थेची स्थापना केल्याबद्दल छत्रपती शाहू महाराजांचे डॉ. आंबेडकरांना पत्र आले.
४५) ०९/०६/१९२० : भारतीय बहिष्कृत परिषदेत नागपूरला झालेले
डॉ. आंबेडकरांचे भाषण टाईम्समध्ये प्रसिद्ध झाले.
४६) २६/०६/१९२० : अमरावतीला चोखामेळा फ्रि बोर्डींग उघडली.
४७) ०५/०७/१९२० : बॅरीस्टरच्या अभ्यासासाठी डॉ. आंबेडकर विलायतेला गेले.
४८) ०६/०७/१९२० : शाहू महाराजांनी शिवाजी वैद्यकीय महाविद्यालय वसतीगृह चालू केले.
४९) ०१/०८/१९२० : आण्णा भाऊ साठेचा जन्मदिवस
५०) ०६/०८/१९२० : पंढरपूरला बहिष्कृत वर्गाची जाहीर सभा संपन्न झाली.
५१) २२/०८/१९२० : तके महार पंचकमीटीची दुसरी सभा पंचपावली विश्रामजी सवईतुला यांच्या अध्यक्षेत पार पडली.
५२) ३०/०९/१९२० : एम.एस.सी. अभ्यासक्रमासाठी डॉ. आंबेडकरांचे लंडनला प्रयाण लंडन स्कुल ऑफ इकोनॉमिक्स मध्ये प्रवेश
५३) १२/१०/१९२० : पंढरपूरला युवक वाचनालय सुरू केले.
५४) २३/१०/१९२० : मुकनायकाचा शेवटचा अंक प्रकाशीत झाला.
५५) ३०/१०/१९२० : शिक्षणप्रसार व सुधारणा प्रसारासाठी मालपुर (खानदेश) सभा झाली.
५६) २०/११/१९२० : चंद्रपूरला श्री चोखामेळा वऱ्हाड शिक्षण समाज संस्था स्थापन
५७) २४/११/१९२० : सासवडला महार समाजाची जाहीर सभा
५८) ०१/०४/१९२० : मुंबई कायदेमंडळाची पहिली बैठक झाली.
५९) १३/०८/१९२१ : सक्तीचे शिक्षण मोफत घेण्याबाबत मध्यप्रांत कौन्सिलात ठराव पास
६०) ३१/१२/१९२१ : बेळगावला जाहीर सभा झाली.
६१) १४/०२/१९२२ : अखिल भारतीय बहिष्कृत परिषद संपन्न झाली.
६२) ०६/०५/१९२२ : छत्रपती शाहू महाराज स्मृतीदिन

६३) ०८/०२/१९२३ : महारांच्या बलुत्या संदर्भात मुंबईत सभा झाली.
६४) ०३/०४/१९२३ : डॉ. आंबेडकर डी.एस.सी. व बारॲट लॉ करून भारतात परतले.
६५) ०५/०७/१९२३ : डॉ. आंबेडकरांनी वकीली करण्यासाठी मुंबई कोर्टात नोंदणी केली.
६६) ०४/०८/१९२३ : रावबहाद्दूर सी.के.बोले यांनी अस्पृश्यांना सार्वजनिक ठिकाणी मुक्तसंचार असणारा कायदेवजा ठराव कायदेमंडळात बहुमताने मंजूर करून घेतला.
६७) २३/०२/१९२४ : मध्यप्रांत वऱ्हाड महार परिषदेचे अधिवेशन संपन्न झाले.
६८) ०९/०३/१९२४ : बहिष्कृत हितकारणी सभेची मुंबईत सभा झाली.
६९) ०९/०३/१९२४ : विधीमंडळातून डॉ. आंबेडकरांची राज्यघटनेवर निवड झाली.
७०) २४/०६/१९२४ : डॉ. आंबेडकरांनी आंबेडकर गुरूजींस पान सुपारी धोतर पान सव्वा रूपया दक्षिणा दिला.
७१) ०५/०९/१९२५ : पुणे नगरपालिकेत महात्मा फुलेंच्या पुतळ्याचा ठराव चर्चेत घेतला.
७२) १०/०४/१९२५ : प्रांतीक बहिष्कृत सभेचे पहिले अधिवेशन संपन्न.
७३) १५/०७/१९२५ : महात्मा फुलेंच्या पुतळ्याचा ठराव केशवराव जेधे यांनी पुणे नगरपाकिलेला पाठवला.
७२) प्रसेनजीत राज्याचा खजिनदार सुदत्त होता. तो गरीब पिडीतांना दान धर्म करीत असे. म्हणून त्यास अनाथपिण्डक असे म्हणत.

७३) गौतमाच्या समकालीन दार्शनिक परंपराप्रमाणे ६ वेगवेगळी दर्शने प्रचलीत होती.

७४) पुर्ण काश्यपचे :- अक्रियावाद

७५) मख्खली गोसालचे :- नियतीवाद

७६) अजितकेश कंम्बालचे :- उच्छदवाद

७७) पकुध कच्चायनचे :- अन्योन्यवाद

७८) संजय बेलट्टीपुत्राचे :- विक्षेपवाद

७९) निग्णठ्ठनाथ पुस (महावीर) चे :- चतुर्यामसंवरवाद

८०) गौतमाला ही दर्शने मान्य नव्हती.

८१) बुद्धाने ४ मुद्दे स्वीकारले होते.
१) मन सर्वस्वी केंद्रबिंदू मानले होते.
२) मनामुळे चांगल्या व वाईट गोष्टी होतात.
३) सर्व पाप कर्मापासून अलिप्त राहणे
४) धर्म धर्मग्रंथात नसून धार्मिक जीवन जगण्यात आहे.

८२) बुद्ध धर्म दिक्षाचे २ प्रकार आहेत.
१) भिक्षुंची दीक्षा
२) उपासकांची दिक्षा

८३) उपासक गृहस्थी जीवन जगतो.

८४) भिक्षु गृहत्याग करतो.

८५) बुद्धाचे पहिले शिष्य (जे त्यांना सोडून गेले होते.) ५ होते. सारनाथला मृगदायी येथे त्यांना दिक्षा दिली.
८६) बुद्ध धर्माच्या नियमांचा केंद्रबिंदू म्हणजे माणसाने माणसाबरोबर माणुसकीने वागण्याच्या नियमांचे पालन करणे.
८७) ४ आर्यसत्ये : १) दु:ख २) दु:खाचे कारण ३) दु:खनिरोध ४) दु:खनिरोध मार्ग
८८) पंचशिल : १) हिंसा न करणे २) चोरी न करणे ३) व्यभिचार न करणे
४) असत्य न बोलणे ५) नशायुक्त पदार्थाचे सेवन न करणे
८९) आर्य अष्टांगीक मार्गाची आठ अंगे आहेत. १) सम्यक दृष्टी २) सम्यक संकल्प ३) सम्यक वाणी
४) सम्यक कर्म ५) सम्यक आजीविका ६) सम्यक व्यायाम ७) सम्यक स्मृती ८) सम्यक समाधी
९०) शिलाचे (सद्गुणांचे) १० मार्ग आहेत. (परमिता) १) शील २) दान ३) उपेक्षा ४) नैष्कृम्य ५) वीर्य
६) शांती ७) सत्य ८) अधिष्ठान ९) करूणा १०) मैत्री
९१) याच दहा सद्गुणांचा संपुर्ण सामर्थ्यनिशी अभ्यास करणे असल्यामुळे त्यास पारमिता म्हटले आहे.
९२) दुसऱ्या क्रमांकाचा शिष्य यश कुलपुत्र. त्यावेळी त्याचे ४ मित्र १) विमल २) सुबाहू ३) पुर्णाजित
४) गावम्पती यांनी दिक्षा घेतली.
९३) पंचवर्गी भिख्खुंनी दिक्षा घेतल्यानंतर दुसऱ्या दिवशीचे हे शिष्य होते.
९४) ३ काश्यप बंधूंनी (अग्नी होत्री असणाऱ्या) आपल्या जटाधारी १००० हजार शिष्यांस बुद्धांकडून धम्मदिक्षा दिली.
९५) ३ काश्यप बंधूंची नावे : १)उरूवेल काश्यप २) नदी काश्यप ३) गया काश्यप हे वाराणशीचे होते.
९६) संजय नावाच्या परिव्राजकाचे २ शिष्य : १) सारिपुत्र २) मोद्गल्यागन आपल्या २५०० जटाधारी शिष्यांसह संजय राजगृहामध्ये असताना बुद्धाचे शिष्य झाले.
९७) राजा बिंबिसारने मगधच्या १२ लाख ब्राम्हणांसह बौद्ध धर्माची दिक्षा घेतली.
९८) १२ लाखांपैकी १ लाख लोक उपासक झाले.
९९) बिंबिसारने मनातील ५ ईच्छा पुर्ण झाल्याचे बुद्धासमोर कबुल केले.
१००) अनाथपिण्डीकाने राजगृह येथे बुद्धाकडून धम्मदिक्षा घतेली.
१०१) जेतवन येथे राजा प्रसेनजीत दिक्षा घेऊन संपूर्ण जीवन उपासक म्हणून राहिला.
१०२) जीवक राजगृह येथील शालवती नावाच्या वेश्येचा मुलगा होता.
१०३) जन्मताच जीवकास टोपलीत ठेऊन कचऱ्याच्या ढिगाऱ्यावर टाकले होते. राजकुमार अभयच्या चौकशीत तो जीवंत आहे असे सांगितल्यामुळे त्यास जीवक हे नाव पडले.
१०४) राजकुमार अभयने जीवकचा सांभाळ केला.
१०५) जीवक तक्षशिला विश्वविद्यालयात ७ वर्षे शल्यचिकीत्सक म्हणून शिक्षण घेत होता.
१०६) सर्व प्रथम त्याने साकेतच्या एका शेठच्या पत्नीची चिकित्सा करून तिला ठिक केल्यामुळे त्यास १६००० कर्षापण दास, गाडीसह घोडे मिळाले होते.
१०७) राजा बिंबिसारचा भगेंद्र रोग त्याने बरा केला होता.
१०८) राजा बिंबिसारने जीवकास राज वैद्य म्हणून ठेवले होते.
१०९) गौतमाने जीवकास भिक्षु न करता उपासक बनविले होते.
११०) जीवक संघाचा चिकित्सक होता.
१११) बिंबिसारच्या मृत्यूनंतर त्याचा मुलगा अजातशत्रुचासुद्धा जीवक चिकित्सक होता.
११२) कुरूदेशात थुल्लकोट्टित गावातील रट्ठपालांनी प्रवृजा आणि उपसंपदा घेतली.
११३) राजा शुद्धदनाने निरोप पाठविल्यामुळेच सिद्धार्थ फार मोठ्या भिख्खु संघासह वडिलांच्या घरी गेले.
११४) सात वर्षानंतर सिद्धार्थ कपिलवस्तूला गेले.

११५) ज्ञानप्राप्तीसाठी सिद्धार्थाला ७ वर्षे लागली.
११६) गौतम बुद्धाला निरोप सांगण्यासाठी गेलेला शुद्धोदनाच्या दरबारातील अधिकाऱ्याचा कालुदासी नावाचा मुलगा होता.
११७) सिद्धार्थास अनुकूल असणाऱ्या शाक्यांनी प्रत्येक घरातील एक तरूण संघास दिला होता.
११८) सिद्धार्थाच्या चुलत्याचा मुलगा (शुक्लोदनचा मुलगा) अनुरूद्ध याने संघात प्रवेश केला होता.
११९) अनुरूद्ध बरोबर राजकुमार भद्दीयाने संघात प्रवेश केला होता.
१२०) आनंद, भृगु, क्बिल आणि देवदत्त यांनी संघ प्रवेश केला होता.
१२१) सिद्धार्थाला पुन्हा गृहस्थी होण्यासाठी राजा, पुरोहित, मंत्री यांनी खुप प्रयत्न केले. परंतु सिद्धार्थाच्या निश्चयातील ठामपणा भक्कम असल्यामुळे पुरोहित मंत्र्यांसह सर्वांना माघार घ्यावी लागली.
१२२) राजगृहाच्या जवळच गृधकुट पर्वताच्या पाठीमागे एक छोटेसे गाव होते. तेथे ७० ब्राम्हणांची घरे होती.
१२३) नाई उपालीने उपसंपदा घेतली होती.
१२४) राजगृहात राहत असणाऱ्या सुनित नावाच्या भंग्याने दिक्षा घेऊन संघात प्रवेश केला.
१२५) स्मशानात प्रेते जाळून स्मशानात राहणारे सोपक आणि सुप्पीय यांना बुद्धाने संघात घेतले होते.
१२६) सोपाकचा जन्म स्मशानातच आईच्या चितेवर झाला होता.
१२७) सोपाक पुढे चालून एक स्थविर म्हणून नावारूपाला पोहचला.
१२८) श्रावस्तीचा सुमंगल, राजगृहाचा धनिय आणि श्रावस्तीचा एक भिक मागणारा चिथडे चावल (अंगाला चिखल लावून भिक मागत होता म्हणून त्यास चिथडे चावल असे नाव पडले होते.) हे जातीने हिन समजले जात होते. त्यांना बुद्धाने संघात घेतले.
१२९) कृष्ठरोगी सुप्रबुद्धाने वेळूवनात परिव्रजा घेऊन संपुर्ण जीवन संघास अर्पण करण्याचा निश्चय केला. परंतु रस्त्यातच एका बैलाने मारल्यामुळे त्याचा मृत्यू झाला.
१३०) गौतम बुद्ध हे कपिलवस्तूला परत आले त्यावेळी पुष्कळ स्त्रीया संघात सामिल होण्यास उत्सुक होत्या.
१३१) उत्सुक असणाऱ्या स्त्रियांमध्ये महाप्रजापती गौतमी प्रमुख होती.
१३२) शाक्यांच्या न्यग्रोधाराम गावात तथागत थांबले असता स्त्रीयांना संघात घेण्याबद्दल गौतमीने सिद्धार्थाला विनंती केली.
१३३) सिद्धार्थाने सुरूवातीला स्त्रियांना संघात घेण्यास गौतमीस नकार दिला.
१३४) गौतमीने ३ वेळा विनंती करूनही तथागताने संघात सामिल होण्यास नकार दिला.
१३५) शाक्यांच्या ५०० स्त्रियांसह गौतमीने ठाम निर्धार करून ठरविले की आपण परिव्रजीत होऊन तथागतांच्या समोर जाऊ.
१३६) गौतमीने केस कापून चिवर धारण करून अनेक स्त्रियांसह तथागतांना भेटण्यासाठी निघाली.
१३७) तथागत वैशालीच्या महावन कुट्टगारात थांबले होते.
१३८) गौतमीने अनेक वेळा विनंती करुनही तथागताने अनुमती दिली नाही.
१३९) आनंदाच्या विनंतीस शेवटी तथागताने अनुमती दर्शविली. परतुं स्त्रियांसाठी ८ नियमांचे पालन करणे बंधनकारक राहिल असे सुचविले.
१४०) ८ नियमांचे आम्ही सहर्ष पालन करू असे गौतमीने कबुल केल्यावर तथागताने गौतमीस प्रथम उपसंपदेसह परिव्रजीत केले.
१४१) ५०० स्त्रियांना सिद्धार्थाचे शिष्य नंदक यांनी धर्म आणि विनयाची दिक्षा दिली.
१४२) ५०० भिक्षुर्णींसह यशोधरेनेही परिव्रजा घेतली.
१४३) भिक्षुणी झाल्यावर यशोधरेचे नाव भद्दा कच्चना होते.
१४४) जगातील पहिली भिक्षुणी स्त्री महाप्रजापती गौतमी आहे.

१४५) भिक्षु आनंदाबरोबर लग्न करण्यास अतीउत्सुक झालेली चंडाल कन्या प्रकृतीने तथागतांकडून दिक्षा भिक्षुणी झाली.
१४६) कोसल राजा प्रसेनजीताच्या राज्यात डाकू अंगुलीमाल राहत होता.
१४७) डाकु अंगुलीमालाचे हात सदैव रक्तरंजीत असत.
१४८) ३०-४० माणसांना एकटा अंगुलीमाल मारीत होता.
१४९) तथागतांनी जंगलात जाऊन अंगुलीमालाचे मन परिवर्तन करून त्यास भिक्षु बनविले.
१५०) एक माणूस मारल्यानंतर त्या माणसाचे एक बोट तोडून आपल्या गळ्यात माळ करून घातील होता म्हणून लोक त्याला अंगुलीमाल असे म्हणत असत.
१५१) अंगुलीमालाच्या आईचे नाव मैत्रायणी होते.
१५२) अंगुलीमालाच्या वडीलांचे नाव गार्ग होते.
१५३) राजगृहाच्या दक्षिणेस एक मोठा पर्वत आहे त्याच पर्वताच्या मोठ्या दऱ्यातून दक्षिण भारतात येण्याचा रस्ता होता. त्या दऱ्यात ५०० डाकू राहत होते. बुद्धांनी घोड्यावर स्वार होऊन त्यांचे मन परिवर्तन करून धम्मदिक्षा दिली.
१५४) राजगृहापासून १७५ मैल दूर एका पर्वतावर तथागत राहत होते. त्याच पर्वतावर १२२ कुटूंबाचा (शिकार करणाराचा) जमाव राहत होता.
१५५) प्राण्यांची हत्या करून मांस भक्षण करणे त्यांचा दिनक्रम असे.
१५६) सिद्धार्थ गौतम त्यांच्या वस्तीवर गेले आणि त्यांची मने जिंकून स्त्री-पुरूषांसह १२२ कुटूंबे श्रावक होऊन संघात सामील झाले.
१५७) भगवान बुद्धांनी वंशपरंपरेने धर्म चालविण्यासाठी कोणतीही तरतूद केलेली नाही.
१५८) धार्मिक बाबतीत आपला कोणताही उत्तराधिकारी नाही असे गौतमाने स्पष्ट सांगितले.
१५९) बुद्धांच्या निर्वाणानंतर राजगृह येथे पहिली धम्मसांगाती (धम्मसभा) घेण्यात आली.
१६०) पहिल्या धम्म सांगातीचे अध्यक्ष महाकाश्यप होते.
१६१) आनंदासह उपाली आणि कपिलवस्तीचे अनेकजण संगितीली उपस्थित होते. ते तथागतांच्या निर्वाणापर्यंत त्यांच्याबरोबर होते.
१६२) धर्मच धम्माचा उत्तराधिकारी असतो असे बुद्ध सांगत असे.
१६३) धर्म आपल्याच तेजाने चमकला पाहिजे. माणसाच्या शक्तीवर नाही.
१६४) बुद्धाने मी परमेश्वराचा पुत्र प्रेषीत, दूत आहे असे म्हटले नाही.
१६५) मी फक्त मार्गदाता आहे असे बुद्धांनी म्हटले.
१६६) सर्व धर्मसंस्थापकांनी मुक्तीदाता स्वत:स समजले.
१६७) तथागत म्हणतात मोक्ष स्वत:च्या प्रयत्नाने साध्य करावा लागतो.
१६८) बुद्धांनी धर्माबद्दल कसलाही औपोरूषत्वाचा दावा केलेला नाही.
१६९) बुद्ध धर्म माणसाच्या संशोधाची निर्मीती आहे.
१७०) हजरत मुसाने फक्त स्वत:ला देव मानले नाही. परंतु आपल्या शिकवणीकीस त्याने परमेश्वराची शिकवण समजले आहे.
१७१) इसाने स्वत:ला देव मानण्याचे संकेत दिले आहेत व त्याने स्वत:ला देवाचा पुत्र समजले आहे म्हणून त्याची शिकवणसुद्धा परमेश्वरी शिकवण समजली गेली.
१७२) कृष्णाने स्वत:ला देव मानले त्याच्या शिकवणीकीस ईश्वरी संकेत समजले.
१७३) बुद्धाने सांगितले माझा संदेश म्हणजे एका माणसाने दुसऱ्या माणसाला सांगितलेलाच संदेश आहे.
१७४) बुद्धाने प्रत्येकाला धम्मनियमांचे परिक्षण करण्याचे स्वातंत्र्य दिलेले आहे.

१७५) कोणत्याही दुसऱ्या (बौद्ध धम्माशिवाय) धर्मसंस्थापकांनी धर्मपरिक्षणाच्या कसोटीवर कसाला लावून पोहचण्याचे आवाहन केलेले नाही.

१७६) भगवान बुद्धाचा धर्म समजण्यासाठी प्रथम धर्म, अधर्म, सधर्म चांगल्या प्रकारे समजणे गरजेचे आहे.

१७७) जीवन पवित्र ठेवणे म्हणजेच धर्म पालन करणे.

१७८) मनुष्य तीन प्रकारे जीवन पवित्र ठेऊ शकतो.
१) शारिरीक पवित्रता २) वाणी पवित्रता ३) मानसिक पवित्रता

१७९) जे शरिर वाणी व मनाने पवित्र असते. तो सन्मानाने जीवन जगतो.

१८०) पाच प्रकारच्या दुर्बलता साधनेमध्ये बाधा आणतात.
१) जीव हिंसा २) चोरी ३) व्यभिचार ४) खोटे बोलणे ५) मादक पदार्थाचे सेवन करणे

१८१) घात तीन प्रकारे आहेत.
१) शीलघात २) चित्तघात ३) दृष्टीघात

१८२) तीन प्रकारे लाभ आहेत.
१) शीललाभ २) चित्तलाभ ३) दृष्टीलाभ

१८३) जीवनातील तीन पुर्णता प्राप्त करणे म्हणजेच धर्म प्राप्त करणे.
१) शारिरिक पुर्णता २) वाणीची पुर्णता ३) मनाची पुर्णता

१८४) बुद्धाने सुभुतीला सांगितलेल्या पारमिता :
१) दान पारमिता २) शरीर पारमिता ३) छानती पारमिता ४) विर्य पारमीता ५) समाधी पारमिता
६) प्रज्ञा पारमिता या पारमितेचा विकास करणे म्हणजेच धर्म होय.

१८५) बुद्ध म्हणतात निर्वाणासारखे सुख कशात नाही.

१८६) शिलाचा अभ्यास करणे म्हणजेच सद्गुणांचा अभ्यास करणे.

१८७) भगवान बुद्धापुर्वी त्यांच्या पुर्वजांच्या दृष्टीकोनातून निर्वाण म्हणजे आत्म्याला मोक्ष मिळविणे असे होते.

१८८) भगवान बुद्धापुर्वी निर्वाणाचे ४ प्रकार होते.
१) लौकिक निर्वाण २) योगिक निर्वाण ३) ब्राम्हण निर्वाण ४) औपनिषेदिक निर्वाण

१८९) लौकिक निर्वाण :- खा, प्या आणि मजा करा असे लौकिक निर्वाण म्हणत असत.

१९०) योगिक निर्वाण :- याचे सुख नकारात्मक होते. यामध्ये दु:ख मुक्त मार्ग निघण्याची शक्यता होती. परंतु सुख प्राप्ती नव्हती. तो मार्ग स्थायी नसून अस्थायी होता.

१९१) ब्राह्मण आणि औपनिषेदिक :- दोन्हीमध्ये एक समानता होती. आत्माचे स्वतंत्र असे अस्तित्व मानले होते.

१९२) ब्राह्मणी निर्वाणाचे चारही प्रकार बुद्धाला मान्य नव्हते. बुद्धाच्या निर्वाणाचे स्वरूप त्यांच्या पुर्वजांच्या निर्वाणाच्या स्वरूपापेक्षा वेगळे होते.

१९३) बुद्धाच्या निर्वाण स्वरूपात ३ मुद्दे आहेत.

१९४) कोणतेही आत्म्याचे सुख नसून प्राण्याचे सुख आहे.

१९५) जगात प्राण्याचे सुख आत्म्याची मुक्ती आणि मरणानंतर आत्म्याची मुक्ती बुद्धाच्या विचाराविरूद्ध आहे.

१९६) राग, द्वेष शांत करणे हे निर्वाणाचा मूळ आधार आहे.

१९७) राग, द्वेष हे धगधगत्या प्रज्वलीत अग्नीप्रमाणे आहे असे बुद्धगया येथे प्रवचनातून बुद्धाने सांगितले होते.

१९८) माणूस लोभाने लुब्ध, द्वेषाने दृष्ट, मोहाने मुढ बनतो.

१९९) निर्वाण याच जन्मी प्राप्त करता येते भविष्यात नाही.

२००) राधस्थविरला तथागत समजावून सांगत असताना निर्दोष जीवन हेच निर्वाण म्हटले आहे.

२०१) बुद्धाचा मार्ग म्हणजे मध्यम मार्ग आहे.

२०२) मध्यम मार्ग म्हणजेच अष्टांग मार्ग होय.
२०३) संपुर्ण उच्छेदवाद एक अंत आहे. परिनिर्वाण दुसरा अंत आहे. निर्वाण हा मध्यम मार्ग आहे.
२०४) तृष्णेचा त्याग करणे म्हणजेच धर्म होय.
२०५) धम्मपदात भगवान बुद्धांनी सांगितले आहे की आरोग्यापेक्षा मोठा दुसरा लाभ नाही. संतोषापेक्षा मोठे धन नाही.
२०६) संतोषाचा अर्थ परिस्थितीच्यासमोर मस्तक नमविणे नाही.
२०७) गरिबीतच जीवन जगा असे बुद्धाने सांगितले नाही. परिस्थिती बदलण्यासाठी प्रयास व प्रयत्न करणे गरजेचे आहे.

२०८) लोभ आपल्या अंकीत असावा असे महाविदानसुत्तात गौतमाने आनंदाला सांगितले आहे.

२०९) सर्व संस्कार अनित्य आहेत.

२१०) अनित्येची तीन अंगे आहेत.
२११) अनेक तत्वापासून बनलेली वस्तू अनित्य आहे.
२१२) व्यक्तीगतरूपाने प्राणी अनित्य आहेत.
२१३) प्रतित्य समुत्पाद वस्तूचे आत्मतत्व अनित्य आहेत.
२१४) प्राण्याचे शरीर पृथ्वी, जल, वायू, अग्नी पासून तयार झालेले आहे.
२१५) ज्या वेळेस हे चार तत्व वेगवेगळे होतात तेव्हा प्राणी राहत नाही.
२१६) मानव निरंतर परिवर्तनशील आहे.
२१७) ज्यावेळी हेतू प्रत्ययाचा उच्छेद होतो त्यावेळेस वस्तूचे अस्तित्व राहत नाही.
२१८) प्राणी मरण पावल्यास त्याचे परिवर्तन झालेच नाही तर काय परिणाम होईल ?
२१९) या सृष्टीत एक प्रकारचा नियम नित्य चालत असताना दिसतो. उदा. आकाशात नक्षत्रांचे चलन, ऋतुंचे नियमानुसार अवागमन, बीजापासून वृक्ष, वृक्षापासून फळ, फळापासून बीजे हे चालूच असते.
२२०) बुद्ध परिभाषेत यास बीजनियम आणि ऋतुनियम असे म्हणतात.
२२१) कुशल कर्माचा लाभ कुशल कर्म करणाऱ्याला मिळतोच परंतु अकुशल कर्म करणाऱ्यास हानीपासून कोणीही वाचवू शकत नाही.
२२२) परा - प्रकृतीवादाचे खंडन करण्यासाठी बुद्धांचे तीन हेतू आहेत.
२२३) माणसाने बुद्धीवादी असावे.
२२४) माणसाने स्वतंत्रापुर्वक सत्याचा शोध घ्यावा.
२२५) खोट्या विश्वासाच्या मुळ कारणांचा नायनाट करावा हा बुद्धाचा हेतुवाद आहे.
२२६) परमेश्वरावर विश्वास ठेवणे अधर्म आहे.
२२७) सृष्टीकर्ता ईश्वर आहे हे बुद्धाला मान्य नाही.
२२८) ईश्वराला कोणीही पाहिलेले नाही.
२२९) ईश्वर आश्रीत धर्म कल्पना आश्रीत धर्म आहे.
२३०) ईश्वर आश्रीत धर्मामुळे खोटा विश्वास तसेच अंधश्रद्धा उत्पन्न होते.
२३१) वासेट्ठा आणि भारद्वाज नावाचे पंडीत मनसाकट नावाच्या ब्राम्हणगावचे रहिवाशी होते.
२३२) ईश्वर, द्रव, वायू किंवा घन रूपात अस्तित्वात नाहीत.
२३३) जग निर्माता ईश्वर आहे हे खोटे आहे.
२३४) वासेट्ठ व भारद्वाज पंडीताला सिद्धार्थाने ईश्वर अस्तीत्वात नसल्याचे सिद्ध करून दाखविले.

२३५) वेदांतामध्ये प्रचलीत असलेली मते बुद्धाला मान्य नाहीत.
२३६) कोणत्याही गोष्टीला सत्य मानावयचे असल्यास त्यासाठी पुरावा लागतो असे बुद्धाचे मत आहे.
२३७) पुरावे दोन प्रकारचे असू शकतात.
१) प्रत्यक्ष २) अनुमान
२३८) वीज दिसत नसली तरीही तिचे अस्तित्व आहे.
२३९) कोणतेही अदृश्य वस्तू दुसऱ्या कोणत्याही रूपात तिच्या अस्तित्वाचे रूप प्रकट केल्याशिवाय तिचे अस्तित्व मान्य करता येत नाही.
२४०) ज्या धर्मात आत्म्याला स्थान आहे तो धर्म कल्पनेवर आधारीत आहे.
२४१) ब्राम्हणी धर्मात आत्मा शरिरापासून वेगळा असतो आणि तो शरीरातच असतो असे सांगितले आहे.
२४२) बुद्धाचा आत्म्यावर विश्वास नाही.
२४३) आजपर्यंत आत्मा कोणीही पाहिलेला नाही.
२४४) आत्मा नावाची वस्तूच अस्तित्वात नाही.
२४५) अस्तित्वात आहे मन किंवा चित्त.
२४६) मन आत्म्यापेक्षा निराळे आहे.
२४७) आत्मा शरीराबरोबर मरत नसून तो शरिराच्या मृत्यूनंतर दुसऱ्या शरिरात प्रवेश करतो हे खोटे आहे.
२४८) आत्म्याबद्दल बुद्धाच्या सिद्धांतास आनात्मवाद म्हटले जाते.
२४९) मृत्यूनंतर आत्मा दिसू शकतो का ?
२५०) मृत्यूनंतर कोणत्या परिस्थितीत किंवा आकार व रंग रूप अवस्थेत असतो ?
२५१) मृत्यूनंतर आत्मा दु:खी किंवा सुखी असतो ?
२५२) आत्म्याइकीच परात्म्याची कल्पना चुकीची आहे.
२५३) महाली नावाच्या पंडीताला बुद्धाने स्पष्ट सांगितले होते की आत्मा नावाची वस्तूच अस्तित्वात नाही.
२५४) नाव, रुप, प्राण्याचे सामुहिक नाव आहे.
२५५) प्राण्यांचे शरिर चार स्कंधापासून बनलेले आहे.
२५६) स्कंध म्हणजे तत्व : १) पृथ्वी २) जल ३) अग्नी ४) वायू हे स्कंध आहेत. यालाच रूपस्कंध म्हटले जाते.
२५७) रूपस्कंधाहून वेगळे नाव चित्त :- चैतसिका स्कंध आहे. ज्यामुळे प्राण्यांची रचना होते.
२५८) याच नाम स्कंधाला विज्ञान (चेतना) म्हणतात.
२५९) नामस्कंधाच्या अंतर्गत "वेदना" "संज्ञा" "संस्कार" आहेत.
२६०) विज्ञान (चित्त), वेदना, संज्ञा, संस्कार मिळून नाम स्कंध होते.
२६१) पृथ्वी, जल, अग्नी, वायू या चार तत्वाच्या मिश्रणापासून विज्ञान उत्पन्न होते.
२६२) जन्माबरोबरच विज्ञानाची उत्पत्ती होते.
२६३) मरणाबरोबर विज्ञानाचा नाश होतो.
२६४) जिथे तिथे विद्युत क्षेत्र (इलेक्ट्रीकल फिल्ड) असते तिथे तिथे त्याबरोबर आकर्षण क्षेत्र (मॅग्नेटिक फिल्ड) राहते.
२६५) शरिर आणि विज्ञानाबरोबर चित्त तसेच असते.
२६६) ज्यावेळेस विज्ञानाबरोबर चित्तबरोबर चेतना उदय होतो. त्यावेळेस प्राणी जिवंत बनतो म्हणून जीवनात विज्ञान अतिमहत्वाचे समजले जाते.
२६७) विज्ञानाची ३ अंगे आहेत.
१) ज्ञानमूलक विज्ञान २) भावनामूलक विज्ञान ३) क्रियाशील विज्ञान

२६८) ज्ञानमूलक विज्ञान : ज्यावेळेस आपणास काही माहिती मिळते ज्ञान प्रदान होते ते ज्ञान अतंर्गत असो किंवा बाह्य असो त्यास विज्ञानमुलक विज्ञान म्हणतात.

२६९) भावना मुलक विज्ञान : ज्यावेळेस हे विज्ञान चित्ताच्या अवस्थेत असते ती त्या वेळेस अनुकूल आणि प्रतिकुल वेदनेचे (बरोबर अनुभुती) कारण बनते.

२७०) क्रियाशील विज्ञान : ज्यावेळेस माणसाला उद्देशाच्या पुर्ततेसाठी कोणतीही प्रेरणा मिळते. क्रियाशील विज्ञान संकल्प आणि विचारांचे जनक आहे.

२७१) प्राण्यांच्या प्रत्येक क्रिया विज्ञानाद्वारे किंवा विज्ञानामुळेच पुर्ण होतात.

२७२) आत्म्याचे कोणतेही कार्य शरिरात संचालित नसल्यामुळे आत्मा मानने अधर्म आहे.

२७३) यज्ञावर विश्वास ठेवणे अधर्म आहे.

२७४) ब्राह्मण धर्म यज्ञावर आधारित आहे.

२७५) ब्राह्मण धर्मात यज्ञाचे २ प्रकार आहेत.
१) मित्य यज्ञ २) नैमित्तीक यज्ञ

२७६) मित्य यज्ञ : फल प्राप्ती मिळो अथवा न मिळो यज्ञ करणे गरजेचे समजले जाते.

२७७) नैमित्तीक यज्ञ : श्रेष्ठेची (यजमानाची) इच्छापुर्ती प्रित्यर्थ यज्ञ करणे.

२७८) यज्ञात पशुबळी, सुरापान, व्यभिचार असे अनेक वाईट प्रकार प्रचलित होते. तसेच खाद्यपदार्थ जाळून भस्म होत असत म्हणून यज्ञ अधर्मीक कृत्य समजले जाते.

२७९) यज्ञ कार्यसंबंधी बुद्धांनी ३ ब्राह्मण पंडीतांबरोबर वाद विवाद करून त्यांना खरा यज्ञ कोणता तो सांगितला.

२८०) तीन ब्राम्हण पंडीतांची नावे
१) कुटदंत्त २) उज्जयी ३) उदाई अशी आहेत.

२८१) गौतम बुद्धाने सांगितलेला यज्ञ :- १) जीवहत्या न करणे २) चोरी न करणे ३) व्यभिचार न करणे ४) खोटे न बोलणे ५) मादक पदार्थाचे सेवन न करणे हे पालन करणे म्हणजेच ब्राम्हणी यज्ञापेक्षा श्रेष्ठ यज्ञ होय.

२८२) कल्पनाअश्रीत विश्वास अधर्म आहे.

२८३) जग निर्माण केलेले नसून जगाचा विस्तार (विकास) झालेला आहे असे बुद्धाचे म्हणणे आहे.

२८४) विद्या फक्त ब्राह्मणासाठीच आहे असे ब्राम्हण म्हणतात परंतु विद्या ही सर्वांसाठीच आहे असे बुद्धवचन आहे.

२८५) विद्येने मनुष्य विद्वान होतो परंतु विद्वानाने शिलवान बनले पाहिजे.

२८६) बिना शिलाची विद्या अत्यंत धोकेदायक आहे.

२८७) ज्ञानाला कोठेही अंत नाही. ज्ञान अनंत आहे.

२८८) भिक्षु, भिक्षुणी, उपासक,उपासिका यांच्यासमोर बुद्धाने गाथा पाठ व्हावी म्हणून म्हटलेली गाथा.

कायेन संवरो साधू, साधू काचाय संवरो
मनसा संवरो साधू, साधू सब्बत्व संवरो
सब्बत्व संबुतो भिक्खु, सब्ब दुखा समुपच्चती

(जो शरिर वाचा व मनावर संयम ठेऊन चांगले वागतो तो निर्वाणपद प्राप्त करतो.)

२९०) भिक्षु पटिसेनच असा भिक्षु होता त्यास फक्त एकच गाथा पाठ होती तरीसुद्धा अर्हंत पद प्राप्त झाले.

२९१) बुद्धाने शरीराची तीन अकुशल कर्मे, वाणीची तीन अकुशल कर्मे व मनाची तीन अकुशल कर्मे अशी दहा अकुशल कर्मे समजावून सांगितली होती.

२९२) हजारो गाथा वाचून त्याचा अर्थच समजत नसेल तर त्या वाचनात काहीही तथ्य नाही. परंतु एकच गाथा वाचून त्याप्रमाणे आचरण केल्यास निर्वाण प्राप्तीस कारण होते.

२९३) भगवान बुद्धाला वेद मान्य नाही.

२९४) बुद्धांनी सांगितले की वस्तूचे परीक्षण व पुर्नपरीक्षण झालेच पाहिजे.

२९५) ऐकून असल्यामुळे, पुर्व परंपरा असल्यामुळे, पुष्कळ लोक मानित असल्यामुळे, धर्मग्रंथात लिहिल्यामुळे, शास्त्राधार असल्यामुळे, आचार्यांच्या सांगण्यामुळे कोणत्याही गोष्टी खऱ्या मानू नये.

२९६) आत्मनुभवानेच हितकर, अहितकर,वंदनीय, दु:ख, कष्ट आहे का हे जाणूनच कोणत्याही चांगल्या गोष्टीचे अनुकरण करा.

२९७) निर्मळ मन बनविणे हाच सद्धम्म आहे.

२९८) मन हे सर्वांचे मूळ कारण आहे. मन योजना बनविते, अधिकार गाजविते, बरी वाईट कर्मे मनामुळेच होतात.

२९९) माणूस माणसाबरोबर दूरव्यवहार करतो त्यातूनच दु:ख निर्माण होते.

३००) धर्माच्या मुख्य हेतूबद्दल निरनिराळे हेतू इतर धर्मामध्ये आहेत.

३०१) माणसाला ईश्वरप्राप्ती व्हावी आणि आत्म्याला मोक्ष लाभावा असे काही धर्माचे मत आहे.

३०२) बरेचसे धर्म तीन राज्याची अभिलाषा करतात.
१) स्वर्गाचे राज्य २) पृथ्वीचे राज्य ३) नरकाचे राज्य

३०३) असे मानले जाते की स्वर्ग राज्यावर देवांची सत्ता असते.

३०४) नरकाच्या राज्यात सैतानाची सत्ता असते.

३०५) पृथ्वीच्या राज्याबद्दल झगडा चालू आहे.

३०६) स्वर्गात फक्त ईश्वर आणि त्यांचे प्रेषितच राहू शकतात व जीवनात असणारे संपुर्ण भोग विलास तेथे प्राप्त होतात.

३०७) धर्माचा उद्देश काल्पनिक स्वर्ग प्राप्तीसाठी आहे, असे बुद्धांनी सांगितले नाही.

३०८) धर्माचे राज्य याच पृथ्वीवर आहे आणि ते धर्म मार्गानेच प्राप्त होऊ शकते.

३०९) इतर धर्मापेक्षा बुद्धाचा धर्म वेगळा आहे.

३१०) बुद्धाच्या धर्मात पंचशिल अष्टांगिक मार्ग आणि पारमिता यांना महत्व दिले दिलेले आहे. हाच मार्ग माणसाला सदाचारी बनवितो.

३११) धर्माचे कार्य केवळ उपदेश देणे नसून माणसाला सर्वांगिण दृष्टीने सदाचारी बनविणे आहे.

३१२) धर्माने माणसाला अकुशल व कुशल कर्मे कोणती हे सांगून कुशल कर्मे शिकवितात.

३१३) जैन धर्म संस्थापक महावीराने म्हटले आहे की मनुष्य जे जे सुख दु:ख भोगतो ते त्याच्या पूर्व जन्माच्या कार्याचा परिणाम आहे.

३१४) अकुशल प्रवृत्तीस कुशल प्रवृत्तीत बदल करून शुभसंस्कार अंगीकारने ही बुद्धाची शिकवण आहे.

३१५) भगवान बुद्धाने चित्त साधनेला प्रथम स्थान दिलेले आहे.

३१६) माणूस एकटा जरी असला तरी त्याने सत्याच्या मार्गापासून विचलीत होऊ नये.

३१७) कोणी हानी करीत असतील, खोटे बोलत असतील, हिंसा करीत असतील, चोरी करीत असतील, दारू पीत असतील या विचार वित्त करीत असतील मी ते करणार नाही असा ठाम निश्चय करणे हाच उचित मार्ग आहे.

३१८) कोणी दारिद्र्यात जीवन जगत असतील तर मी त्याप्रमाणे दारिद्र्यात जीवन जगणार नाही अशी प्रतिज्ञा करावी.

३१९) विज्ञान चेतनापासून प्रभावित होते.

३२०) धम्म अशावेळी सद्धम्म होतो की धम्म सर्वांसाठी ज्ञानाची द्वारे खुली ठेवतो.
३२१) ब्राह्मणी धर्मात ब्राह्मणण, क्षत्रिय, वैश्य याच पुरुषांना फक्त ज्ञान प्राप्तीचा अधिकार होता.
३२२) सर्व स्त्रिया आणि शुद्र पुरूषांना ज्ञानप्राप्तीचा अधिकार नव्हता.
३२३) गौतमाने या ब्राह्मणी नियमाला अत्यंत कठोरपणे विरोध केला.
३२४) जर दुसरे आपले हितचिंतक व्हावे असे वाटत असेल तर सर्वांना समान संधी व न्याय मिळालाच पाहिजे.
३२५) कोसंबीमध्ये एक ब्रम्हचारी राहत होता. तो स्वत:ला पंडीत समजत असे. दिवसाही फिरताना हातात तो जळती मशाल घेऊन फिरत असे. तथागताने त्याला विचारले असता ब्रम्हचाऱ्याने उत्तर दिले की अज्ञान व अंधकारात सर्व मानव आहेत. त्यांना रस्ता दाखविण्यासाठी मशाल घेऊन मी फिरत आहे. तेव्हा तथागताने त्यास प्रश्न केला की धर्म ग्रंथात ज्या चार विद्या आहेत. १) शब्द विद्या २) नश्रत्र विद्या ३) राजविद्या ४) युद्धविद्या. या युद्धेचा तू अभ्यास केलेला आहेस काय? त्यावेळेस तो पंडीत नि:शब्द झाला. तो म्हणाला मला त्याबद्दल काहीही माहित नाही. नंतर बुद्ध म्हणाले जो कोणी पंडीत असेल किंवा पंडीत नसेल आणि दुसऱ्याला मुर्ख किंवा कमी समजून त्यांना हीन समजत असेल, तो स्वत: आंधळा असून दुसऱ्याला मशाल दाखवित फिरत असतो.
३२६) सिद्धार्थाने विद्येला प्रज्ञापेक्षा वेगळे समजलेले आहे.
३२७) राजाला त्याच्या राज्यात पूज्य मानले जाते, परंतु विद्वानाला साऱ्या विश्वात पूज्य मानले जाते.
३२८) बुद्धाने अंगुत्तर निकायमध्ये ब्राह्मणाची प्रज्ञा व बुद्धाची प्रज्ञा कशी आहे या बद्दल सांगितले आहे.
३२९) प्रज्ञा आवश्यक आहे परंतु शील अधिक गरजेचे आहे.
३३०) शिलाशिवाय प्रज्ञा दुधारी तलवारीप्रमाणे आहे.
३३१) बुद्धाने शिलाचा मूळ आधार पंचशिल असे सांगितले.
३३२) बुद्ध धर्म २३४५६८१०२२ यावर आधारीत आहे.
३३३) २३४५६८१०२२ म्हणजेच प्रज्ञा व शिल, त्रिशरण, चार आर्यसत्य, पंचशिल, अष्टांगिक मार्ग, दहा पारमिता आणि बावीस प्रतिज्ञा
३३४) शिल नसलेली व्यक्तीजवळ प्रज्ञा असल्यास प्रज्ञा कोणाचीही हत्या करू शकते.
३३५) शिल असलेल्या व्यक्तीजवळ प्रज्ञा असल्यास अडचणीत असलेल्या कोणत्याही माणसाचे संरक्षण होऊ शकते.
३३६) धर्म अशा वेळेस सद्धर्म होऊ शकतो की प्रज्ञा शिलाबरोबरच त्यास करूणेची आवश्यकता असते.
३३७) गांधार देशात खरतनाक बिमारी पसरली तेव्हा एका साधूची फारच हालत खराब झाली होती. तो बसलेल्या जागेससुद्धा घाण वास येत असे. त्याची सेवा कोणीच करत नसत. त्यावेळेस स्वत: बुद्धाने त्यास स्नान घातले व त्यांचा शिष्य शुकृदेव पाणी ओतण्यास मदत करीत होता.
३३८) इतरांला मदत करणे व मदत करण्याची त्यांना प्रेरणा देणे ही बुद्धाची शिकवण आहे.
३३९) करूणेचा अर्थ दु:खी प्राण्यावर दया करा.
३४०) मैत्रीचा अर्थ मानव आणि इतर प्राण्यांवर दया करणे.
३४१) तुमचे मन पृथ्वीप्रमाणे दृढ, हवेप्रमाणे स्वच्छ आणि सागराप्रमाणे विशाल असावे.
३४२) बुद्धाने प्रवचनामध्ये सांगितले आहे की माझ्या धर्मात नुसती प्रज्ञाच आहे असे नसून मैत्रीसुद्धा आहे.
३४४) मन निर्मळ असेल तर जगात धर्मराज्य येऊ शकते.
३४५) धर्म राज्य तेव्हाच येऊ शकते जेव्हा ज्ञानाची द्वारे सर्वांसाठी खुले असतात.
३४६) माणसाने नुसते ज्ञानी व्हावे इतकेच नव्हे तर ज्ञानी पंडीत होण्याच्या मार्गावर असावे.
३४७) ज्ञानी पंडीतच होऊन कार्यभाग साध्य होत नाही तर ज्ञानी पंडीताला प्रज्ञेची अत्यंत गरज आहे.
३४८) प्रज्ञाबरोबर शील महत्वाचे आहे.

३४९) शिलाला करूणेची जोड पाहिजे.
३५०) करूणेला मैत्रीची जोड गरजेची आहे.
३५१) बुद्ध म्हणातात जे भिक्षु फक्त भोजन आणि वस्त्रासाठी मैत्री करतात त्यांना मी खरे भिक्षु समजत नाही.
३५२) खरा धर्म तोच आहे जो समाजातील भेदभाव संपवतो.
३५३) ब्राह्मणाच्या म्हणण्याप्रमाणे वेदाने आदर्श समाजरचना सांगितली आहे.
३५४) समाजात ब्राह्मण, क्षत्रिय, वैश्य आणि शुद्र असे चार वर्ण केलेले आहेत.
३५५) सर्वांत उंच ब्राह्मण त्यानंतर खाली क्षत्रिय त्यानंतर खाली वैश्य आणि सर्वांत खालचा वर्ग शुद्राला मानलेले आहे.
३५६) कोणत्याही वर्गातील व्यक्तीस कोणत्याही दुसऱ्या वर्गात जाता येत नाही.
३५७) कोणत्याही वर्णाला दुसऱ्या वर्णाची कामे करण्यास सक्त मनाई आहे.
३५८) बेटी व्यवहार दुसऱ्या वर्णाबरोबर होत नसत.
३५९) शुद्राने तीन वर्णांची सेवा करावी असे म्हटलेले आहे.
३६०) ब्राह्मणाच्या शास्त्राप्रमाणे चार वर्णाची उत्पत्ती ब्रम्हापासून झाली असे मानले जाते.
३६१) ब्राह्मणाची उत्पत्ती ब्रम्हाच्या मुखातून झाली.
३६२) वैश्य ब्रम्हाच्या मांड्यातून जन्मले.
३६३) क्षत्रिय भुजापासून जन्मले.
३६४) शुद्र ब्राह्मणाच्या तळपायापासून जन्मले.
३६५) ब्रम्हाने सृष्टीची उत्पत्ती स्वत: केली.
३६६) सृष्टी निर्माण करण्यासाठी ब्रम्हाने सर्व वस्तू कोठून आणल्या ?
३६७) मानवाची उत्पत्ती मानवापासून होते.
३६८) उत्पत्ती होण्यासाठी स्त्री आणि पुरूष यांच्या मिलनाची आवश्यकता असते
३६९) चार वर्ण फक्त भारतात आहेत इतर देशात गरिब आणि श्रीमंत हे दोन वर्ग पहावयास मिळतात.
३७०) ब्रम्हाच्या कार्याबाबत फक्त भारतातच बोलले जाते.
३७१) ब्राह्मणाचा जन्म ब्रम्हाच्या मुखातून जर झाला असेल तर ब्रम्हाने ब्राह्मण स्त्रिया कशासाठी पैदा केल्या ?
३७२) ब्रम्हाला मुखात, बाहूत, जांघेत तळपायात योन्या होत्या का ?
३७२) मानवाचा जन्म होण्यासाठी गर्भात अर्भक नऊ महिने असते.
३७३) ब्राह्मण ब्रम्हाच्या तोंडात कसे राहिले.
३७४) क्षत्रिय नऊ महिने भुजात कसे वाढले.
३७५) वैश्य मांड्यातून कोणत्या मार्गाने बाहेर पडले.
३७६) शुद्र नऊ महिने तळपायात असता ब्रम्हा कसा चालत होता ?
३७७) जन्म ज्यातून होतो त्याच ठिकाणी मैथूनक्रिया होते.
३७८) मैथुनाशिवाय प्राण्यांची उत्पत्ती नाही.
३७९) ब्राह्मणांच्या जन्मासाठी ब्रम्हाने मुखाद्वारे मैथुन केले होते काय ?
३८०) ब्रम्हाबरोबर कोणी मैथुन केले ?
३८१) स्त्रि-पुरूष दोघे असल्याशिवाय आणि चार तत्वाशिवाय प्रजोत्पादन होऊ शकत नाही.
३८२) ब्रम्हापासून झालेल्या मुलांना ब्रम्हा स्तनपान कसा करीत होता.
३८३) ब्रम्हाचे स्तनपानाचे ठिकाण सर्वांसाठी एकच होते की वर्णासाठी वेगळे होते.
३८४) ब्रम्हा स्त्री होती की पुरूष होता ?
३८५) ब्राह्मणी धर्मात वर्णावरून जात ठरविली जाते.

३८६) ब्राह्मणाच्या खालच्या वर्णाच्या माणसाच्या ज्ञानाला किंमत नाही.
३८७) जन्माने कोणीही ब्राह्मण होत नाही किंवा जन्माने कोणीही शुद्र होत नसतो असे बुद्धाने सांगितले.
३८८) कोणालाही उच्च, निच्च न मानता समानतेच्या विचाराने वागावे.
३८९) ज्या धर्मात समानता नाही तो धर्म स्विकारणे अयोग्य आहे.
३९०) भगवान बुद्धाचा धर्म माणसाच्या सुकुण्य प्रवृत्तीतून उत्पन्न होणारा न्यायप्रणित धर्म आहे.
३९१) आपण सुखात जगत असताना दुसऱ्याच्या सुखात अधिक वृद्धी करावी अन्यायाचा प्रतिकार जरूर करावा.
३९२) बुद्धाला ईश्वरी पूजा, कर्मकांड, यज्ञयाग, देव, आत्मा, जादू टोणा मान्य नाही.
३९३) बुद्धाने उज्जन नावाच्या ब्राह्मणास सांगितले की ज्या यज्ञात गाई, बकरी, मेंड्या, कोंबड्या असे अनेक प्रकारचे बळी दिले जातात. असे यज्ञ मला मान्य नाहीत.
३९४) ब्राह्मणी धर्मात जादू नावाची एक शक्ती आहे आणि त्या शक्तीमुळे घटना घडतात असा समज आहे.
३९५) ब्राह्मणी धर्मात जादू एक भूत शक्ती आहे असाही समज आहे.
३९६) जादू हि एक शिवाची शक्ती आहे असाही समज आहे.
३९७) जादू हिच शक्ती दुनिया बनविण्यास कारणीभूत ठरविली गेली.
३९८) जादू या शक्तीपासून मानवनिर्मीती झाली असे मानले गेले.
३९९) आत्म्याची निर्मीती जादू या शक्तीपासून झाली असे समजले गेले त्यावेळेपासून आत्म्यावर विश्वास देव पूजा प्रार्थना कर्मकांड सुरू झाले.
४००) सिद्धार्थाचा धर्म ब्राह्मणी धर्मापेक्षा वेगळा आहे. सदाचाराने एक माणसाने दुसऱ्या माणसाबरोबर सदाचाराने वागावे. प्रज्ञा आणि करूणेचा स्विकार म्हणजेच धर्म होय.
४०१) प्रज्ञा म्हणजे निर्मळ ज्ञान.
४०२) करूणा म्हणजे दया प्रेम मैत्री.
४०३) बुद्धधर्मात चमत्काराला कोणतेही स्थान नाही.
४०४) कोट्ठपाद पंडीताने बुद्धाला आठ प्रश्न विचारले होते.
१) जगाला अंत आहे काय? २) जगाला सीमा आहे काय? ३) जग असीम आहे काय? ४) आत्मा आणि शरीर दोन्ही एकच आहे काय? ५) आत्मा आणि शरीर वेगवेगळे आहे काय? ६) तथागत मरणानंतर राहतात काय? ७) तथागत मरणानंतर राहत नाहीत काय? ८) तथागत मरल्यानंतर राहतात आणि राहत ही नाहीत काय?
४०५) तथागताने कोट्ठपादाला उत्तर दिले की या विषयाबाबत माझे मत मी व्यक्त केलेले नाही? कारण या प्रश्नाच्या उत्तरामुळे कोणताही फायदा होत नाही. यामुळे माणसाला आचरण सुधारण्यास मदत होत नाही. तसेच राग, द्वेषपासून मुक्तीचा मार्ग मिळत नाही. यापासून शांती, विद्या प्राप्त होत नाही. यामुळे प्रज्ञा लाभ नाही. निर्वाण मार्गाचा आणि या प्रश्नाचा काहीही संबंध नाही म्हणून मी याविषयी मत व्यक्त केलेले नाही.
४०६) जगाची पुनरनिर्मीती करणे हा धर्माचा उद्देश आहे.
४०७) धर्म म्हणजे नैतिकता आणि नैतिकता म्हणजेच धर्म.
४०८) धर्मात प्रार्थना, तिर्थयात्रा, कर्मकांड, रितीरिवाज बळी देणे याला कोणतेही स्थान नाही.
४०९) माणसाने माणसाबरोबर माणुसकीच्या तत्वाने वागावे यातच धर्म आहे. त्यासाठी ईश्वराच्या प्रार्थनेची किंवा ईश्वराच्या परवानगीची गरज नाही.
४१०) जोपर्यंत समजात समानता प्रस्थापित होत नाही आदर्श समाज निर्मीती होत नाही तोपर्यंत समाज एक दुसऱ्या बरोबर मिळून मिसळून वागत नाही.

४११) बुद्धकालीन आचारामध्ये आत्म्याबद्दल दोन प्रकारचे मत प्रवाह होते.
१) शासवतवादी २) उच्छेदवादी

४१२) शासवतवादी आत्मा मानीत होते.

४१३) उच्छेदवादी आत्मा मानीत नव्हते.

४१४) शासवतवादी मरणानंतर आत्मा शरिरापासून वेगळा होतो असे मानीत असत.

४१५) आत्मा दुसऱ्या शरिरात प्रवेश करून त्याचे नवीकरण होते असे शासवतवादी मानत होते.

४१६) मरणानंतर काही शिल्लक राहत नाही असे उच्छेदवादीचे म्हणणे आहे.

४१७) शासवदवादी पुर्नजन्म मानतात.

४१८) उच्छेदवादी पुर्नजन्म मानत नाहीत.

४१९) बुद्धधर्मात पुनजन्माबद्दल या दोघांपेक्षा वेगळा सिद्धात आहे.

४२०) बुद्धधर्मातील पुर्नजन्म माणसाचा नसून स्कंध रूपाचा होतो.

४२१) वातावरणातील जे समान भौतीक तत्वे आहेत त्याच तत्वात शरिरातील तत्वे विलीन होतात म्हणून तत्वरूपाने (स्कंध) वस्तू कायम राहते फक्त मनुष्य मरतो.

४२२) चार स्कंधापासूनच मनुष्याचा जन्म होतो. बुद्ध या प्रकारचा पुर्नजन्म मानतात.

४२३) डोळे, नाक, कान, जीभ, त्वचा या पंचेंद्रियांवर मनाचा ताबा आहे.

४२४) पाच इंद्रिय चेतनामुळे (जीवीत इंद्रिय) कार्यरत होतात.

४२५) चेतना उष्णतेमुळे कार्यरत असते तर उष्णता चेतनेवर अवलंबून असते.

४२६) प्रज्वलीत दिव्याच्या प्रभेमुळे प्रकाश प्रकट होतो तर प्रकाशामुळे प्रभाव प्रकट होतो.

४२७) जिवीत इंद्रिय (चेतना) उष्णता आणि विज्ञानाचा अभाव झाल्यास प्राणीमृत घोषीत होतो.

४२८) मृत्यू म्हणजे शरीरात निर्माण होणाऱ्या शक्तींचा लोप होणे व वातावरणात असणाऱ्या शक्तीपूजात काही अंशी वाढ होणे.

४२९) बुद्धाच्या कर्मसिद्धांतात व ब्राह्मणी धर्माच्या कर्मसिद्धांतामध्ये शाब्दिक कितीही साम्य असले तरी दोन्ही सिद्धांत एक होऊ शकत नाही.

४३०) ब्राह्मणी धर्मात आत्म्याला स्थान आहे.

४३१) बौद्ध धर्मात आत्म्याला मुळीच स्थान नाही.

४३२) ब्राह्मणी धर्मात कर्मसिद्धांत वंशानुवंश चालतो.

४३३) बुद्ध धर्मात कर्मसिद्धांत वंशानुवंश चालत नाही.

४३४) शरिर मेल्यानंतर आत्मा उडून जातो तो मरत नाही असे ब्राह्मणी धर्म सांगतो.

४३५) बुद्धाला हे मान्य नाही.

४३६) कर्माचा आत्म्यावर प्रभाव पडतो असे ब्राम्हणी धर्म मानतो.

४३७) बुद्धाला हे मान्य नाही.

४३८) मुल जन्माबरोबरच वर्णमानात घडणाऱ्या घटना बरोबर घेऊन येते हे बुद्धाला मान्य नाही.

४३९) मुलात वंशायुगत आई-वडिलांच्या माध्यमातून चांगले वाईट गुण निर्माण़ होतात. तसेच परिस्थितीनुसार चांगले वाईट गुण निर्माण होतात.

४४०) सिंहलदीपामध्ये भिक्षुवर परकिय आक्रमण झाले त्यावेळी ते स्वत: लढले व लोकांना लढण्यास सांगितले.

४४१) बर्माचे भिक्षु परकीय आक्रमण झाले त्यावेळी ते लढले नाहीत आणि लोकांनाही लढण्यास सांगितले नाही.

४४२) बर्माचे लोक अंडे खातात, मासे खात नाहीत.

४४३) भिक्षापात्रात जर कोणी मांसाहार वाढल्यास भिक्षुंनी ते स्वीकारावे.

४४४) देवदत्ताने सिद्धार्थासमोर प्रस्ताव मांडला होता की भिक्षुंनी दान म्हणून मांस स्विकारू नये तेव्हा सिद्धार्थाने त्या प्रस्तावाचा अस्विकार केला.
४४५) सर्वांबरोबर मैत्री करा. ज्यामुळे तुम्हाला कोणतीही जिवहिंसा करण्याची आवश्यकता भासणार नाही.
४४६) ज्यावेळी जीव हिंसा करावीच लागेल त्यावेळेस हिंसा करण्यास बुद्धाने नाकारले नाही.
४४७) शक्यतोवर अहिंसा आणि नाईलाजास्तव हिंसा करणे ती हिंसा नाही.
४४८) ब्राह्मणी धर्मात हिंसेला मान्यता आहे.
४४९) जैन धर्मात हिंसेला मान्यता नाही.
४५०) बौद्ध धर्मात हिंदू व जैन धर्मातील अहिंसेला मान्यता नाही.
४५१) संसरणाशिवाय पुर्नजन्म होतो हे बौद्ध तत्वज्ञान आहे.
४५२) संसरण म्हणजे आत्मा एका शरीरातून दुसऱ्या शरीरात प्रवेश करतो.
४५३) बुद्धाच्या कालावधीमध्ये लेखनकला विकसीत झालेली नव्हती.
४५४) बुद्धाने सांगितलेले ज्ञान भिक्षुगण पाठांतर करीत असत.
४५५) जे भिक्षु गाथा मुखद्वगत करीत असत त्यांना भागणक म्हणत असत.
४५६) बऱ्याच वेळा बौद्ध तत्वज्ञान चुकीचे सांगण्यात आलेले आहे.
४५७) जी गोष्ट बुद्धीसंगत व तर्कसंगत आहे ते बुद्धाचे ज्ञान समजावे.
४५८) चांगले कार्य करा. वाईट कामासाठी दुसऱ्याला प्रोत्साहन देऊ नका. वाईट कामासाठी दुसऱ्याला मदत करू नका.
४५९) थेंबाथेंबानेच घडा भरतो त्याप्रमाणे बुद्धीमान मनुष्य सुभकर्म करीत असतो.
४६०) सद्गृहस्थालासुद्धा अनेक दु:खे व यातना भोगाव्या लागतात. जेव्हा त्याच्या शुभकर्माची फळे मिळावयास सुरूवात होते तेव्हापासून त्यास चांगले दिवस पहावयास मिळतात.
४६१) पापी मनुष्यसुद्धा चांगली सुखे उपभोगतो परंतु जेव्हा त्याच्या कर्माची फळे पुर्णपणे परिपक्व होतात तेव्हा तो अतिशय दु:ख भोगतो.
४६२) शिलाचा (सदाचार) सुगंध चंदन किंवा कोणत्याही फुलाच्या सुगंधापेक्षा श्रेष्ठ आहे.
४६३) धुपाचा सुगंध ठराविकच अंतरापर्यंत दरवळतो. परंतु शिलाचा सुगंध अमर्याद अंतरावरसुद्धा येतो.
४६४) चांगले कर्म करण्यास दिरंगाई करू नका.
४६५) कामवासनेपासून दु:ख व भिती उत्पन्न होते.
४६६) वाईट कर्म करण्यास सोपे असते परंतु चांगले कर्म करण्यास अडचणी असतात.
४६७) लोभ व तृष्णेपासून मुक्त होणे म्हणजेच बौद्ध जीवन मार्ग होय.
४६८) तृष्णा व लोभापासून भय वा दु:ख प्राप्त होते.
४६९) रागमुक्त माणसास भय व दु:ख नसते.
४७०) कोणाचाही द्वेष करू नका. कोणालाही त्रास देऊ नका.
४७१) क्षमा सर्वात महान तपश्चर्या आहे.
४७२) जो निर्दोष व्यक्तीला त्रास देतो तो स्वत: दु:ख भोगतो.
४७३) आपल्या शत्रुला मैत्रीला जिंकावे.
४७४) क्रोधाला मैत्रीने जिंकावे, वाईटाला चांगल्याने जिंकावे, लोभाला उदारतेने जिंकावे, खोट्याला खऱ्याने जिंकावे.
४७५) कामाग्नीसारखे दु:ख नाही, घृणासारखे दु:ख नाही, उपादान स्कंधासारखे दु:ख नाही.
४७६) निर्वाणासारखे श्रेष्ठ सुख कोणतेही नाही.
४७७) माणूस स्वत:च स्वत:चा मालक आहे आणि स्वत:च स्वत:चा रक्षक आहे.

४७८) युद्धात हजारो लोकांना जिंकण्यापेक्षा स्वत:ने स्वत:ला जिंकावे तोच खरा महासंग्राम होय.

४७९) पापी माणसांची संगत करू नका. सत्पुरूषाशी मैत्री करा. श्रेष्ठ पुरूषाच्या उपदेशाने माणसाला सुख शांती लाभते.

४८०) खरा मुर्ख तो आहे जो स्वत: मुर्ख असून पंडीत समजतो.

४८१) अति बोलण्याने कंजुष बेईमान माणूस आदरणीय होत नसतो.

४८२) विचारहीन बनु नका, विचारवान बना.

४८३) शत्रुत्वाच्या भावनेने एक शत्रु आपल्या शत्रुचे जेवढे नुकसान करतो त्याहीपेक्षा जास्त नुकसान चुकीच्या मार्गाने असलेले आपले मन करते.

४८४) सच्याच्या मार्गाने चालणारा मनुष्य जगात सुखाने जीवन जगतो.

४८५) गरीबीमुळे दु:ख पैदा होते.

४८६) गरिबी दुर झाल्यामुळे मनुष्य सुखी होतो असेही नाही.

४८७) उच्च राहणीमानाने नाही परंतु उच्च विचारसरणीने माणूस सुखी होतो.

४८८) आरोग्य सर्वात मोठा लाभ आहे. संतोष सर्वात मोठे धन आहे. विश्वास सर्वात मोठा नातलग आहे. निर्वाण सर्वात मोठे सुख आहे.

४८९) विजयापासून वैर निर्माण होते.

४९०) अग्नीपेक्षा रागअग्नी अतिशय तेज आहे.

४९१) कठोर वाणीने बोलू नये. दुसरेही कठोर शब्दाने प्रतित्तर देतील. कोणावर आघात केल्यास तुमच्यावरही आघात होईल.

४९२) शेतीची मशागत केली नाही तर जे पेरले नसेल ते उगवते.

४९३) सिद्धार्थाचे जसे बोलणे होते तसेच आचरण होते. यथाभाषी तथाकारी तथाकारी यथाभाषी असल्यामुळे सिद्धार्थाला तथागत म्हणतात.

४९४) सन्मार्ग ठरावीक लोकांसाठी नसून सर्वांसाठी आहे.

४९५) सन्मार्ग प्रथम मध्य आणि अंतकाली कल्याणकारी असतो.

४९६) गौतम बुद्ध फक्त मार्गदाता आहेत. मार्गाक्रमण करणे हे मानवाचे कर्तव्य आहे.

४९७) अज्ञान हानी आहे तर ज्ञान लाभ आहे.

४९८) शब्द विचार व शरिरावर योग्य नियंत्रण ठेवा.

४९९) जो बोलत नाही लोक त्याचीही निंदा करतात. जो जास्त बोलतो त्याचीही निंदा करतात. जो कमी बोलतो त्याचीही लोक निंदा करतात. पृथ्वीवर असा कोणीही नाही ज्याची लोक निंदा करित नाहीत.

५००) अप्रमाद निर्वाणमार्ग आहे तर प्रमाद मृत्यूमार्ग आहे.

५०१) जे खऱ्याला खोटे समजतात व खोट्याला खरे समजतात त्यांना सत्याचा मार्ग सापडत नाही.

५०२) जे सत्याला असत्य व खोट्याला खोटे समजतात त्यांनाच सन्मार्ग समजतो.

५०३) जो धर्मावर प्रेम करतो तो उन्नत होतो जो धर्माबद्दल घृणा करतो तो पतन पावतो.

५०४) जगात चार प्रकारचे लोक आहेत.

१) जे फक्त स्वत:चे भले करतात. २) जे दुसऱ्याचे भले करतात परंतु स्वत:चे नाही. ३) जे स्वत:चे भले करतात दुसऱ्याचे भले करत नाहीत. ४) जे स्वत:चेही व दुसऱ्याचे भले करतात.

५०५) दान, शिल आणि संयम ही कुशल कर्मे आहेत.

५०६) सिद्धार्थाने श्रावस्तीत जेतवनामध्ये सांगितलेले सात संकल्प :

१) आई-वडिलांची सेवा करणे. २) वडिलधाऱ्यांचा आदर करावा. ३) मधु भाष असावे. ४) कोणतेही वाईट करू नये. ५) दानशील असावे. ६) आपण जे मिळवतो त्यात दुसऱ्याचाही वाटा असतो. ७) क्रोध शांत करून क्रोधविरहीत जिवन जगावे.

५०७) मृत्यूनंतर जीवनाची चिंता करणे व्यर्थ आहे.

५०८) संकटाच्या वेळी किंवा हेतू साध्य करण्यासाठी परमेश्वराची याचना करणे चुकीचे आहे.

५०९) बाह्य स्नानाने शुद्धी होत नाही.

५१०) हत्यार चालविणाराला दुसरा हत्यार चालविणारा मिळतोच जिंकणाराला हरविणारा मिळतोच.

५११) राजा धार्मिक असेल तर प्रजाही धार्मिक होते.

५१२) कोसल नरेश प्रसेनजित मादग नरेश अजातशत्रूचा मामा होता.

५१३) भगवान बुद्धाच्या श्रावकाचे दोन विभाग होते.
१) भिक्षु २) उपासल (गृहस्थी)

५१४) इतिहासात सर्वात प्रथम बुद्धाने भिक्षु संघ बनवून संघाचे नियम तयार केले.

५१५) गौतमाच्या संघात जात, पंत, उंच, निच तसेच लिंग भेद न करता सर्वांसाठी प्रवेश होता कोणालाही संघ प्रवेश बंधन नव्हते.

५१६) संघात प्रवेश केल्यानंतर सर्व समान समजत असत.

५१७) स्वगुणामुळे गुणवान भिक्षुस मानत्व प्राप्त होत असे.

५१८) नदी समुद्रास मिळाल्यांनतर नदीचे अस्तित्व राहत नाही ती समुद्रात विलीन होते. त्याप्रमाणे संघात सामिल झाल्यानंतर त्या व्यक्तीचे संघात रूपांतर होते. पुर्व नाम व जीवन समाप्त होते.

५१९) त्रिसरण व दशशील ग्रहण केल्यास कोणीही श्रामणेर होऊ शकतो.

५२०) श्रामणेर केव्हाही संघाला सोडून गृहस्थी जीवन जगू शकतो.

५२१) श्रामणेराला परिव्रजीत समजले जात नाही.

५२२) भिक्षु होण्याकरीता दोन अवस्था पार कराव्या लागतात.
१) प्रवृज्या २) उपसंपदा

५२३) उपसंपदा व प्रवृज्या उपाध्यायाकडून घ्यावी लागते.

५२४) उपाध्याय होण्यासाठी कमीत कमी दहा वर्षे भिक्षु म्हणून रहावे लागते.

५२५) भिक्षु होण्यास पात्रता व अपात्राताबद्धल प्रथम संघाने खात्री केल्यानंतर प्रवृज्यास योग्य अयोग्य ठरविले जाते.

५२६) भिक्षुंना फक्त आठ वस्त्र वापरण्याची परवानगी होती.
१) अंतर्गत वस्त्र २) उत्तरासंघ ३) संघाटी ४) कमरेवर बांधण्याची पट्टी ५) भिक्षापात्र ६) वस्तरा ७) सुई दोरा ८) पाणी गाळण्यासाठी कापड

५२७) भिक्षुधर्म आज्ञेशिवाय कोणत्याही व्यक्तीच्या आज्ञेत रहात नाही.

५२८) जो शिलवान आहे, ब्रम्हचर्य आहे सम्यक प्रकारे धर्माची जाण आहे त्यालाच काशाय सस्त्र परिधान करण्याचा अधिकार आहे.

५२९) तपस्वी आणि भिक्षु यांच्यात फार फरक आहे. दोन्ही एक नाहीत. तपस्वी स्वत: कठोर तपश्चर्या करून आत्मक्लेश करून घेतो. यामधून कोणताही चांगला जीवनमार्ग सापडत नाही. आत्मक्लेश सदोष आहे.

५३०) भिक्षु आत्मक्लेश न करून घेता मध्यम मार्गावर चालतो. मध्यम मार्ग दोषकारक नाही.

५३१) ब्राम्हण व भिक्षु एक नाहीत.

५३२) ब्राम्हण पुरोहित असतो तो कोणाच्याही जन्म मृत्यूच्यावेळी लग्नकार्यात विधी करतो. यज्ञकार्य कर्मकांड ब्राम्हण करतो.

५३३) भिक्षु यज्ञ कर्मकांड करीत नाहीत.
५३४) ब्राह्मण ब्राह्मणेच्या पोटी पैदा होतो. ब्राह्मणाला जात असते.
५३५) भिक्षु ज्ञानाने तयार होतो, भिक्षुला जात नसते.
५३६) भिक्षु आणि उपासक दोन्ही एक नाहीत.
५३७) उपासक गृहस्थी जीवन जगतो.
५३८) भिक्षुंना गृहस्थी जीवन जगता येत नाही.
५३९) चमत्कार ही लोकांची दिशाभूल आहे. बौद्ध धर्मात चमत्काराला थारा नाही.
५४०) बळाने किंवा जबरदस्तीने धर्म परिवर्तन होत नसते.
५४१) जिथे शिलाला प्रज्ञेला अप्रमादाला धोका असेल अशावेळी न घाबरता प्रतिकर करावा असे तथागतांनी भिक्षुंनासुद्धा सांगितले.
५४२) भिक्षुंच्या नियमाबद्दल अंगुत्तर निकायमध्ये सविस्तर वर्णन आहे.
५४३) गृहस्थी आणि भिक्षु दोघांचा धर्म एकच आहे.
५४४) गृहस्थीने आई-वडिलांची सेवा करावी व योग्य असे उपजिवीकेचे साधन स्विकारावे.
५४५) दारुच्या व्यसनामुळे पैसा खर्च होतो, भांडणे होतात, रोग उद्‌भवतो. चारित्र्य दुशील होते.
५४६) झुगार खेळल्यामुळे जिंकल्यास वैर पैदा होते तर हारल्यास दु:ख होते. जगण्याचे साधन नष्ट होते. न्यायालयात त्याच्या शब्दाला किंमत राहत नाही. त्याच्याबरोबर सोईरसंमंध करण्यास कोणीही तयार होत नाही.
५४७) वाईट (कुसंगत) संगती मुळे माणूस जुगारी दारूड्या ठग दरोडेखोर हिंसक बनतो.
५४८) आळशी माणूस स्वत: जवळचे धन संपवतो परंतु कमवणे त्यास जमत नाही.
५४९) चार जणांला मित्र रूपाने शत्रू समजा.
१) जो लोभी आहे २) जो बोलतो पण करीत नाही. ३) जो खुशामत करतो. ४) जो फालतू खर्च करतो त्याचा साथी
५५०) लोभी माणूस देतो कमी मागतो जास्त तो स्वत:चा स्वार्थ पाहतो.
५५१) बोलतो पण करीत नाही तो भुतकाळातील गोष्टी करतो. भविष्यकाळातील गोष्टी बोलतो परंतु वर्तमान काळाबद्दल तो काहीही न बोलता असमर्थन प्रकट करतो.
५५२) खुशामती माणूस तो वाईट गोष्टीला साथ देतो. चांगल्या गोष्टीला साथ देत नाही. तो तोंडावर प्रशंसा करतो. पाठीमागे निंदा करतो.
५५३) फालतू खर्च करणारांचा साथी तो यात्र तमाशा बरोबर राहतो. जुगार खेळताना, दारू पिताना साथ करतो.
५५४) चार प्रकारच्या मित्रांना खरे मित्र समजावे.
१) जो सहकारी असतो. (सहाय्यक)
२) जो सुख दु:खात मदत करतो.
३) जो चांगले मार्गदर्शन करतो.
४) जो सहानभूतीपुर्वक असतो.
५५५) जो सहकारी सहाय्य असतो - संकटाच्या वेळेस तो तुमचे व तुमच्या संपत्तीचे कुटुंबाचे संरक्षण करतो. तुम्हाला प्रसंगी हव्या असणाऱ्या वस्तू देऊन भले करतो.
५५६) जो सुखात दु:खात तुमच्या बरोबर असतो - कोणतीही गुप्त वार्ता इतरांना न सांगता प्रसंगी तुमच्यासाठी बलिदान देण्यासाठी तयार करतो.

५५७) जो तुम्हाला सन्मार्गावर जाण्यासाठी प्रयत्न करतो - तुम्ही कुमार्गावर चार असताना तुम्हाला हरकत करतो. तुमच्याकडून पुण्यकर्म व्हावे अशी अपेक्षा करतो. तुम्हाला माहित नसलेल्या धोक्याबद्दल कल्पना देऊन तुमच्या दु:ख निवारण्याचा प्रयत्न करतो.

५५८) सहानुभूती पुर्वक असतो - तुमचे दु:ख पाहून तो दु:खी होतो. तुम्हाला सुखात पाहून त्याला आनंद होतो. तुमच्या हितचिंतकाबाबत आपुलकी वाटते. जो तुमच्याबद्दल वाईट करतो त्याला रोखण्याचा तो प्रयत्न करतो.

५५९) आई-वडिलांची सेवा करा. गुरुजनांचा आदर सत्कार करा. आपल्या पत्नीवर मुलावर प्रेम करा. आपल्या मित्रावर प्रेम करा. सहकाऱ्याबरोबर स्नेहाने वागा. नोकर-चाकरास मदत करा.

५६०) पती पत्नीने पती पत्नी वृत्ताचे पालन करावे. एकमेकांबरोबर आदराच्या भावनेने रहावे.

५६१) पत्नीने सर्वांच्या अगोदर उठावे. सर्वांच्यानंतर झोपावे. आपली वाणी मधूर ठेवावी. घरातील सर्व सामान व्यवस्थीत संभाळून ठेवावे.

५६२) आपल्या घरी कोणी आल्यास त्यांचे स्वागत करून आदराने बोलावे.

५६३) मुलांनी आपल्या आईवडिलांनी आपल्याबद्दल शोसलेल्या यातनांचे भान ठेऊन सर्वतोपरी आई-वडिलांची सेवा करावी.

५६४) शिष्याने आपल्या गुरूप्रती आदराची भावना ठेऊन गुरुची सर्वतोपरी सेवा करावी.

५६५) पती पत्नीने एकमेकांस जिव्हाळ्याने व प्रेमाने वागावे. पती पत्नी वृत्ताचे पालन करून एकमेकास संतुष्ट ठेवावे.

विभाग तिसरा समाप्त

THE END